Mahatma Phule SHikshan Sanstha's

# **Karmaveer Bhaurao Patil College, Urun-Islampur**

Tal- Walwa, Dist- Sangli



Report of

Book Review Competition

On

## ***"Vachan Sankalp Maharashtracha"***

(1 to 20 January, 2025)

Organized by

**Department of Library**

Karmaveer Bhaurao Patil College, Urun-Islampur

(MH)

## BRIEF INFORMATION

| Sr. No. | Title | Details |
|---|---|---|
| 1. | Organizing Department | Department of Library |
| 2. | Title of Activity | Book Review Competition |
| 3. | Day and Date of Activity | 1 to 20 January, 2025 |
| 4. | Venue | Library |

# *BROCHURE*



महात्मा फुले शिक्षण संस्थेचे
कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर
ता. वाळवा, जि. सांगली
महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ग्रंथालय
आयोजित
"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"
वाचन पंधरवडा : १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५
प्रा. अभयकुमार पाटील
ग्रंथपाल
प्रा. (डॉ.) नितीन शिंदे
प्राचार्य

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ता. वाळवा, जि. सांगली



### ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

# पुस्तक परीक्षण स्पर्धा

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" अंतर्गत महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी पुस्तक परीक्षण स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. सर्वोत्कृष्ट तीन पुस्तके परीक्षणासाठी आकर्षक बक्षीस आणि प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात येईल.

**पुस्तक परीक्षण स्पर्धेचे नियम:**

**पात्रता:** ही स्पर्धा महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी खुली आहे.

**पुस्तक निवड:** पुस्तक परीक्षणासाठी विद्यार्थ्यांनी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ग्रंथालयामधील अथवा त्यांच्या स्वतःजवळील मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील कोणतेही एक पुस्तक निवडावे व मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेपैकी कोणत्याही भाषेमध्ये पुस्तक परीक्षण लिहावे.

**सामान्य नियम:** पुस्तक परीक्षण हे विद्यार्थ्यांचे मूळ कार्य असावे. पुस्तक परीक्षण लिहताना विद्यार्थ्यांनी त्यांच्या स्वतःच्या सुवाच्छ हस्ताक्षरामध्ये पानाच्या एका बाजूला लिहावे. सुरवातीस पुस्तकाचे शीर्षक, लेखकाचे नाव, वर्ग व मोबाईल क्रमांक लिहावा. पुस्तक परीक्षण हे ६०० शब्दापेक्षा जास्त नसावे.

**बक्षिसे:** महाविद्यालयातर्फे सर्वोत्कृष्ट तीन पुस्तके परीक्षणास २६ जानेवारी, २०२५ प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी प्रमाणपत्र आणि आकर्षक बक्षीस दिले जाईल.

**अंतिम मुदत:** विद्यार्थ्यांनी आपले पुस्तक परीक्षण हे दिनांक २० जानेवारी,२०२५ संध्याकाळी ६.०० पूर्वी ग्रंथालयात जमा करावे.

**प्रा. अभयकुमार पाटील (ग्रंथपाल)**
**प्रा. एस. एस. चोपडे**
**डॉ. पी. एम. आठवले**

**डॉ. नितीन शिंदे (प्राचार्य)**
**डॉ. प्रमोद गंगनमाले (IQAC समन्वयक)**

# *BRIEF SUMMARY*

As part of the Reading Fortnight Celebration, a Book Review Competition was conducted from 1st January to 20th January 2025. The competition aimed to encourage students to engage in critical reading and articulate their thoughts effectively through book reviews.

Participation and Highlights:

A total of 103 students enthusiastically participated in the event.

Students selected books of their choice, provided by the library, and submitted reviews of at least 1000 words.

**Judging and Results:**

The reviews were evaluated by Mr. S. S. Chopade, Assistant Professor, Department of Marathi. Based on creativity, coherence, and depth of analysis, three students were adjudged winners.

**Support and Guidance:**

The librarian, Mr. Abhaykumar Patil, played a pivotal role in organizing the event by ensuring the availability of books and guiding the students in the process of writing book reviews.

The competition was a grand success, fostering a love for reading and critical thinking among the students. The event also underscored the importance of libraries in shaping informed and thoughtful individuals.

Vithal Ramji Shinde Library, Karmaveer Bhaurao Patil College

## OUTCOMES OF THE ACTIVITY:

- Promotion of Reading Habits.
- Boost in Writing Skills.
- Critical Thinking Enhancement.
- Recognition and Motivation.
- Increased Library Utilization.
- Team Building and Guidance.

*******************************************************

***Report Submitted By: Mr. Abhaykumar A. Patil***

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

## ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

# पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्यांचे नांव: सुखदा संजू खोत  वर्ग: बी.ए. III (इंग्रजी)

पुस्तकाचे नांव: द अल्केमिस्ट  मो. नं.: 7507977291

लेखकाचे नांव: पाउलो कोयुलो  किंमत: 150 रु

प्रकाशकाचे नांव: अरुण जाखडे  एकूण पृष्ठे: 160

**आशय:**

शब्दांचे किमयागार म्हणून जगविख्यात झालेले पाउलो कोयुलो सर्वाधिक वाचक लाभलेल्या आधुनिक काळातल्या मोजक्या लेखकांपैकी एक आहेत. त्यांच्या सर्वाधिक गाजलेल्या 'द अल्केमिस्ट' या कादंबरीचा पंचावन्नपेक्षा अधिक भाषांत अनुवाद झालेला असून कोट्यवधी प्रतींच्या विक्रीचा उच्चांक तिने नोंदवला आहे.

पाउलो कोयुलो यांनी या कादंबरीत अल्केमिस्ट याचा अर्थ निसर्ग आणि विश्व यांची परिभाषा समजणारा आणि त्यांच्याकडून येणाऱ्या संकेतांना ओळखणारा बुद्धिमान ज्ञाता असा सांगितला आहे. 'द अल्केमिस्ट' ही साहसकथा आहे. स्पेन देशामधील 'अंदालुसिया' नामक पर्वतीय प्रदेशात राहणाऱ्या 'सॅन्तियागो' नावाच्या एका मेंढपाळ तरुणाची.

आजच्या काळात संघर्षमय जीवन जगत असताना आपले लक्ष्य गाठण्याची प्रेरणा देणारी शक्ती अंतर्भूत असलेली ही दास्तान आहे. आपल्यापैकी प्रत्येकालाच जीवनाच्या निश्चित ध्येयापर्यंत पोहोचण्यापूर्वी संघर्ष, अपयश, विश्वासघात अशा अनेक निसर्ग आणि मानवनिर्मित संकटे इ. वेदनादायी प्रसंगामधून जाणे क्रमप्राप्त असते आणि या प्रसंगामधून जाताना आपल्याला कमालीच्या संयमाने आपले अस्तित्व आणि स्वप्न जपावे लागते आणि अखेरीस फलरूपी जे आपल्याला प्राप्त होते त्याची साथ देणारे हे 'द अल्केमिस्ट' हे पुस्तक आहे.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

| | |
|---|---|
| विद्यार्थ्याचे नांव: कु. तनिषा संतोष माळी | वर्ग: BSc III chemistry |
| पुस्तकाचे नांव: कर हर मैदान फतेह | मो. नं.: 7821808345 |
| लेखकाचे नांव: विश्वास नांगरे पाटील | किंमत: 299 |
| प्रकाशकाचे नांव: मेहता पब्लिशिंग हाऊस | एकूण पृष्ठे: 228 |

**आशय:**

कर हर मैदान फतेह हा वाक्यांश धैर्य, जिद्द आणि चिकाटी यांचे प्रतीक आहे. जीवनातील प्रत्येक आव्हानावर मात करण्याची ताकद आपल्यात आहे, आणि ती ताकद वापरुन आपण कोणत्याही परिस्थितीत विजय मिळवू शकतो. हा विचार केवळ शब्द नाही, तर जीवनात सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचा मंत्र आहे.

पुस्तक खूप छान आहे. प्रेरणा देणारे पुस्तक आहे. प्रत्येकाला कधी ना कधी प्रेरणाची गरज असते. आपल्या आसपासची परिस्थिती, कुटुंबीय, मित्र आणि आपले ध्येय आपल्याला प्रेरित करू शकतात. प्रेरणा घेतली की आपली ऊर्जा वाढते आणि कोणत्याही क्षेत्रात आपण यशस्वी होऊ शकतो.

मुळात ब्रिटिशांनी बनविलेली आणि स्वातंत्र्यानंतर कल्याण-कारी रूप धारण केलेली पोलादी नोकरशाही तिच्या स्टील फ्रेममध्ये घुसणारा एक तरुण. तिथल्या प्रवेशावेळची घुसमट, त्यातल द्वंद्व आणि कमान हाती घेतली की सुरु होणारं भन्नाट जीवन. शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक अंगाची जाणिवपूर्वक केलेली मशागत

पूर
र
S - I
88209797
.19
00
ो साहित्यिक पुरस्कार
2005 मध्ये लिहिलेलं
ाकाव्य महाभारताचे
महत्व प्राप्त होते.
प्रेरित होऊन,
णे बदलून, राधाला
ा हे एक उत्कृष्ठ
कृष्णा धारावासी
कथेला काही
ीत राधा हे पात्र
परंतु महाभारताच्या
। प्रकाशनच्या
ी. धारावासी यांनी
त्रण करण्याच्या
आहे जी वास्तविक
पनिक जगाकडे
ीकडे

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्यांचे नांव: स्नेहा विठ्ठल होनमोरे — वर्ग: BSC-II

पुस्तकाचे नांव: अभ्यास ते अधिकारी — मो. नं.: 9890457273

लेखकाचे नांव: मनोहर भोळे — किंमत: 360 ₹

प्रकाशकाचे नांव: Vishwakarma Publications. — एकूण पृष्ठे: 344

**आशय:**

राज्यसेवा परीक्षेबद्दल अर्थात पूर्वपरीक्षेपासुन ते मुलाखत देऊन अधिकारी होईपर्यंतची माहिती व सखोल विश्लेषण या पुस्तकामध्ये मुद्देसुद मांडलेली आहे. तसेच यशस्वी अधिकाऱ्यांचे संवादपर मार्गदर्शन लेखकांनी व त्यांच्या संपुर्ण सहकाऱ्यांनी अतिशय साध्या व सोप्या भाषेत रचले आहे. परीक्षेची संरचना, स्पर्धा परीक्षा अभ्यास कसा करावा, वाक्य छडामोडी, संदर्भ ग्रंथांची यादी, mpsc मुलाखतीची तयारी, पदांची माहिती इत्यादी या पुस्तकामध्ये समाधानकारकपणे समाविष्ट केलेले दिसून येते.

या स्पर्धा परीक्षेच्या क्षेत्रात का प्रवेश करायचा? तर स्वतःची एक नवी ओळख तयार करण्यासाठी, अधिकार हातात घेऊन शक्य होईल तेवढे उत्तरांसाठी झटण्यासाठी, मानसन्मान स्वीकृती व आपल्या आई वडिलांच्या स्वप्नपूर्तीसाठी. या क्षेत्रात पाय ठेवायचे ठरवलेच आहे तर काही गोष्टी मनातून Delete कराव्या लागतील आणि काही गोष्टी नव्याने अंमलात आणाव्या लागतील जसे की, सोशल मिडिया, नको ते जनसंपर्क, प्रेमप्रकरण इत्यादी गोष्टीपासून चार हात लांब राहणे योग्य व शांत राहणे, अभ्यासात अडथळा आणणाऱ्या गोष्टींची यादी काढून त्यापासून दुर राहणे, अधिकारी असल्यासारखे आतापासूनच राहणे महत्त्वाचे ठरेल असे लेखक सांगतात.

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: सानिका धनाजी पवार  वर्ग: B. A. II

पुस्तकाचे नांव: मृत्युंजय  मो. नं.: 8788182020

लेखकाचे नांव: शिवाजी सावंत.  किंमत: ५००रु.

प्रकाशकाचे नांव: मेहता पब्लिशिंग हाऊस  एकूण पृष्ठे: 628

आशय:

शिवाजी सावंत – मराठी भाषेतील सुप्रसिद्ध लेखक व मृत्युंजय या कादंबरीचे लेखक आहेत. त्यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा या गावात झाला. कोल्हापूर येथे त्यांनी शिक्षक म्हणून काम केले. महाराष्ट्र शिक्षण विभागाच्या 'लोकशिक्षण' या मासिकाचे संपादक म्हणून त्यांनी सहा वर्षे काम पाहिले. 1995 पासून त्यांनी महाराष्ट्र शिक्षण परिषदेचे साहित्य विभागाचे उपाध्यक्ष पद भूषवले.

महाभारतातील कर्ण या व्यक्तिरेखेवर आधारित शिवाजी सावंत यांनी लिहिलेली कादंबरी आहे. २4 सप्टेंबर 1995 ला या पुस्तकाला 'भारतीय ज्ञानपीठ' या संस्थेतर्फे मूर्तीदेवी पुरस्कार जाहीर झाला. मृत्युंजय ही एक ऐतिहासिक कादंबरी आहे. सर्वसामान्यांना महाभारतातील खलनायक म्हणून परिचित असलेल्या कर्णाच्या असामान्य व्यक्तिमत्वाचा मागोवा घेणारी ही कादंबरी आहे. या या कादंबरीतील बऱ्याच कथा अनेकांना परिचित आहेत. खलनायक म्हणून भासणारा कर्ण प्रत्यक्षात महाभारतातील सर्वात मोठा नायक आहे हे ही कादंबरी पटवून देते. दानशूरपणा कशाला म्हणतात, संयम कसा असावा, मैत्री कशी जोपासावी व भक्तीची घमेंड कशी मोडावी हे सर्व शिकवणारी ही कादंबरी आहे. कर्ण त्याच्या परिवर्तनाच्या वाटेवर तो अमर झाला. त्याने स्वतःला सूतपुत्र मानले. जेव्हा त्याला त्याची ओळख कळाली तेव्हाही त्याने आपली ओळख सांगितली नाही, त्याने स्वतःच्या गुरुच्या शाप ही वरदान समजून घेतला.

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्यांचे नांव: अपुर्वा हणमंत शिंदे वर्ग: BCS - I

पुस्तकाचे नांव: यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र मो. नं.: 9699300692

लेखकाचे नांव: यशवंतराव चव्हाण किंमत: 300

प्रकाशकाचे नांव: रोहन प्रकाशन एकूण पृष्ठे: 325

आशय:

यशवंतराव चव्हाण यांच्या आत्मचरित्राचे मराठीत 'यशवंत' हे नाव आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या आत्मचरित्राचा पहिला खंड यशवंतराव चव्हाण प्रतीष्ठाने प्रकाशित केला आहे. या आत्मचरित्राचा पहिला खंड 2012 मध्ये प्रकाशित झाला होता. या आत्मचरित्राचा पहिला खंड 316 पृष्ठांचा आहे.

यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होते. ते भारतीय कॉंग्रेसचे नेते होते. ते देशाचे उपपंतप्रधान, गृहमंत्री, संरक्षणमंत्री अशी महत्वाची पदे भूषवली. 1 मे 1960 रोजी संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून ओळखले जातात. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षाला 12 मार्च 2012 रोजी प्रारंभ झाला. यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या आयुष्यातील 1912 ते 1946 पर्यंतच्या कालखंडाचा आढावा घेणारे 'कृष्णाकाठ' हे आत्मचरित्र लिहिले होते. त्याची पहिली आवृत्ती 1 फेब्रुवारी 1984 रोजी प्रेस्टिज प्रकाशनाने प्रसिद्ध केली होती. त्याचबरोबर याच आत्मचरित्राच्या गायत्री पगडी यांनी इंग्रजीत केलेल्या अनुवादाची पहिली आवृत्तीही रोहन प्रकाशनाने प्रसिद्ध केली आहे. यशवंतराव चव्हाणांचे जन्मगाव असलेले देवराष्ट्रे हे सातारा जिल्ह्याच्या एका टोकाशी वसलेले आहे. त्या गावच्या रम्य आठवणींपासून या आत्मचरित्राला प्रारंभ झाला आहे.

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

# पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: प्रणाली जनार्दन पाथमल — वर्ग: MSC-I (Mathematics)

पुस्तकाचे नांव: नाना, मी साहेब झालो — मो. नं.: 8459905080

लेखकाचे नांव: विष्णू औटी (IRS) — किंमत: 200 रु.

प्रकाशकाचे नांव: युनिक ॲकॅडमी — एकूण पृष्ठे: 180

**आशय:**

एक प्रसिद्ध म्हण आहे की, 'पायात नसलेल्या बुटांचे मला काही वाटेनासे झाले, जेव्हा मी पाय नसलेला माणूस पाहिला. खरचं जेव्हा मी हे पुस्तक वाचले त्यानंतर माझा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन पूर्णपणे बदलला गेला. एका सालगड्याचा मुलाचा IAS बनण्याचा अट्टाहास या पुस्तकामध्ये वर्णिला आहे.

पारनेर सारख्या दुष्काळी तालुक्यात जन्म झाला. आई व वडील दोघेही दिव्यांग असल्याने घरची परिस्थिती खुप हलाखीची असल्याने ते आपल्या गुरुच्या व मित्रांच्या साहाय्याने इथपर्यंत आले. विष्णु सरांच्या आईना नीट ऐकता यायचं नाही व त्यांच्या वडिलांना एका डोळ्याने दिसायचं नाही. परिस्थिती हलाखीची होती त्यांना दोन बहीणी व एक भाऊ होता. त्यांच्या वडिलांना ते नाना म्हणायचे नानांची पहिली पत्नी उपासमारीमुळे त्यांचा जीव गेला. लोकांनी बोलायला सुरुवात केली आता या आंधळयाचं काय होणार? नानांनाही प्रश्न पडला आता पुढे पोरांना घेऊन कस जगायचं. त्यांनी यातून धीर न खचता सालगडी म्हणून काम करायला सुरुवात केली. मात्र त्याच काळात भयानक दुष्काळ पडलेला होता लोकांवर उपासमारीची वेळ आली होती. त्यातच विष्णु सरांची लहान बहीण उपासमारीमुळे तीचा जीव गेला. सगळेच खुप खचले होते घरचे अठराविश्व दारिद्र्य त्यात एका पाठोपाठ एक कुटुंबातील व्यक्तीचा जीव जात होता. या सगळयात नाना मात्र खुप खचले होते त्याच दरम्यान विठ्ठु आण्णा नावाचे गृहस्थ त्यांच्याकडे आले. त्यांनी नानांना दुसरं लग्न करण्याचा सल्ला दिला व त्यांनीच नानांच्या लग्नाची जबाबदारी घेतली. त्यांच्या प्रयत्नाने नानांचे लग्न झाले हळूहळू सगळ नीट होऊ लागल पण त्यांच्या मागचं अठराविश्व दारिद्र्य काय संपत नव्हत. आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी विष्णु सरांसहीत सगळ्यांना कामाला जायला लागायचं तेव्हा कुठे दोन्ही वेळेचे जेवण त्यांना मिळायचं.

विष्णु सरांच्या जीवनातील सर्वात महत्वाचे व्यक्ती म्हणजे त्यांचे गुरु. ते शाळेत हुशार होते पण घरच्या परिस्थिती मुळे ते हतबल होते. तेव्हा त्यांच्या शिक्षकांनी त्यांना स्पर्धा परीक्षा करण्याचा सल्ला दिला. तुला जर तुझी परिस्थिती बदलायची असेल तर तुला अभ्यास करावाच लागेल जी मदत लागेल ती तुला मी करतो. या गुरुंच्याच शब्दावर विष्णु सरांनी घरची परिस्थिती अशी असतानाही स्पर्धा परीक्षा करण्याचा निर्णय घेतला.

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: कोमल शिवाराम दडिंगे — वर्ग: B.A. II

पुस्तकाचे नांव: बलुतं — मो. नं.: 7028146711

लेखकाचे नांव: दया पवार — किंमत: 100

प्रकाशकाचे नांव: ग्रंथाली — एकूण पृष्ठे: 192

**आशय:**

बलुतं, प्रसिद्ध दलित महाराष्ट्रीयन कवी आणि लेखक दया पवार यांनी लिहिलेले पुस्तक, भारतातील पहिल्या दलित आत्मचरित्रांपैकी एक आ 1978 साली मराठीत लिहिलेले हे पुस्तक महाराष्ट्रातील महार समाजावर झालेल्या अस्पृश्यतेच्या कृत्यांवर आणि अत्याचारांवर प्रकाश टाकतेच शिवाय दलित समाजाला स्वत:चा अभिमानही दाखवतो एक व्यक्ती म्हणून पवारांच्या स्वत:च्या अपयशांवर, त्यांच्या आयुष्यातील स्त्रिया आणि तुम्ही जिथे जाल तिथे जातीच्या सीमा कशा राहतात. आणि त्या वेगळ्या पद्धतीने मांडल्या जातात, हे यातून प्रतिबिंबित होते. हा आठवणींचा संग्रह आहे. ज्यामध्ये तो ज्या त्रासातून जात आहे. आणि त्याच्या समाजातील सन्माननीय लोक यासाठी झगडत राहतात. या पुस्तकासाठी दया पवार यांना बलुत हा महाराष्ट्रीय साहित्य पुरस्कार मिळाला. महाराष्ट्रातील महार समाजात जन्मलेल्या पवारांनी हे आत्मचरित्र लिहिताना काहीही मागे ठेवले नाही.

बलुत सतत मुंबईतील ग्रामीण महार वाडा आणि शहरी कारखाना यांच्यात फिरत असतो. अगदी लहानपणापासूनच, पवार मुंबईतल्या जीवनात उलगडतात. जातीय सीमांना थोडेसे पुसट करणारे जीवन, वडिलांच्या निधनानंतर तो गावाला राहायला येतो तेव्हा या सीमांना बळकटी देताना तो दिसतो. गावात आणि बाहेर शारीरिक हालचाली करताना पवारांची हालचाल अवकाशीय होती. त्यांनी आपल्या जातीची कामगिरी ही बाहेरील इतर जाती आणि समुदायाच्या कामगिरीच्या अगदी विरुद्ध म्हणून पाहिली.

बलुतं मध्ये, आपण पवारांचे कुटुंब सतत उदरनिर्वाहासाठी धडपडताना पाहतो. त्याच्या आईवर विश्वासघात केल्याचा आरोप केला जातो. पवारांना सतत महार समाज आणि गावापासून दूर कसे जायचे आहे हे आपण पाहतो.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: कु. भारती रामचंद्र पाटील — वर्ग: BCO - I

पुस्तकाचे नांव: बलुतं — मो. नं.: 7387698725

लेखकाचे नांव: दया पवार — किंमत: 100

प्रकाशकाचे नांव: ग्रंथाली — एकूण पृष्ठे: 192

आशय:

बलुतं, प्रसिद्ध दलित महाराष्ट्रीयन कवी आणि लेखक दया पवार यांनी लिहिलेले पुस्तक, भारतातील पहिल्या दलित आत्मचरित्रांपैकी एक आहे. 1978 साली मराठीत लिहिलेल आहे हे पुस्तक महाराष्ट्रातील महार समाजावर झालेल्या अस्पृश्यतेच्या कृत्यावर आणि अत्याचारांवर प्रकाश टाकतेच शिवाय दलित समाजाला स्वतंत्र्याचा अभिमानही दाखवतो. एक व्यक्ती म्हणून पवारांच्या स्वतःच्या अपयशावर, त्यांच्या आयुष्यातील स्त्रिया आणि तुम्ही जिथे जाल तिथे जातीच्या सीमा कशा राहतात आणि त्या वेगळ्या पद्धतीने मांडल्या जातात, हे यातून प्रतिबिंबित होते. हा आठवणींचा संग्रह आहे ज्यामध्ये तो ज्या त्रासातून जात आहे आणि त्याच्या समाजातील सन्माननीय लोक यासाठी झगडत राहतात. या पुस्तकासाठी दया पवार यांना बलुतं हा महाराष्ट्रातील हा महाराष्ट्रीय साहित्य पुरस्कार मिळाला. महाराष्ट्रातील महार समाजात जन्मलेल्या पवारांनी हे आत्मचरित्र लिहिताना काहीही मागे ठेवले नाही.

बलुतं सतत मुंबईतील ग्रामीण महार वाडा आणि शहरी कावखाना यांच्यात फिरत असतो. अगदी लहानपणापासूनच, पवार मुंबईतल्या जीवनात उलगडतात, जातीय सीमांना थोडेसे पुसट करणारे जीवन. वडिलांच्या निधनानंतर तो गावाला राहायला येतो तेव्हा या सीमांना बळकटी देताना तो दिसतो. गावात आणि बाहेर शारीरिक हालचाली करताना पवारांची हालचाल अवकाशीय होती. त्यांनी आपल्या जातीची कामगिरी ही बाहेरील इतर जाती आणि समुदायांच्या कामगिरीच्या अगदी विरुद्ध म्हणून पाहिली.

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर**

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

**पुस्तक परीक्षण स्पर्धा**

विद्यार्थ्याचे नांव: श्रावणी रमेश माने — वर्ग: BCA-II

पुस्तकाचे नांव: मन में हैं विश्वास — मो. नं.: 8208307504

लेखकाचे नांव: विश्वास नांगरे पाटील — किंमत: 149

प्रकाशकाचे नांव: राजहंस प्रकाशन — एकूण पृष्ठे: 205

आशय:

'मन में हैं विश्वास' हे पुस्तक विश्वास नांगरे पाटील यांनी लिहिले. या पुस्तकाच्या शीर्षकानूनच आपल्याला प्रेरणा मिळते. म्हणजेच आपण आपल्या मनामध्ये ध्येय, इच्छा बाळगायला हवी. आणि त्यावर आपला विश्वास असला पाहिजे. आपण आपल्या जीवनामध्ये काहीतरी करायला हवे असा हेतू आत्मसात केला पाहिजे.

विश्वास नांगरे पाटील यांचा जन्म १ जून १९७३ साली सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील कोकरूड या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील सरपंच होते. त्यांचे खूप मोठे कुटुंब होते. ते खूप हुशार होते. त्यांना त्यांच्या गावात त्यांना "भावड्या" या नावाने ओळखले जाते.

200 पानी पुस्तकाच्या सुरूवातीच्या प्रकरणांत त्यांनी आपलं बालपण, शाळा, कॉलेजच्या वयातल्या आठवणी सांगितल्या आहेत. यशस्वी व्यक्ती म्हणजे ती लहानपणी खूप हुशार, सज्जन, एकपाठी, सर्वगुणसंपन्न असणार असाच आपला समज असतो. पण ते लहानपणीचा खोडकर, मस्ती करणारा, चुका करणारा, विश्वास आपल्यासमोर ठेवतो. तरूणपणातला टर्रेबाज, टुकाऱ्या करत फिरणारा, काही वेळा चुकीच्या मार्गाने जाऊ लागलेला तरूणही आपल्याला दिसतो

Scanned with OKEN Scanner

26/11 च्या हल्ल्यात नाजच्या दहशतवादी हल्ल्यात साक्षात मृत्यूला आलिंगन देणारे, निधड्या छातीचे विश्वास नांगरे-पाटील कार्यक्षम व उत्तम पोलिस अधिकारी म्हणून नियुक्त झाले. "लाथ मारीन तिथं पाणी काढीन" असे म्हणणारे विश्वास नांगरे पाटील यांनी त्यांचे स्वप्न पूर्ण केले. आपण आपल्या आयुष्यामध्ये असे प्रेरणादायी पुस्तके वाचली पाहिजेत. त्यातून प्रेरणा घेऊन पुढे गेले पाहिजे. काहीतरी बनून दाखवले पाहिजे. प्रत्येक आई-बापाला आपल्या मुलांकडून काहीतरी अपेक्षा असतात. त्यांनी पण स्वप्ने पाहिलेले असतात. तर ते पूर्ण करावे. या पुस्तकातून ते समजून आले. आणखी एक

"मंजिले उनिको मिलती हैं
जिनके सपनों में जान होती हैं
युही पंख होने से कुछ नही होता
हौसलो से उड़ान होती है"

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: माने तनुजा प्रताप  
वर्ग: BSC I  
पुस्तकाचे नांव: "अग्निपंख"  
मो. नं.: ८३२९००८१३८  
लेखकाचे नांव: ए. पी. जे अब्दुल कलाम  
किंमत: ३०० रु  
प्रकाशकाचे नांव: राजहंस प्रकाशन.  
एकूण पृष्ठे: १८३

**आशय:**

"अग्निपंख" हे पुस्तक भारताचे माजी राष्ट्रपती आणि प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या जीवनप्रवासावर आधारित आहे. हे पुस्तक भारतीय तरुणांना त्यांच्या जीवनात उच्च ध्येय गाठण्यासाठी प्रेरणा देण्यासाठी प्रेरणा देण्यासाठी लिहिले गेले आहे. हे पुस्तक कलाम यांचे विचार, तत्वज्ञान आणि जीवनातील अनुभव याचे अनुकरण आहे. ज्यामुळे वाचकांना त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी नवा दृष्टिकोन मिळतो.

पुस्तकाच्या सुरुवातील डॉ. कलाम यांच्या बालपणाचे वर्णन आहे. त्यांचा जन्म रामेश्वरम येथे एका साधारण कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांनी त्यांना मेहनत प्रामाणिकपणा आणि सद्गुणी पणाचे धडे दिले. रामेश्वरमच्या शांत आणि प्रेरदाई वातावरणात बालपण घालवल्यानंतर, डॉ. कलाम यांनी आपल्या शिक्षणाच्या आणि करिअरच्या प्रवासाची सुरुवात केली पुस्तकात त्यांच्या शिक्षणापासून हे इस्रो आणि डीआरडीओ या महत्वाचा संस्थांमध्ये केलेल्या कार्यापर्यंतचा प्रवासाचे वर्णन केले आहे.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

| | | | |
|---|---|---|---|
| विद्यार्थ्याचे नांव: | चैतन्य शशिकांत बंजारी. | वर्ग: | B.Sc.1 |
| पुस्तकाचे नांव: | अमृतवेल | मो. नं.: | 9021218232 |
| लेखकाचे नांव: | वि. स. खांडेकर | किंमत: | १५५ ₹ |
| प्रकाशकाचे नांव: | मेहता पब्लिशिंग हाऊस | एकूण पृष्ठे: | १६० |

आशय:

वि. स. खांडेकर हे 'निवलवादी' लेखक म्हणून ओळखले जातात. या कादंबरीतूनही त्यांनी म्हटलं आहे, "मानसाचा सर्वात जास्त प्रेम जगण्यावर असत.!"

अलकनंदा एम.ए. शिकलेली हुशार, ध्येयवादी आणि गोड तरुणी. एका संयुक्त आणि प्रेमळ कुटुंबात वाढलेली. आभाळासारखी माया करणारी जमिनीसारखं जपणारी माई, दादा आणि नंदा मावशी. 'नंदा मावशी' म्हणणारा नहल मा मिलिंद. मिलिंदची आई वारली तेव्हा त्याच्या बाबांनी दुसर लग्न केलेलं. सावत्र आई मिलिंदची आई वारली तेव्हा त्याच्या बाबांनी दुसर मिलिंदच्या न सांभाळणारी आई माई. दादा आणि नंदा हेच त्याच विश्व।

एके दिवशी नंदाला घरी परतायला झालेला उशीर पाहून दादाच काळीज काळजीने वरखाली होत होत. नंदाच्या खोलीत ते तिची पुस्तके चाळत बसले. त्यात नंदाने पाहिले पत्र सापडत. ते पत्र दादांनाच लिहल होत, पण आपल्या आयुष्यातील वादळे दादांसमोर न व्यक्त करता येण्यासारखं वाटल्यामुळे मनातला अनोलान कोलाहल तिने या पात लिहल्या होत्या.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: माधवी कुंडलिक वाघ ———— वर्ग: B.Sc.I Biotechnology

पुस्तकाचे नांव: द सिक्रेट (The secret) मो. नं.: 9172913624

लेखकाचे नांव: रोंडा बायर्न (Rhonda Byrne) किंमत: 292

प्रकाशकाचे नांव: Atria books / Beyond Words एकूण पृष्ठे: 141

**आशय:** हे पुस्तक आकर्षणाचा नियम (Law of Attraction) या संकल्पनेवर आधारित आहे. या पुस्तकाचा मुख्य दावा असा आहे की आपल्या विचारांद्वारे आणि भावनांद्वारे आपण आपल्या आयुष्यातील परिस्थिती बदलू शकतो. आकर्षणाचा नियम सांगतो की जसे आपण विचार करतो, तसेच अनुभव आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवू शकतात.

पुस्तकात स्पष्ट केले आहे की जर तुम्हाला तुमच्या जीवनात एखादी गोष्ट हवी असेल, तर ती आधीपासून मिळाल्यासारखा विचार करा आणि त्याबद्दल आभार व्यक्त करा. आपण ज्या ऊर्जेचा प्रसार करतो, तीच ऊर्जा आपण परत आकर्षित करतो. विश्वास, सकारात्मकता आणि कृती या गोष्टी तुमच्या स्वप्नांना सत्यात उतरवण्यासाठी महत्त्वाच्या ठरतात.

<u>तत्त्वज्ञान</u> -

1) इच्छा - तुम्हाला जे हवे आहे त्याबद्दल स्पष्ट आणि ठाम विचार करा. तुम्हाला नक्की काय मिळवायचे आहे याचे स्वप्न पहा.

2) विश्वास - तुम्हाला तुमच्या इच्छांबद्दल पूर्ण विश्वास हवा. असे समजा की ती गोष्ट आधीपासूनच तुमच्या हातात आहे.

3) आभार - जे तुम्हाला मिळाले आहे त्याबद्दल आणि जे तुम्हाला मिळणार आहे त्याबद्दल आभार व्यक्त करा. कृतज्ञता तुम्हाला अधिक चांगल्या गोष्टी मिळवण्यासाठी प्रेरित करते.

<u>जीवन बदलण्याची प्रक्रिया</u> -

या पुस्तकात सांगितले आहे की जर तुम्हाला आर्थिक समृद्धी चांगले

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: कमाक्षिका अंजार कुमार — वर्ग: B.A.S.Y.

पुस्तकाचे नांव: मन मैं है विश्वास — मो. नं.: 7028933197.

लेखकाचे नांव: विश्वास नांगरे - पाटील — किंमत: 225/-

प्रकाशकाचे नांव: राजहंस प्रकाशन — एकूण पृष्ठे: 207 ~~[illegible]~~ pages.

Publish year : 2016.

आशय:

'मन मैं है विश्वास'

प्रेरणादायी आत्मकथन

मराठी साहित्यात आत्मकथनांची मोठी परंपरा असली, तरी विश्वास नांगरे पाटील यांचं प्रकाशित झालेलं आत्मकथन 'मन मैं है विश्वास' हे मला खूप प्रेरणा देते. स्वतः विषयी खरं लिहिणं हा जीवघेणा अनुभव असतो तरीही विश्वास नांगरे - पाटील यांनी स्वतःला मोकळेपणी व्यक्त केलं आहे. आपल्या कुटुंबाची, समाजाची पूनर्तपासणी केलीय, नात्यागोत्यातील उभ्या - आडव्या धाग्यांचा छेद घेऊन उकल केलीये. अत्यंत सोप्या भाषेत असलेले हे आत्मकथन लेखकाच्या प्रगल्भ मनाची जाणीव करून देते.

स्वतःच्या भूतकाळात खोल खोल उतरून UPSC यशाच्या मार्गक्रमणेच्या अर्थ लावू पाहणारा भावड्या प्रत्येक अनुभव इतक्या पोटतिडकीने मांडतो की आपली संवेदनशीलता क्षणभर शहारून उठते. विश्वास नांगरे पाटील सरांनी पुस्तकामध्ये आपल्या गावाविषयी, आईवडिलांविषयी, नातेवाईक, मित्र, गुरुजनवर्ग स्वतःच्या अपार संघर्षाविषयी, यातनांविषयी, त्यांना पराभूत करू पाहणाऱ्या वृत्ती - प्रवृत्तीविषयी, आशा - निराशा, यशापयश, स्वप्न आणि भ्रमनिरास या साऱ्याविषयी, एक बहुपेडी आशयसूत्रे असलेला एक kaleidoscope म्हणजे "मन मैं है विश्वास"!

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर**

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

# पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: अनुष्का अंकुश माने.　　　　वर्ग: B.Sc I

पुस्तकाचे नांव: सुंदर पत्रे　　　　मो. नं.: 8983826882.

लेखकाचे नांव: साने गुरूजी　　　　किंमत: 310

प्रकाशकाचे नांव: रिया पाब्लिकेशन　　　　एकूण पृष्ठे: 312.

**आशय:**

सुंदर पत्रे हे मराठी पुस्तक साने गुरूजींकडून लिखित आहे. या पुस्तकाचा आशय म्हणजे सुधाला पत्र लिहून त्यातून अण्णांनी आपल्या मनाचे सारे भाव स्पष्ट त्या पत्रातून उमटले गेले आहेत... सुधाताई आणि अण्णांमधील प्रेम, काळजी व त्यांचे नाते हे त्या पत्रातून प्रत्येकास समजते, देवाघरी जाताना सुद्धा त्यांच्या फोटो त्यांनी आपल्या उजव्या खिशात ठेवला होता. गुरूजी नाना ठिकाणी हिंडत, नाना देश, नाना वेष, सृष्टीचे नाना प्रकार ते पाहत त्यांची नजर जशी रत्नपारख्याची होती! साऱ्या देशभरात हिंडून आणि शेकडो ग्रंथ चाळून साक्षेपाने गोळा केलेल्या सुमधुर, सुरस, सुगंधी नि टपोर स्मृतींचे द्रोणच्या द्रोण भरून ते तुला दर शनिवारी पाठवीत, मग तू भाग्याची नाहीस का?

सुंदर पत्रे या पुस्तकाच्या माध्यमाच्या आधारे साने गुरूजींनी अण्णांनी सुधाला लिहिलेली पत्रे, मराठी वारसा, पत्रामधील भेटीचा स्वाद, शब्दांची आपुलकी, पत्रांमधील मनाचे भाव हे सर्व एकत्र उभ्या महाराष्ट्राला व महाराष्ट्रातील बाळगोपाळांना अनुभवतायावा व त्याचे भाव अभ्यासावा यावे असे कादावरचे प्रयत्न त्यांनी केले व या पुस्तकाच्या द्वारे हे त्यांनी शक्य करून दाखवले.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: संस्कृती जगन्नाथ कांबळे — वर्ग: M.A/M.SC-II

पुस्तकाचे नांव: बांधावरच्या बाभळी — मो. नं.: 8530709644

लेखकाचे नांव: ग. दि. माडगूळकर — किंमत: 128

प्रकाशकाचे नांव: साकेत प्रकाशन — एकूण पृष्ठे: 144 Pages

**आशय:**

गजानन दिगंबर माडगूळकर (गदिमा) हे आधुनिक काळातील मराठी भाषेतील अग्रगण्य साहित्यिक होते. ते गद्य व पद्य दोन्ही क्षेत्रात प्रसिद्ध आहेत. त्यांचे गीत रामायण फार लोकप्रिय आहे. सुप्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर त्यांचे लेखनिक म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. गीतकार, कथासंवादकार आणि अभिनेते म्हणून दोनशेहून अधिक मराठी आणि कथासंवादकार म्हणून पंधरा हिंदी चित्रपटांसाठी त्यांनी काम केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेली गीते 'चैत्रबन' ह्या नावाने संग्रहित आहेत, तसेच त्यांनी प्रसिद्ध झाल्या आहेत. 'युद्धाच्या सावल्या' ह्या नावाने एक नाटक त्यांनी लिहिले होते. त्यांच्या उल्लेखनीय पुस्तकांपैकी काही अशी: कविता – जोगिया – चार संगीतिका, काव्यकथा, गीत रामायण, गीत गोपाल, गीत सौभद्र, कथासंग्रह कृष्णाची करंगळी, तुपाच्या नंदादीप, चांदनी उदबत्ती, कादंबरी आकाशाची फळे. आत्मचरित्रपर – मंतरलेले दिवस, अजून गदिमा आणि वाटेवरच्या सावल्या. त्यांना महाराष्ट्र वाल्मीकी ही सन्माननीय पदवी लोकांना स्वयमस्फूर्तीने दिली.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

# पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: प्रियांका अशोक वाघमारे — वर्ग: बी.ए ३

पुस्तकाचे नांव: छावा — मो. नं.: 9970971435.

लेखकाचे नांव: शिवाजी सावंत — किंमत: ५२०

प्रकाशकाचे नांव: मेहता पब्लिशिंग हाऊस — एकूण पृष्ठे: ८५३

आशय:

झुकला औरंग्या म्हणे कैसा हा छावा
ऐसा मर्द मराठा पुन्हा पुन्हा जन्माला यावा.....

शिवपुत्र संभाजी महाराजांच्या जीवनप्रवास म्हणजे एक अग्निदिव्य. छत्रपतींच्या निधनानंतर औरंजेब पाच लाखांचं सैन्य व चौदा कोटींचा खजिना घेऊन दख्खन जिंकायला निघाला. पण छत्रपती संभाजी महाराजांनी त्याला नऊ वर्षे निकराचा लढा देऊन जेरीस आणला. दख्खन जिंकायला निघालेल्या या क्रूर औरंगजेबाला पुन्हा दिल्लीच्या तख्तावर विराजमान होता आलं नाही. लेखक शिवाजी सावंत यांनी छावा सन १९७२ साली लिहायला घेतलं. लिखाणाच्या पहिल्याच दिवशी जगदंबेने कसा कौल दिला याबद्दल त्यानी प्रस्तावनेत लिहलं आहे. किल्ले प्रतापगडावर १९७९ साली यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते छावा प्रकाशित झालं महाराष्ट्राच्या जनतेने या पुस्तकाला अक्षरश: डोक्यावर घेतले.

छत्रपती संभाजी महाराजांच्या जन्मापासून या कादंबरीची सुरुवात होते. पुस्तकातील भाषेवर काळानुरूप मावळ प्रांतातील रांगडी भाषेचा प्रभाव आहे. लेखकाने ज्या पद्धतीने पात्रांच्या मनाचा कौल घेण्याचा प्रयत्न केला आहे.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: वाकळे राहुल शरद | वर्ग: M.A.-2 (Economics)

पुस्तकाचे नांव: अग्निपंख | मो. नं.: 89

लेखकाचे नांव: अरुण तिवारी | किंमत: 240 रुपये

प्रकाशकाचे नांव: युनिव्हर्सिटीज प्रेस (ओरिएंट प्रकाशन) | एकूण पृष्ठे: 179

**आशय:** →

अग्निपंख हे डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांचे आत्मचरित्र आहे. या पुस्तकात त्यांनी आपल्या बालपणापासून ते भारताचे राष्ट्रपती होण्यापर्यंतचा प्रवास सांगितला आहे. एका साध्या शेतकऱ्याच्या मुलाने कसे भारताच्या अंतराळ कार्यक्रमाचे प्रमुख शास्त्रज्ञ बनले याची ही कहाणी आहे.

अग्निपंख हे पुस्तक लोकप्रिय आहे कारण →

(1) प्रेरणादायी जीवनकथा :- कलाम यांचे जीवन संघर्ष- निष्ठा दृढ इच्छाशक्तीचे प्रतीक आहे.

(2) साधेपणा आणि विनम्रता :- कलाम यांचा साधेपणा आणि विनम्रता यांनी सर्वांचे मन जिंकले

(3) देशप्रेम :- त्यांचे देशप्रेम आणि भारताच्या विकास--बद्दल दृष्टीकोन प्रेरणादायी आहे.

(4) शिक्षण आणि विज्ञान :- कलाम यांनी शिक्षण आणि विज्ञानाच्या महत्वावर भर दिला.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

| | |
|---|---|
| विद्यार्थ्याचे नांव: प्रियांका महावीर कोळी | वर्ग: B.SC I |
| पुस्तकाचे नांव: नितांत शाळा समरहिल | मो. नं.: 8275158672 |
| लेखकाचे नांव: अंजली आम्रोळकर | किंमत: 130 |
| प्रकाशकाचे नांव: दैनिक गोमंतक [21 डिसेंबर 2008] | एकूण पृष्ठे: 106 |

**आशय:** बऱ्याचशी लहान मुलांना कारावास वाटणारी नकोशी वाटणारी जागा म्हणजे शाळा ते नावीन्य नसणारी तात्विक अभ्यास ती शिस्त यापैकी, त्यांना काही नि, मुळीच आवडत नसते! त्यांना बाहेर मोकळेपणाने, मनसोक्त हुंदडायचे असते खेळून खेळून दमायचे असते. त्यांच्या आकर्षणाच्या आवडीच्या व रमण्याच्या गोष्टी शाळेत असलेल्या गोष्टींपेक्षा निराळ्याच असतात पण हे मोठ्यांना कुठे कळते? ते तर राहतात चमत्कारिक व वयाने पोक्त! मुलांना, त्यांच्या आवडीच्या गोष्टी कंटाळा येईपर्यंत करू देत राहायचे म्हणजे आपोआप ती शिक्षणाकडे शिस्तीकडे व स्वावलंबनाकडे वळतात!.... असा नवांच्या 'नील' मास्तरांनी बालसंगोपनाचा एकांतिकी मार्ग अवलंबिला व तो म्हणजे.... 'समरहिल - शाळा!' ती त्यांनी व त्यांच्या सौभाग्यवतींनी चालू केली वाढवली व यशस्वी करून दाखवली जरी त्या वेळच्या सर्व वर्तमानपत्रांनी 'काय वाटेल ते करायला मोकळीक देणारी शाळा' असे नामाभिधान या शाळेला देऊन टाकलेले होते व इथे शिकणारी मुले म्हणजे जणू वाल्मिकीचा गंध नसलेल्या रानटी आदिवासींचा मेळावा आहे असे म्हटले तरी शिक्षण करूनसुद्धा निघालेली व 'स्वातंत्र्य' म्हणजे 'स्वैराचार' नव्हे 'स्वातंत्र्य' म्हणजे जबाबदारी हे उदाहरणावरून पटवून देणारी 'समरहील' शाळा आज एक जागतिक दर्जाचे केंद्र बनली आहे. ही शाळा इंग्लंडमधल्या लायस्टन गावात लंडनपासून शंभर मैलावर आहे लेखक ए. एस. नील याने स्वतः च्या लहानपणात शाळांचे अभ्यासाचे ओझ्याचे इतके भयावह अनुभव घेतले की तरुणपणी त्याने आपल्या 'समरहील' नावाच्या घरात, चार विद्यार्थ्यांना घेऊन ही शाळा सुरू केली.

मुलांमध्ये एक उपजत शहाणपण आणि वास्तवतेचे भान असते मोठ्यांनी कोणतीही सूचना न देता त्यांना मोकळेपणा दिला तर ते मूल त्याच्या क्षमतेप्रमाणे नक्कीच वाढेल, असेच शाळाचालकांचे मत होते 'समरहिल' शाळेत वेळापत्रक आहे पण ते शिक्षकांसाठी, मुले वर्गाला बसूही शकतात

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: कु. कन्या शिवाजी चव्हाण
वर्ग: BSC Biotech I<sup></sup>

पुस्तकाचे नांव: श्यामची आई
मो. नं.: 9028752053

लेखकाचे नांव: साने गुरुजी
किंमत: 100

प्रकाशकाचे नांव: रिया पब्लीकेशन
एकूण पृष्ठे:

आशय:

श्यामची आई हा साने गुरुजी यांनी लिहिलेला मराठी भाषेतील अतिशय प्रसिद्ध आणि हृदयस्पर्शी आत्मकथात्मक ग्रंथ आहे. नाशिकच्या कारागृहात असताना फेब्रुवारी 9 इ.स 1933 रोजी त्यांनी या पुस्तकाच्या लिखाणास प्रारंभ केला. या पुस्तकाच्या 3 लाखांपेक्षा अधिक प्रती खपल्या आहेत.

मातेबद्दल असणारे प्रेम, भक्ती व कृतज्ञता यांच्या अपार भावना 'श्यामची आई' या पुस्तकात मांडलेल्या आहेत. नाशिकच्या तुरुंगात साने गुरुजींनी ही कथा 9 फेब्रुवारी इ.स. 1933 रोजी लिहावयास सुरुवात केली आणि 13 फेब्रुवारी इ.स. 1933 रोजी पहाटे त्या संपविल्या.

साने गुरुजी यांनी श्यामची आई हे पुस्तक 'अनाथ विद्यार्थी गृह' या संस्थेस 1935 मध्ये प्रकाशनार्थ दिले. या संस्थेस या पुस्तकातून काही पैसे मिळावेत, हाही उद्देश होता.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: कु. प्रणाली पोपट पाटील — वर्ग: BSC III

पुस्तकाचे नांव: एक झुंज गोंगाटाशी — मो. नं.: 9975289152

लेखकाचे नांव: डॉ. यशवंत ओक — किंमत: 300 रु

प्रकाशकाचे नांव: राजहंस प्रकाशन — एकूण पृष्ठे: 455

**आशय:**

भोवताली विविध प्रकारच्या आवाजांनी आपलं जीवन पूर्णपणे व्यापून टाकलंय. वरे पशू-पक्ष्यांचे, वाऱ्याचे, समुद्राच्या लाटांचे आवाज ऐकू येणं इथपर्यंत ठीक आहे. या आवाजांची मानवालाही गरज आहे, पण याशिवाय दररोज असे काही आवाजही आपण ऐकत असतो जे मानवनिर्मित आणि त्रासदायक आहेत. यामध्ये फटाके, वाहनांचे हॉर्न्स, कंपन्यांमधील मशिन्सचे आवाज, भोंग्यांचे म्युजिक, सिस्टिमचे, टि.व्ही. विमानांचे, ॲम्ब्युलन्स–अग्निशमन दलाचे वाहन व पोलिसांच्या गाड्यांचे सायरन, रस्त्याच्या कडेला फळ विकणाऱ्याकडे असलेल्या रेकॉर्डेड आवाज आदींचा समावेश आहे. हे आवाज नुसते आवाज नाहीत तर गोंगाट आहेत. मनुष्यासह पशू-पक्ष्यांच्या जीवनशैलीवर ते विपरीत परिणाम करत आहेत. या आवाजांचा इतका अनिर्बंध वापर आणि अतिरेक झाला आहे की त्याविरोधात कडक पावलं उचलावी लागत आहेत.

हायकोर्ट, सुप्रीम कोर्टांनी देखील या गोंगाटाची दखल घेतेहे सर्व रोखण्यासाठी कठोर आणि महत्त्वाचे आदेश दिलेत. भारतातील कोर्टांनी या मोठ्या समस्येची दखल घ्यायला भाग पाडलंय एका अशा व्यक्तीने ज्यानं खऱ्या अर्थाने भारतात ध्वनी प्रदुषणाच्या लढ्याची मुहूर्तमेढ रोवली. डॉ. यशवंत ओक असं या कार्यकर्त्याचं नाव आहे. 'एक झुंज गोंगाटाशी' या पुस्तकाच्या निमित्तानं त्यांच्या कार्याची गरज, आवाका आणि संघर्ष आपल्या सर्वांना कळणं आवश्यक आहे.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: प्रतिक्षा चंद्रकांत कुलवान | वर्ग: BSc. I

पुस्तकाचे नांव: मन में है विश्वास | मो. नं.: 9373498195

लेखकाचे नांव: विश्वास नांगरे पाटील | किंमत: 200

प्रकाशकाचे नांव: विश्वास नांगरे पाटील | एकूण पृष्ठे: 250 Pages

आशय: सह्याद्रीच्या कुशीत आणि वारणेच्या कुशीत कोकरुड हे माझे गाव येथे रोज मळ्या पहाटे मशिदीवरील अजानाच्या ओव्यांनी किंवा ज्ञानेश्वरीच्या पारायणाने जाग येते, बारा बलुतेदार, मी उठतो आणि कागद-पेन घेऊन बसतो जो मनात येत १९८३ ते १९९७ या चोवीस वर्षाच्या कालखंडात जे आठवतं व सुचतं ते लिहित गेलो अभ्यास आणि रोजच्या जिवनाचा माझे शब्द अलंकारित किंवा जड नाहित, माझ्या लोकसंस्कृतीमधून आलेल्या दृष्टी नाही मनाच्या पडद्यावर जे दिसत ते रेखाटत जातो खेड्यातल्या प्रत्येक सामान्य मुलाचे जे भावविश्व आणि जगणं असतं तेच माझेही होते त्यात असामान्य किंवा गमतीदार असते काहिच नाही मात्र वेड्यावाकड्या अवघड काट्याकुट्यांनी आणि खाचखळग्यांनी भरलेल्या या स्वप्नाच्या प्रवासाच्या माझ्या वाटेवरच्या जिद्दीपणाची कहाणी रेखाटताना प्रत्येक सामान्य संदर्भातून आकांक्षांना प्रेरणा देणारे प्रसंग मला सापडतात या प्रसंगांची गुंफण करताना अनेक हितचिंतक भेटतात खरं तर ज्या वेळी बी.ए.ला प्रवेश घेतला त्यावेळी आपल्या पदवी घेतल्यानंतर आयपीएस होणं आपलं ध्येय आणि आरशामध्ये यु.पी.एस.सी च्या अंतिम यादित विश्वासरावांची मुद्रा विशेष करुन

ध्येयाचा पाठलाग होताना अनेक ब्रेक लागायचे वेगाने भागायच्या अनेकदा दोरी तुटलेल्या पतंगासारखी स्थिती व्हायची माझ्या डोळ्यात भोळीभाबडी स्वप्न होती त्यांना प्रयत्नांची कष्टाची जोड दिली जेवढा मोठा संघर्ष, तेवढं मोठं यश। काळ बदलतो वेळ बदलते पात्र बदलतात आणि भूमिकाही बदलतात, मनाताल स्वप्नांना जिवंत करण्याची साथ मारीन तिथं पाणी काढण्याची जिद्द आणि अंतिम संघर्ष करण्याची तयारी ठेवावी लागते

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: माधुरी शरद साळुंखे. वर्ग: M.Sc.-II [Maths]

पुस्तकाचे नांव: मृत्युंजय मो. नं.: 9552746397

लेखकाचे नांव: शिवाजी सावंत किंमत: ₹395

प्रकाशकाचे नांव: मेहता पब्लिशिंग हाऊस एकूण पृष्ठे: 757

आशय: "मृत्युंजय" हे कादंबरीकार शिवाजी सावंत यांचे एक अत्यंत प्रसिद्ध आणि प्रभावी कादंबरी आहे. या कादंबरीत, सावंत यांनी महाभारतातील कर्ण या पात्राच्या जीवनाची गाथा मांडली आहे.

"मृत्युंजय" कादंबरी कर्णाच्या दृष्टिकोनातून महाभारताची कथा सांगते. कर्ण हे एक महान योद्धा होते. त्यांच्या जीवनातील अडचणी, त्यांच्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या विरोधाची किमया, तसेच त्यांचे नैतिक व व्यक्तिगत संघर्ष पुस्तकाच्या मध्यवर्ती गाभ्यात आहेत. या कादंबरीत कर्णाच्या अंतःकरणातील द्वंद्व, त्याचे संघर्ष, त्याच्या स्वप्नांची परिपूर्ती, आणि त्याच्या जीवनाचे सत्य अत्यंत संवेदनशीलपणे चित्रित केले आहे.

कर्णाची कथा केवळ युद्धाची किंवा वीरतेची कथा नाही, तर ती एक गहन जीवनप्रश्नांची, निर्णयाच्या कठीण क्षणांची आणि नैतिकतेच्या मुद्यांची मांडणी करते. त्याचे निर्णय आणि त्याच्या मानसिक अवस्था कादंबरीतून उलगडत जाते.

शिवाजी सावंत यांच्या लेखन शैलीत गोडवा आहे. ते वाचकाला कर्णाच्या मनाच्या गाभ्यात प्रवेश करण्याची संधी देतात. संवाद, भावनात्मक गाभा, काव्यात्मक अभिव्यक्ती या सर्वांनी ही कादंबरी वाचकाला वेगळा अनुभव देते. कर्णाच्या जीवनाची गाथा त्याच्या शौर्याच्या पलीकडे जाऊन त्याच्या मनातील गहिर्या शंके आणि दुःखांचा विचार करते. तो शुद्ध

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: कु. प्रणाली अजित कांबळे — वर्ग: M.Sc-II (Maths)

पुस्तकाचे नांव: चाँदण्यात भिजायचं राहून जाऊ नये, म्हणून! — मो. नं.: 9075049402

लेखकाचे नांव: डॉ. आण्णासाहेब. ह. साळुंखे — किंमत: 100.

प्रकाशकाचे नांव: लोकायत प्रकाशन, सातारा — एकूण पृष्ठे: 92

**आशय:**

लेखक डॉ. आ. ह. साळुंखे यांची अनेक पुस्तके आजवर प्रकाशित झाली आहेत. त्यातीलच एक पुस्तक म्हणजे 'चाँदण्यात भिजायचं राहून जाऊ नये, म्हणून!' अगदीच 92 पानांत समावलेला हा एक अनुभव लेखांचा संच आहे. या पुस्तकातल्या प्रत्येक लेखाला विशेष नावे देण्यात आली आहेत. त्यामुळे तो लेख वाचण्याची उत्सुकता टिकून राहते. पुस्तकाच्या नावावरूनच लक्षात येतं की लेखकाला माणसाच्या जगण्याकडे बघायचा संकुचित होत असलेला दृष्टिकोन विस्तृत करायचा आहे. माणूस मोठमोठ्या इच्छा-आकांक्षा बाळगून बसतो व त्याच्या आजूबाजूला असणाऱ्या लहान-सहान गोष्टींतून मिळणाऱ्या आनंदाला मात्र मुकतो असा साधारण पुस्तक लेखनामागचा लेखकाचा उद्देश लक्षात येत जातो.

या पुस्तकात एकूण 29 छोटी-मोठी प्रकरणं आहेत. पण प्रत्येक प्रकरणाची एक स्वतंत्र विचारसरणी आहे. आपल्या अनुभव कथनातून लेखकाला पुढल्या पिढीच्या निकोप आनंदासाठीची शिदोरी करून ठेवायची आहे. अगदी साध्या सोप्या उदाहरणातून लेखक विविध प्रसंगाची कारणमीमांसा करतो.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: कु. मानसी भगवान सोनवलकर वर्ग: BA-II

पुस्तकाचे नांव: ययाति मो. नं.: 9325813729

लेखकाचे नांव: वि. स. खांडेकर किंमत: 295 ₹

प्रकाशकाचे नांव: मेहता पब्लिकेशन्स एकूण पृष्ठे: 432 ₹

**आशय:**

'ययाति ही एक पौराणिक उपाख्यानातील धाग्यादोऱ्यांवर आधारलेली आजच्या आधुनिक काळातील मानवी भावभावना, निती अनिती, मत्सर, मानवी प्रेम अशा अनेक पैलूंचे दर्शन घडवणारी कादंबरी. पुराणकथा ह्या केवळ भाकडकथा नसून त्या मानवी श्रम व आयुष्यातील शाश्वत तत्वे यांबद्दल माहिती देणाऱ्या कथा आहेत हे 'ययाति' वाचल्यावर समजते. आजच्या आधुनिकतेच्या जगात अनेक अतर्क्य गोष्टी घडत आहेत. पुराणातील चमत्कारांपेक्षाही, तंत्रज्ञानाचे शोध ज्यास्त चमत्कारीक आहेत. परंतु पुराणकथातील पैलू हे या सामाजिक जिवनाचा आधार आहेत. पुराणकथांत जे भीषण-संघर्ष आढळतात, त्यांचे मंथन करण्याइतकी शक्ती लेखकाच्या चिंतनात असेल आणि जीवन एका बाजूने जसे क्षणभंगुर आहे, तसेच ते दुसऱ्या बाजूने चिरंतन आहे. या गोष्टीचे आकलन झाले असेल तर पुराणकथांतून एक उत्तम कलाकृती कशी निर्माण होऊ शकते याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे 'ययाति'

'ययाति' ही कादंबरी ययातीची काम कथा आहे, देवयानीची संसार-गाथा आहे, शर्मिष्ठेची प्रेमकथा आहे तर कचाची भक्तिगाथा आहे कलात्मक रंजन, भावनांचे आवाहन, सामाजिक शिकवण आणि सुक्ष्म किंवा स्थूल जीवन दर्शन अशा अनेक पातळ्यांवर ही कलाकृती एकाच वेळी विहार करु शकते.

या कथेतील मुख्य पात्र म्हणजे 'ययाति' यात ययाति हा आजच्या सामान्य मनुष्याचा प्रतिनिधी आहे. कथेतील ययाति हा वासनेच्या आहारी गेल्यामुळे, तो त्याच्याच स्वैर भावनेला बळी पडला आहे. पुराणातला ययाति अनिर्बंध वासनेच्या समुद्रात किती बुडाला आहे याचे चित्रण करण्यात आले आहे. परंतु आजच्या काळात मनुष्य हा वासनेबरोबरच क्रोध, मत्सर, मोह यांच्या आहारी जाऊन स्वैर झाला आहे. त्याचे सर्वच मनोविकार अनिर्बंध व अनियंत्रीत होत आहेत. एखाद्या ध्येयाशी

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: कोराणे सानिका राजाराम   वर्ग: B.A. III

पुस्तकाचे नांव: इतिहासाला कलाटणी देणारा महापुरुष लोकराजा शाहू   मो. नं.: 9168336038

लेखकाचे नांव: प्रा. एन. डी. पाटील.   किंमत: ₹ 80

प्रकाशकाचे नांव: त्र्यंबकेश्वर मिरजकर   एकूण पृष्ठे: 40

आशय: कोल्हापूर संस्थानातील कागलच्या घाटगे घराण्यातील दिनांक जुलै, 1874 रोजी जन्माला आलेला हा मुलगा 17 मार्च, 1884 रोजी कोल्हापूरच्या गादीवर बसला. दि. २ एप्रिल, 1894 रोजी हा राजा वयात आल्यावर त्याने आपल्या हातात कोल्हापूरच्या राज्यकारभाराची सूत्रे घेतली आणि फक्त 28 वर्षे राज्य केले. 28 वर्षात शाहूराजा केवळ कोल्हापूरचा राजा राहिला नाही. तो अखिल महाराष्ट्राचा अनभिषिक्त सम्राट झाला, बहुजन समाजाच्या आणि विशेषत: पददलित जनतेच्या गळ्यातला ताईत बनला. राजेरजवाडे नष्ट झाले, त्यांचे राजवाडे धुळीला मिळाले, त्यांचे तनखे रद्द झाले, त्यांचे खास हक्क लयाला गेले. त्यांची नामनिशाणी देखील शिल्लक झाली नाही; आणि येथून पुढेही होऊ शकणार नाही. कारण शाहूराजांचे मोठेपण त्यांच्या राजेपणात नव्हते. ते त्यांच्या अंगभूत गुणात होते.

महाराजांच्या सामाजिक व राजकीय कार्यामुळे त्यांना दोन प्रकारचे विरोधक निर्माण झाले. त्यांनी हातात घेतलेल्या सामाजिक सुधारणांमुळे व जातिनिर्मूलनाच्या चळवळीमुळे सनातनी धर्ममार्तंड आणि जन्मजात श्रेष्ठत्वाच्या टेंभा मिरविणारे लोक शाहू महाराजांना पाण्यात पाहत. त्यांनी मुंबई सरकारचे कान महाराजांविरुद्ध फुंकण्याचा प्रयत्न केला.

S.R. Kodane

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: नेहा देवेंद्र सपकाळ  वर्ग: B.A III

पुस्तकाचे नांव: कर्मवीर भाऊराव पाटिल  मो. नं.: 7420992915

लेखकाचे नांव: शिशन बाबालाल मोमीन  किंमत: ५० रु

प्रकाशकाचे नांव: त्र्यंबकेश्वर मिरनकर नाग- नालंदा  एकूण पृष्ठे: ५६

आशय:

कोणत्याहि समाजाच्या बाबतीत घडलेली उत्पिडनाची घटना असो अन्यायग्रस्त व्यक्तीची जात लक्षात न घेता न्याय मिळवून देण्यासाठी समाज एकवटला कसा जात नाही! का अजून आपण आपल्या जातीच्या गुंत्यात अडकून पडली आहेत? कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शंभर वर्षापूर्वी अंगीकारलेले मानवता पेलण्याची क्षमता का अजूनही आपल्या अंगी येऊ शकत नाही? त्यांनी स्वीकारलेल्या मानवतेच्या धर्माची बैठक किती पक्की होती? प्रचलित सारे धर्म सार्‍या मानवजातीला समान न्याय कधी देतील? ज्यांना जनावरांच्या स्पर्श चालतो, त्यांच्या मनातून माणसाच्या स्पर्शाची हीन जळमटे कधी जळून जातील? कोणत्या ना कोणत्या प्राण्यामध्ये कोणत्या ना कोणत्या स्वरूपाच्या देवत्वाचे त्यांनी दर्शन होत असते, समाजाला दिशा देण्यात आणि नव्याचा शोध लावण्यात रयत शिक्षण संस्था कर्मवीर अण्णांच्या काळापासून अग्रेसर राहिली आहे.

आठ दशकांपूर्वी जात, धर्म, पंथ यांचा लवलेश मनात न बाळगता सर्वांना विकासाची समान संधी देणाऱ्या घटना कर्मवीर भाऊराव पाटिल यांच्या मनाच्या विशाल मर्यादा दर्शवितात आणि मानवतेच्या धर्माला बळही पुरवत राहतात.

Sapkal

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर**

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: अक्षता धनाजी पाटील — वर्ग: M.A.II (मराठी)

पुस्तकाचे नांव: पानिपत — मो. नं.: 8999539262

लेखकाचे नांव: विश्वास पाटील — किंमत: 350 रुपये

प्रकाशकाचे नांव: राजहंस प्रकाशक, पुणे — एकूण पृष्ठे: 395

**आशय:**

मराठा साम्राज्याच्या विस्ताराच्या काळात घडते, जेव्हा मराठ्यांनी हिंदुस्तानातील अनेक प्रदेशांवर वर्चस्व प्रस्थापित केले जाते. अफगाण शासक अहमदशाह अब्दालीने भारतावर आक्रमण केले आणि त्याला थांबवण्यासाठी मराठ्यांनी उत्तर भारतात मोठ्या सैन्याच्या आधारे कूच केली.
पानिपतच्या मैदानावर झालेल्या निर्णायक युद्धाचे आणि त्यामधील रक्तरंजित घटनांचे सजीव चित्रण केले आहे. लाखो सैनिकांचा मृत्यू, पराभवाचे परिणाम, आणि मराठ्यांची शौर्यगाथा भावपूर्ण पद्धतीने मांडली आहे.
हे युद्ध केवळ मराठ्यांचे नसून, ते हिंदुस्थानातील एकतेसाठी लढलेले होते. मराठ्यांनी हिंदवी स्वराज्यासाठी दिलेला त्याग आणि आणि प्रामाणिक लढ्याचे महत्त्व महत्त्व अधोरेखित केले आहे. हे युद्ध पराभवाचे प्रतीक असले तरी, त्यातून आपल्याला शौर्य, संघटन, आणि समर्पण यांची शिकवण मिळते. मानवी भावना, नाते संबंध, स्वार्थ, आणि राजकारण यांचे मिश्रण या ऐतिहासिक घटनांमध्ये अधोरेखित केलं आहे. मराठ्यांनी हिंदुस्थानातील अफगाण आक्रमण अहमदशाह अब्दालीचा सामना करण्यासाठी घेतलेले कठोर निर्णय आणि त्यामागील धडपडी स्पष्ट केली आहे.
या युद्धाला फक्त मराठ्यांचे वैयक्तिक युद्ध म्हणून पाहणे चुकीचे ठरते कारण हे हिंदुस्थानाच्या सांस्कृतिक अस्तित्वा-साठीचे युद्ध होते. देशाच्या एकतेसाठी आणि स्वातंत्र्यासाठी असलेली निष्ठा आणि बलिदान या कथेचा केंद्रबिंदू आहे. या पानिपतच्या लढाई मध्ये मराठ्यांच्या असीम शौर्याचा, धैर्याचा, आणि आत्मबलिदानाचा आदर्श आहे. या लढाईने मराठ्यांचे वर्चस्व काही काळासाठी कमी झाले, पण त्यांच्या लढाईने संपूर्ण हिंदुस्थानात प्रेरणादायी संदेश दिला.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्यांचे नांव: कु. वर्षा संदिप निकम. वर्ग: B.com - II

पुस्तकाचे नांव: आपण जिंकू शकता. मो. नं.: 7028169160

लेखकाचे नांव: शीव खेडा. किंमत: 300 ₹

प्रकाशकाचे नांव: मॅकमिलन इंडिया लिमिटेड एकूण पृष्ठे: 304

आशय: यशस्वी कामगिरी करण्यांकरीता प्रभावी साधन.

"विजेते वेगळ्या गोष्टी
करत नाहीत.
ते गोष्टी वेगळ्याप्रकारे
करतात."

यशस्वी होणं याचा अर्थ कधीही अपयश न मिळणं असा नसून अंतिम ध्येय गाठणं असा आहे. याचा अर्थ प्रत्येक लढाई जिंकणं असा नसून युद्ध जिंकणं असा आहे.

- एडविन. सी. ब्लिस.

आयुष्यात अक्षरशः भरकटत गेलेले लोक आपल्याला भेटतात. नशिबाने जे घडेल ते सर्व स्वीकारतात. त्यांतील काही चुकूनमाकून, अपघाताने यशस्वी होतानही, परंतु बहुतेकजण वैफल्य आणि असमाधान यांनी आयुष्यभर ग्रासलेले असतात.

हे पुस्तक अशा निराश व असमाधानी लोकांसाठी नाही. यशप्राप्तीसाठी लागणारा निर्धार तर त्यांच्याजवळ नसतोच, पण यश मिळविण्यासाठी आवश्यक असणारा वेळ देण्याची आणि प्रयत्न करण्याचीही त्यांची तयारी नसते.

हे पुस्तक तुमच्यासाठी आहे. तुम्ही हे पुस्तक वाचत आहात ही वस्तुस्थितीच तुम्हाला तुमच्या आताच्या आयुष्यापेक्षा अधिक समृद्ध आणि परिपूर्ण आयुष्य जगण्याची इच्छा आहे हे दर्शविते.

- हे पुस्तक कशा प्रकारचे आहे?

एका अर्थाने या पुस्तकाचं स्वरूप हे एखाद्या वास्तुरचनाविषयक माहितीपुस्तकेप्रमाणेच आहे. यशासाठी वास्तुरचनेप्रमाणेच पायाभरणी करण्यापासून ते यशाची, कर्तृत्वाची भक्कम इमारत कशी उभारावी, विजयाची कमान, त्यासाठी कोणती साधने वापरावीत या सर्व बाबींचे समर्पक उदाहरणे देऊन विवेचन केले आहे.

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: निशा विलास लाखे — वर्ग: BSC II

पुस्तकाचे नांव: ययाति — मो. नं.: 9529501598

लेखकाचे नांव: वि. स. खांडेकर — किंमत: 230 रु

प्रकाशकाचे नांव: मेहता पब्लिशिंग हाउस — एकूण पृष्ठे: सुमारे 275-300

**आशय:**

कै. विष्णु सखाराम तथा भाऊसाहेब खांडेकर यांच्या एकूण साहित्य-कृतींच्या रत्नमाळेतील ययाति ह्या कादंबरीचे स्थान मेरुमण्यासारखेच आहे. वि. स. खांडेकरांना ययाति कादंबरीने मराठी वाङ्मय क्षेत्रातील सर्वोच्च अशा ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित तर केलेच तसेच लौकिक हि दिला.

ययाति हि ययातीच्या न संपणाऱ्या उपभोगाच्या लालसेची कथा आहे. तो उर्मट, महत्वाकांक्षी, स्वप्नातही ज्याला ठाउक नाही असा ययाति आहे, मनात विष आणि प्रेमभंगाने तिची द्विधा अवस्था आहे, स्वतः त्या सुखाच्या पलिकडे सहज पाहणारी; ययातिवर निस्वार्थी प्रेमाचा वर्षाव करणारी शर्मिष्ठा आहे, आणि निरपेक्ष प्रेम हा ज्याचा स्वभावधर्म होउन विचारी, संयमी, ध्येयवादी कच या प्रमुख चार पात्रांमधील परस्पर प्रेमाची विविध स्वरुपे या कादंबरीत समर्थपणे चित्रित केलेली आहेत.
या प्रमुख पात्रांच्या चार प्रमुख प्रवृत्त्या आहेत. प्रत्येकाचा स्वभाव, जडणघडण आणि उदि्दष्ठे वेगळी आहेत.
सगळी सुख ज्याच्या पायात लोळण घेउ शकतात असा महापराक्रमी राजा आपल्या पत्नीपासून (देवयानी) पासुन शरीराने, मनाने नेहमी दुरच राहिला. देवयानीच्या सौंदर्याला भाळून कुठलाही विचार न करता तिच्याशी लग्न करुन बसला आणि नंतर तिचा स्वभावदोष पाहुन त्याला झालेला पश्चाताप आपल्याला यातून पाहायला मिळतो. वासनेला अंत नाही या चिरंतर सत्याचे भयाण रुप यात मांडले आहे. राजा ययाति हा चंद्रवंशाचा एक पराक्रमी राजा असून त्याला लालसेची, इच्छापूर्तीची तीव्र इच्छा आहे. ययाति आपल्या तरुणपणात अनेक सुखसोयींचा उपभोग घेतो, पण तारुण्य

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: श्री. आगार प्रकाश कमाते. — वर्ग: M.A. - I[st]

पुस्तकाचे नांव: कॉग्नेटिव्ह बिहेविअरल थेरपी (C.B.T) — मो. नं.: 8830583371

लेखकाचे नांव: डॉ. सेठ जिलिहल — किंमत: 290

अनुवाद - प्रसाद ढापरे

प्रकाशकाचे नांव: मायमिरर पब्लिशिंग हाऊस — एकूण पृष्ठे: 223.

आशय:

सी.बी.टी. ही एक पद्धत आहे जी विविध मानसिक उपचारामध्ये काम करते जसे की: ① ऑब्सेसिव्ह - कंपल्सिव्ह डिसऑर्डर (OCD), ② पोस्ट - ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर (PTSD) साठी प्रदीर्घ एक्स्पोजर, ③ बॉर्डरलाइन पर्सनॅलिटी डिसऑर्डरसाठी डायलेक्टिकल बिहेविअर थेरपी ④ पॅनीक डिसऑर्डरसाठी पॅनिक कंट्रोल थेरपी.

या सर्व उपचार पद्धतीमध्ये C.B.T ची फुलकाते वापरली जातात व त्यांच्या मदतीने या समस्या सोडवल्या जातात या पुस्तकात सिद्धांत कसे वापरायचे याची सर्व माहिती लेखकाने उत्तम उदाहरणेदाखले देऊन सांगितली आहे. C.B.T ची उपचार करणाऱ्या व्यक्तीची भूमिका ही समस्या सोडवण्याची असते असे या पुस्तकात लेखकाने नमूद केले आहे.

लेखक हे लुसी एक फॉल्कनब्रिज पी एच डी पेन्सिल्वेनिया विद्यापीठाच्या पेरेलमन स्कूल ऑफ मेडिसिन येथे वजन आणि खाण्याच्या विकारांच्या केंद्रामध्ये मानसशास्त्राच्या क्लिनिकल सहाय्यक प्राध्यापक आहेत. त्यांनी आतापर्यंत वेगवेगळी 18 पुस्तके प्रकाशीत केली आहेत. या पुस्तकाचा अनुवाद प्रसाद ढापरे यांनी केला असून त्यांची 7 पुस्तके प्रसिद्ध आहेत. या पुस्तकात वापरलेली भाषा अत्यंत सोपी समजण्यासाठी अत्यंत सुमधुर आहे. या पुस्तकात उत्तम प्रकारचा कागद वापरला असून तो जाड आहे व यावर आकृत्याही सुबक रेखाटण्यात आल्या आहेत.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: Anagha Laxmikant Nalchate  वर्ग: M.A. I

पुस्तकाचे नांव: सायकोथेरपीज मानसोपचारांचा इतिहास ते भविष्यवेध  मो. नं.: 9764008877

लेखकाचे नांव: अच्युत गोडबोले, आभावरी निफाडकर  किंमत: 350

प्रकाशकाचे नांव: शरद अष्टेकर मधुश्री प्रकाशन पुणे.  एकूण पृष्ठे: 385

आशय:

मानसिक आजार आणि त्यांच्याबद्दलच्या पूर्वीपासूनच्या कल्पना मनोरुग्णालयांचा इतिहास अगदी संपूर्ण मानसोपचारांची आधुनिक उपचारांपर्यंत झालेल्या प्रवासाचा लेखाजोखा असणार, मानसोपचारांची ओळख करून देणार, CBT आणि REBT या मानसोपचारांची भर होणार तसेच मानसोपचारांच्या भविष्यवेध घेणार पुस्तक म्हणजे 'सायकोथेरपीज' होय.

ह्या मध्ये इतिहास आणि थेरपीज हा भाग क्र. 1, असून भाग क्र. 2 मध्ये CBT आणि REBT असे भाग आहेत, सायकोथेरपीज-ची पार्श्वभूमी, सायकोॲनॅलेसिस आणि सायकोडायनॅमिक थिअरीज - ओळख, मानसोपचारांमधली पहिली वैज्ञानिक थेरपी - फ्रॉईडियन थेरपी युंग थिअरी / थेरपी, प्ले थेरपी, बिहेवियरल थेरपीज, जॉन वॉटसन, इतर थेरपीज आहेत. तसेच एरिक एरिक्सन-ची आपली मानसिक प्रगती - एरिक्सनच्या थिअरीज माणसाच्या आयुष्यात आठ मानसिक अरिष्टे त्याचे टप्पे - 1) जन्मापासून ते मृत्यु - पूर्णत्व विरुद्ध हताश सर्व टप्पे अत्यंत चांगल्या प्रकारे मांडली. तसेच एरिक बर्न आणि थॉमस हॅरिस ट्रॅन्झॅक्शनल ॲनॅलेसिस यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अभ्यास स्वत्वाच्या किंवा इगोच्या अवस्था 'पालक (पेरेंट-पी)' 'परिपक्व-विवेकवादी तरुण (ॲडल्ट)', मुलगा (चाईल्ड-सी) हे पी-सी-ए मॉडेल फ्रॉईडच्याच सुपरइगो, इगो आणि इड या संकल्पनेवर आधारलेले होते 'शरीराला ताप येतो तसाच मनालाही ताप येतो! मनाच्या तापाची लक्षणे आणि त्यावरचे उपाय - प्रत्येकाने समजून घ्यावे यासाठी हे पुस्तक!" 'कोणालाही उत्तम करेल व आपल्या भावनिक व मानसिक त्रासातून बाहेर येण्याची दिशा दाखविण्याचे काम हे पुस्तक निश्चित करेल यात शंका नाही. नक्की वाचावे व कृतीत आणावे असे पुस्तक!' या पुस्तकात वाचक, तसेच मानसिक आरोग्यशास्त्राचे अभ्यासक यांच्यासाठी मनोरंजक अंतर्दृष्टी आणि किस्से आहेत, एक अभ्यासक आणि शिक्षणतज्ञ म्हणून मी या पुस्तकाची शिफारस सर्वांना करेन!

धन्यवाद!

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: कु. प्रियांका सचिन कुरुडे वर्ग: BCA III

पुस्तकाचे नांव: झेप मो. नं.: 9730268582

लेखकाचे नांव: ना. स. इनामदार किंमत: २२५

प्रकाशकाचे नांव: कॉन्टिनेन्टल प्रकाशन एकूण पृष्ठे: ३३९

आशय: "झेप" हे न. सि. इनामदार यांनी लिहिलेले ऐतिहासिक कादंबरी असून, यामध्ये मराठा साम्राज्याच्या अस्तकालातील एका विस्मृतीत गेलेल्या नायकाची कथा मांडली आहे.

कथेचा केंद्रबिंदू त्रिंबकजी डेंगळे यांचा जीवनप्रवास आहे. त्यांनी साध्या शेतकऱ्याच्या कुटुंबातून पुढे येत, पेशव्यांच्या दरबारात कारभारी पद मिळवले. त्यांच्या कारकिर्दीचा प्रारंभ हा साधेपणाने झाला, परंतु त्यांनी आपल्या धैर्याने आणि चातुर्याने स्वतःचे स्थान निर्माण केले. पेशवे बाजीराव द्वितीय यांच्यासोबत त्यांचे नाते, इंग्रजांविरुद्ध दिलेली लढाई, मराठा साम्राज्य टिकवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आणि त्यासाठी त्यांनी सहन केलेल्या यातना या सर्व गोष्टी कादंबरी तपशीलवार मांडल्या आहेत.

त्रिंबकजींनी इंग्रजांविरुद्ध उभारलेला लढा ही कादंबरीची मुख्य ताकद आहे. त्यांनी मराठा सत्ताधीशांना एकत्र करण्याचा प्रयत्न केला, पण त्यात अनेक अडचणी आल्या. त्यांचा धैर्यशील स्वभाव, चिकाटी, आणि संकटांना सामना करण्याची तयारी हे त्यांच्या जीवनाचे मुख्य पैलू आहेत.

"झेप" कादंबरी आपल्याला धैर्य, जिद्द, आणि देशभक्तीचे

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: आरती भास्कर बरोडे — वर्ग: BCS-II

पुस्तकाचे नांव: झूंज — मो. नं.: 8329373253

लेखकाचे नांव: ऐश्वर्य पाटेकर — किंमत: ₹ 375

प्रकाशकाचे नांव: सकाळ पेपर्स प्रा. लि. — एकूण पृष्ठे: 383

**आशय:**

झुंज या एकाच शब्दात या आत्मकथनाचे वर्णन करता येईल. एका निरक्षर आणि निराधार माऊलीने थकणारे हात अन् अभंग मनोबल यांच्या बळावर, आपल्या लहानग्यांच्या सोबतीनं सर्व प्रकारच्या संकटांशी झुंज दिली आहे आणि संकटांनाच पराभूत केले आहे. तिने झुंज दिली भूकेशी..... दारिद्र्याशी.... नियतीशी.... नात्या-गोत्यातील माणसांशी.... नवरा म्हणून जीवनात आलेल्या नराधमाशी ---- जीवापाड सांभाळण्याचा प्रयत्न करूनही विसकटून गेलेल्या संसा-राला चूड लावणाऱ्या साऱ्या विपरीततेशी. 'जो दुःखाने दुःखी होत नाही, तो दुःखाला दुःखी करतो' या कविवचनाचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे श्रमदेवता म्हणून पुजावी, अशी ही लेखकाची आई. शस्त्राचं बळ, संपत्तीचं बळ, शब्दांचं बळ यापेक्षाही बळ हवे ते आत्मबळ ते किती श्रेष्ठ आणि शाश्वत असते याचा साक्षात्कार घडवणारे हे लेखन. यातील शब्दाला घामाचा सुगंध आहे. प्रेमाचा ओलावा आहे. त्यागाचा स्पर्श आहे आणि समर्पणाचे तेज आहे. 'आई' या शब्दाचे विस्तारलेले तेजस्वी आभाळ म्हणजे हे आत्मवृत्त. निवडक प्रसंगांचे सरळपणे केलेले काव्यात्म चित्रण हे ऐश्वर्य यांच्या या लेखनाचे शक्तिस्थान आहे.

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: सानिका संजय पाटील | वर्ग: B.A.III

पुस्तकाचे नांव: उपरा | मो. नं.: 7028057389

लेखकाचे नांव: लक्ष्मण माने | किंमत: २२० रु

प्रकाशकाचे नांव: दिनकर गांगल | एकूण पृष्ठे: १५७

**आशय:**

आपल्या भारत देशात अस्पृश्यता मोठ्या प्रमाणात होती. त्यामध्ये अनेक जाती-जमातींचा समावेश होता. त्यातीलच एक म्हणजे कैकाडी समाज बांधव. त्याच समाज बांधवांच्या जीवनावर व त्यांच्या राहणीमानावर आधारित असणारं हे आत्मकथन आहे. कैकाडी समाज हा एका जागी कधीच स्थिर नसणारा वर्ग आहे आणि त्यातील लक्ष्मण बापु माने यांनी आपल्या शिक्षणासाठी घेतलेले कष्ट सांगणारा, स्वतःची परिस्थिती सांगणारं आत्मकथनावर आधारित असणार पुस्तक म्हणजेच उपरा होय.

या पुस्तकातून लक्ष्मण माने यांनी त्यांच्या खडतर प्रवासाचं वर्णन केलच त्याचबरोबर त्यांनी त्यांच्या समाजात असणाऱ्या रूढी-परंपरा देखील सांगितल्या आहेत. त्यांनी ह्या पुस्तकात ग्रामीण भाषेचा वापर केला आहे. कैकाडी समाज हा कधीच स्थिर नसतो. ह्या शहरातून दुसऱ्या शहरात असंच त्यांचं आयुष्य असतं. त्यांचं संपुर्ण आयुष्य हे वेगवेगळ्या शहरात राहण्यातच निघुन जातं. गाढवांच्या पाठीवर संपूर्ण संसाराचा पसारा देण्याचा आणि चालत राहयचं हे असतं कैकाडी आयुष्य म्हणूनच या कथेला उपरा असे नाव देण्यात आले आहे. उपरा म्हणजे ज्याला कोणीच आधार नाही असा. या कथेला मराठी साहित्य अॅकॅडमीचा पुरस्कार मिळाला आहे.

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: कदम निथली बाळासो — वर्ग: BSC-1

पुस्तकाचे नांव: श्रीमान योगी — मो. नं.: 9322738803

लेखकाचे नांव: रणजित देसाई — किंमत: 950

प्रकाशकाचे नांव: मेहता पब्लिशिंग — एकूण पृष्ठे: 1200

**आशय:**

'स्वामी' नंतर रणजित देसाईंची महत्वाकांक्षी कादंबरी म्हणजे 'श्रीमान योगी'. स्वामीनंतर तब्बल सात वर्षांनी श्रीमानयोगी वाचकांपुढे सादर झाली. या पुस्तकाच्या नावातूनच पुस्तकाचा भारदस्तपणा वाचकांच्या मनाला स्पर्श करतो.

शिवाजी महाराजांच्या अष्टपैलू, अष्टावधानी युगपुरुषाची व्यक्तीरेखा उभी करणे हे प्रचंड मोठे आव्हानच. कारण शिवचरित्राबाबत इतिहासकारांत जेवढे दुमत आहे तेवढे दुमत असलेले दुसरे चरित्र नाही. शिवाजी महाराजांच्या जन्मापासून त्यांच्या मृत्युपर्यंत इतिहासकारांचे दृष्टिकोन वेगळे. अशा अडचणीतून मार्ग काढून ललित वाङ्मयाच्या रूपात महाराजांना साकार करण्याचे काम जिकरीचे, त्यातून शिवाजी महाराजांची ही व्यक्तिरेखा फार मोठी आहे. तिचे शेकडो पैलू आहेत. शिवचरित्र हे कलावंतापुढे कालातीत राहणारे असे आव्हान आहे. मराठी ऐतिहासीक कादंबरीच्या प्रांतात महाराजांना मराठी ललित वाङ्मयात वास्तवरूपात प्रथम चित्रित करण्याचे श्रेय निश्चित रणजित देसाई यांचे आहे.

स्वामीप्रमाणेच मराठी मनात अढळ स्थान प्राप्त करणारी ही कादंबरी आहे हे निश्चित.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: swaraj sambhaji yadav    वर्ग: BSC.CS

पुस्तकाचे नांव: छावा    मो. नं.: 8010954520

लेखकाचे नांव: shivaji sawant    किंमत: 360रु

प्रकाशकाचे नांव: शिवाजी सावंत    एकूण पृष्ठे: 886

**आशय:**

संभाजीराजांचे हे स्फूर्तीदायक चरित्र. लेखक शिवाजी सावंत यांच्या या पुस्तकानं मराठी मनाला वेड लावलं 1947 साली या पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली. आजतागायत संभाजीमहाराजांच्या पराक्रमाच्या वर्णनाची मोहिनी कायम राहीली आहे. संभाजीराजांचे तामसी, अविचारी रूप पुसून संवेदनशील, हळवं करारी आणी देशप्रेमी रूप या चरित्रातून हमोरचर होतं. संभाजीराजे रच्च व्यसनाध असते तर शिरकाच्या कठोर सजेच्या प्रसंगी करुच हसवले असते. कारण ती सजाच तेवढी क्रुर आणी अमानवी होती; असं सावंत आपल्या शब्दातून दाखवून देतात. शिवाजीराज्यांचे पुत्र त्यांना शोभणारे वीर, साहसी होते, यांनी त्यावर प्रकाश टाकला आहे. सावंत यांची रसाळ, ओघवती शैली ऐतिहासिक प्रसंग उभे करताना अधिकच खुलते. पानोपानी उत्कंठा वाढत जाते. वाचकाला खिळवून ठेवण्याची ताकद कादंबरीचेही सामर्थ्य आहे.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: निवृत्तीनाथ राजेंद्र आळवेकर — वर्ग: BA III

पुस्तकाचे नांव: पक्षी घरटी कशी बांधतात — मो. नं.: 7270511251

लेखकाचे नांव: श्रीकांत तापीकर — किंमत: 30

प्रकाशकाचे नांव: बाल विश्व — एकूण पृष्ठे: 32

आशय:

लहानांपासून थोरांपर्यंत पक्ष्यांबद्दल एक कुतूहल असते आकर्षण असते. पक्षी निरीक्षण हा एक आनंददायी छंद आहे.

पक्षी घरटी कशी बांधतात? या लहान पुस्तकात मी विविध पक्ष्यांचे वर्णन व पक्षी घरटी कशी बांधतात, कशाच्या साहाय्याने बांधतात हे चित्रांसह दाखविलेले आहे.

हा एक वेगळा पण प्रामाणिकपणे त्यांने केलेला प्रयत्न आहे. पक्षी हा विषय अपार सागराप्रमाणे आहे. पक्ष्यांबद्दल तुम्ही जेवढे वाचाल तेवढे तुमचे उत्तम राहण्यास मदत होईल.

पक्ष्यांचा रंग पहा, त्यांच्या शरीर रचना पहा, त्यांच्या सवयी पहा. त्यांची विविध आकाराची घरटी पहा. त्यातून तुम्हाला नवीन ज्ञान मिळेल. मला वाटते निसर्ग हा एक थोर कलावंत आहे.

महाराष्ट्रातील माझ्या पक्षी मित्रांनी पक्षी घरटी कशी बांधतात। हे माझे लहानसे पुस्तक बालमित्रांना, तरुण मित्रांना तसेच थोरांनाही आवडेल.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: रोहित बनसोडे	वर्ग: BSC 1st

पुस्तकाचे नांव: मुसाफिर	मो. नं.: 7757885813

लेखकाचे नांव: अच्युत गोडबोले	किंमत: 250

प्रकाशकाचे नांव: मधुश्री प्रकाशन	एकूण पृष्ठे: 467

**आशय:**

'मुसाफिर' हे पुस्तक खूप छान आहे. या पुस्तकात अच्युत गोडबोले यांनी स्वतःचे अनुभव सांगितले आहे. त्यांनी त्यांच्या जीवनात अनुभवलेले प्रत्येक क्षण लिहिला आहे.

त्यांनी प्रत्येक field मध्ये शिक्षण घेऊन, तो field सोपा करून सांगितला आहे. IIT मधील अनुभव सांगितला आहे. ते मुळचे सोलापूरचे आहेत. त्यांच्या बालपणातील प्रत्येक आठवण सांगितले आहे.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: स्नेहल शांताराम माळी वर्ग: B.A. III

पुस्तकाचे नांव: बॉक्सिंग मदर मेरी कोम मो. नं.: 9307373818

लेखकाचे नांव: प्रा. संजय दुधाणे किंमत: 100/-

प्रकाशकाचे नांव: संस्कृती प्रकाशन एकूण पृष्ठे: 120

आशय:

काहि नावांत संघर्षमय यशाची प्रेरणा बीजे पेरलेली असतात. सावित्रीबाई फूले, राणि लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकर या नामावली प्रमाणेच मेरी कोम हे नाव उच्चारताच नवचेतना संचारते आपल्या क्षेत्रात आपणही काहितरी करुन दाखविण्याची उर्मी जागृत होते. ऑलिम्पिकमध्ये महिला बॉक्सिंगच्या पदार्पणातच पदक मिळविण्याची किमया करणारी जबरदस्त इच्छाशक्ती, कष्ट आणि दुर्दम्य आत्मविश्वास याच्या जोरावर आपली क्रीडा कारकीर्द समृद्ध करणारी स्वबळावर आपली कर्कीद घडविणारी एम. सी मेरी कोम म्हणजेच मंगते चुंगनेईजंग मेरी कोम एक ऑलिंपिक पदक काय चमत्कार घडवते हे मेरीच्या वयाने यशाने जगाने पाहिले आहे. या पदकासाठी एका तपापेक्षा अधिक काळ तिने दिलेली अग्निपरीक्षा नवे बळ देणारी आहे. हे सर्व काही या पुस्तकात देण्याचा प्रा. संजय दुधाणे यांचा प्रयत्न यशस्वी झाला आहे.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: आदित्य प्रदिप जाधव वर्ग: B.A.III

पुस्तकाचे नांव: रिच डॅड पुअर डॅड मो. नं.: 8767893338

लेखकाचे नांव: रॉबर्ट कियोसाकी अभिजित थिटे किंमत: ~~₹ 6~~ ₹ 303

प्रकाशकाचे नांव: मंजुल पब्लिशिंग हाऊस एकूण पृष्ठे: ~~209~~ 201

**आशय:** श्रीमंतीचे स्वप्न बघत बघत आपण मोठे होतो आणि आपलं बालपण संपून पैसे यायला लागतात आपल्याला स्वत:च्या पैशाने आता काय घेऊ नि काय नाही कळत नाही. गोष्टी अनेक असतात अत्याधुनिक मोबाईल फोन नवी कोरी गाडी सुंदर कपडे अशा किती गोष्टी सांगाव्या एक नि अनेक. पण आपल्याकडे घरात आर्थिक शिक्षणाचे धडे फारसे मिळताना दिसत नाहीत

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: दिग्विजय ज्योतिर्लिंग खोत — वर्ग: BA-III

पुस्तकाचे नांव: शिवचरित्र — मो. नं.: 8855923644

लेखकाचे नांव: पुरुषोत्तम खेडेकर — किंमत: 145

प्रकाशकाचे नांव: जिजाई प्रकाशन — एकूण पृष्ठे: 239

आशय: –

गुलामगिरीमुळे महाराष्ट्रातील सारी प्रजा हतबल झाली होती. या भूमीतील तेज, उत्साह, आनंद नाहीसा झाल्यासारखी सगळीकडे परिस्थिती होती.

परकियांच्या आक्रमणामुळे आठव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत महाराष्ट्रातील राजवटी कमकुवत झाल्या होत्या. सन १२९४ मध्ये देवगिरीचा राजा रामदेवराय यादव यांचे राज्य आपले, अल्लाउद्दीन खिलजीने राजा रामदेवरायाचा यादव यांचे राज्य आपले पराभव केला. त्यानंतर रामदेवराय यांचा पुत्र शंकरदेवराय यादव यांनी आपले अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न केला परंतु त्यामध्ये त्यांना यश आले नाही. त्या वेळेपासून जवळजवळ तीनशे वर्षे महाराष्ट्रातील लोकांना परकियांचा त्रास सहन करावा लागला.

१३४८ मध्ये स्थापन झालेल्या स्वतंत्र बहामनी राज्याची तान १४९० मध्ये फार वाईट अवस्था झाली. यामुळे नव्या पाच मुस्लिम राजवटीचा उदय झाला. अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही, वऱ्हाडची इमादशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही व बिदरची बरिदशाही. विजयनगरच्या राजवटीने स्वातंत्र्य रक्षणाचे कार्य जवळजवळ दोन शतके केले.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

# पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: आकाश मोहन कोळके  वर्ग: B.A-III

पुस्तकाचे नांव: छत्रपती शिवाजी महाराज  मो. नं.: 8010359947

लेखकाचे नांव: कृष्णराव अर्जुन केळुसकर  किंमत: 130

प्रकाशकाचे नांव: साकेत प्रकाशन  एकूण पृष्ठे: 192

**आशय:**

शिवाजी महाराज

छत्रपती शिवाजी महाराजांचे साधार प्रदीर्घ चरित्र लिहताना गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकरांनी ऐतिहासिक सत्याच्या आधारे विवेकशील मांडणी केली आहे. भारतभूमीला यवनसत्तेपासून मुक्त करण्याचा संकल्प केलेल्या या महाप्रतापशाली वीराने सर्व जाती-धर्माच्या मदतीने, मुत्सद्दीपणा व गनिमी-कावा या कौशल्याने हिंदवी स्वराज्य उभारले. कल्पक ~~प्रकाश~~ प्रशासनाच्या आधारे जनसामान्यांचा कैवार आणि गुणवंतांचा आदर करत शत्रू लक्षांवर मात केली मराठ्यांचे नाव जगाच्या इतिहासात अजरामर करून ठेवलेल्या छत्रपती शिवरायांचे मराठीतील हे चरित्र एक उत्तम उदाहरण आहे. केळूसकर गुरुजींचा हा ग्रंथ म्हणजे केवळ शिवाजी राजांचा चरित्रग्रंथ नसून त्यात इतिहास, भूगोल, समाजव्यवस्था, अर्थकारण, नेतृत्व, चारित्र्य, मानवी संबंध अशा अनेक विषयांची तपशीलवार माहिती आहे

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: प्रतिक्षा युवराज पाटील

वर्ग: BSC·CS-I

पुस्तकाचे नांव: 'एक झुंज गोंगाटाशी'

मो. नं.: 9944321947.

लेखकाचे नांव: डॉ. यशवंत ओक

किंमत: 300 रुपये

प्रकाशकाचे नांव: राजहंस प्रकाशन

एकूण पृष्ठे:

**आशय:**

आवताली विविध प्रकारच्या आवाजांनी आपलं जीवन पूर्णपणे व्यापून टाकलंय. बरं पशू - पक्षांचे, वाऱ्याचे, समुद्राच्या लाटांचे आवाज ऐकू येणं इथपर्यंत ठीक आहे, हे नैसर्गिक आहे. या आवाजांची मानवाला गरजही आहे. पण या शिवाय दररोज असे काही आवाजही आपण ऐकत असतो जे मानवनिर्मित अन् त्रासदायक आहेत. यामध्ये फटाके, वाहनांचे हॉर्न्स, कंपन्यांमधील मशिन्सचे आवाज, ओरड्यांचे, म्युजिक सिस्टिमचे, टीव्हीचे, विमानांचे, अॅम्बुलन्स-अग्निशमन दलाची वाहनं आणि पोलिसांच्या गाड्यांचे सायरन, रस्त्याच्या कडेला फळ विकणाऱ्यांकडे असलेल्या रेकॉर्डेड आवाज आदींचा समावेश आहे. हे आवाज नुसते आवाज नाहीत तर गोंगाट आहेत. माणसासह पशू - पक्षांच्या जीवनशैलीवर ते विपरित परिणाम करत आहेत. या आवाजांचा इतका अनिर्बंध वापर आणि अतिरेक झाला आहे की त्याविरोधात कडक पावलं उचलावी लागत आहेत.

हायकोर्ट, सुप्रीम कोर्टांनी देखील या गोंगाटांची दखल घेत हे रोखण्यासाठी कठोर अन् महत्वाचे आदेश दिलेत.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: सायली महादेव भाऊकमकर वर्ग: BSC.CS-I

पुस्तकाचे नांव: ~~अग्निपंख~~ अग्निपंख मो. नं.: 8999453957

लेखकाचे नांव: ए.पी.जे अब्दुल कलाम किंमत: 240

प्रकाशकाचे नांव: राजहंस प्रकाशन एकूण पृष्ठे: 152

**आशय:**

बालपण अथक परिश्रमांत व्यतीत करून विद्येची अखंड साधना करीत खडतर आयुष्य जगलेले, आणि जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या राष्ट्रपदी निवड झालेले डॉ. अब्दुल कलाम, हे युवकांना सदैव प्रेरणा देणारे व्यक्तिमत्व आहे. विज्ञानाचा परम भक्त असणाऱ्या डॉ. कलामांना लहान मुलांशी विद्यार्थ्यांशी गप्पा मारण्याचा छंद होता. भारताचे भविष्य उज्ज्वल करण्याचे सामर्थ्य हातात असलेल्या तरूणाईला नेहमीच ते प्रोत्साहन देत संपुर्ण आयुष्य देश सेवेसाठी कार्यरत राहिलेले डॉ. अब्दुल कलाम पुढील वीस वर्षात होणाऱ्या विकसित भारताचे सतत स्वप्न पाहत असत.

या आत्मचरित्रात त्यांनी एका बाजूने आयुष्यातील व्यक्तीगत आणि व्यावसायिक संघर्ष वितारत असताना दुसऱ्या बाजूला अग्नि, आकाश, पृथ्वी, त्रिशूल, नाग या देशावरी पोहलेल्या नावांच्या क्षेपणास्त्रांची जडण घडण फार सुंदरपणे वाचकांना सांगितलेली आहे हे पुस्तक केवळ डॉ. अब्दुल कलाम यांचे आत्मचरित्र नसून स्वतंत्र भारताच्या अवकाश संशोधन आणि तंत्रज्ञान विषयक लढाईचे एक स्पंदन आहे. जागतिक शस्त्र स्पर्धेच्या राजकारणाची आणि विज्ञानाची ती कहाणी आहे तसेच स्वयंपुर्ण होण्यासाठी आपल्या देशाने केलेल्या संघर्षाचे ते मनोहर्षक खंडकाव्यच आहे.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: माळी धनश्री प्रकाश  वर्ग: BSc CS I

पुस्तकाचे नांव: शिवाजी कोण होता?  मो. नं.: 9699206139

लेखकाचे नांव: गोविंद पानसरे  किंमत: 20

प्रकाशकाचे नांव: नक्षत्र प्रकाशन  एकूण पृष्ठे: 74

**आशय:**

शिवाजी महाराजांचे व्यक्तीमहत्व काय आहे या पुस्तकातून आपल्याला समजते. या पुस्तकाची भाषा इतकी धारदार आणि प्रभावी आहे या पुस्तकातील प्रत्येक शब्द आणि उतारा त्या यावर विचार करायला भाग पाडते. महाराजांचे वेगळेपण दाखवताना त्यांचे समीक्षण करताना राजधर्म आणि आधुनिक लोकशाहीची तुलना केली आहे. राजनिती, युद्धनिती, गनिमीकावा अशा कोणत्याच गोष्टीचा उल्लेख या पुस्तकात नसुन या पुस्तकात असा उल्लेख आहे कोणाच्या राजासाठी त्याचे सैन्य कधीही लढायला व मरायला कमी नसते. त्यासाठी प्रजा ही मरायला तयार होते व का होते याचा विचार करण्यासाठी गोष्ट या पुस्तकात या मांडली आहे. श्रद्धा आणि आदर याचा बुरखा पांघरलेल्या खोट्या शिव भक्तांवर योग्य असे लेखन या पुस्तकात केलेले आहे.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: सर्वेश सोमनाथ चटले — वर्ग: B A - III

पुस्तकाचे नांव: बुद्ध चरित्र — मो. नं.: 8767747425

लेखकाचे नांव: धर्मानंद कोसंबी — किंमत: 150 रूपये ते 300

प्रकाशकाचे नांव: गायकवाड ओरिएंटल — एकूण पृष्ठे: 104.

आशय: जीवन परिचय तथा महाभिनिष्क्रमण

लगभग छः सदी ईसा पूर्व जब सारे संसार के धार्मिक क्षेत्र में बड़ी क्रान्ति हो रही थी लगभग इसी समय चीन में लुत्जे और कन्फ्यूशस, ग्रीस में साक्रेटीज अपने क्षेत्रों में युग परिवर्तन का आह्वान कर रहे थे - उसी प्रकार भारतवर्ष में भी आज से दो हजार पाँच सौ चालीस वर्ष पूर्व एक धार्मिक क्रान्ति हुई। इसके प्रवर्तक असाधारण प्रतिभाशाली महामानव गौतम बुद्ध थे!

अज्ञान को मिटाने के लिए उस महामानव का इस संसार में प्रादुर्भाव हुआ जब देश की उस समय की सामाजिक, धार्मिक समस्याओं, पूजा, अंध विश्वासों, विकृतियों, कुरीतियों तथा ~~धर्म के नाम~~ ~~पर~~ पाखंडों, जैसे मूर्तिपूजा, जन्मना वर्ण व्यवस्था अनाचार तथा धर्म के नाम पर हिंसा तथा अनुचित परम्परा से मानव समाज दुख और विषाद से दमित था एवम चेतना विहीन होकर

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

### ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: चेतन हणमंत कांबळे वर्ग: B A III

पुस्तकाचे नांव: योग्यता से जीयो मो. नं.: 9067785451

लेखकाचे नांव: डॉ. बाबासाहेब आंबेडकर किंमत: 30

प्रकाशकाचे नांव: एकूण पृष्ठे:

आशय: अपने स्वाभिमान को खोकर जीवित रहना अपमानजनक है। जीवन में स्वाभिमान अतिआवश्यक है इसके बगैर मनुष्य शून्य है सम्मान के साथ, योग्यता से जीवित रहने के लिए मनुष्य को तकलीफों से गुजरना पडता है कठोर और निरंतर संघर्ष से ही मनुष्य को शक्ति, विश्वास और मान्यता उपलब्ध हो सकती है मनुष्य नश्वर है हर एक ना एक दिन मरना है

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

# पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

**विद्यार्थ्याचे नांव:** दमामे तेजल मोहन  **वर्ग:** बी. ए. ३ (अर्थशास्त्र)

**पुस्तकाचे नांव:** द. सिक्रेट  **मो. नं.:** ७६२००९५७५८

**लेखकाचे नांव:** रोंडा बर्न  **किंमत:** ४००

**प्रकाशकाचे नांव:** साथमन  **एकूण पृष्ठे:** १९८

**आशय:**

आकर्षणाच्या नियम म्हणजे काय? त्याच साधं सोप त्तर म्हणजे एखाद्या गोष्टीचा विचार आपण सतत करत असतो ती गोष्ट सकारात्मक असो वा नकारात्मक पण आपण त्याचा सतत विचार करत असतो की ती गोष्ट आपल्याला मिळतेच जगातील नामवंत लोकांनी सुद्धा याचा वापर करुन यश प्राप्त केले आहे जसे की सॉक्रेटीस, लिओ नार्दो दा विन्ची पायथागोरस इ. आकर्षणाच्या नियम हा नेमका काम करतो तरी कसा हे समजावून घेऊया उदा. एखाद्या व्यक्तिची इच्छा आहे की मला श्रीमंत व्हायचं आहे, तसच दुसऱ्या व्यक्तीची ईच्छा असते की मला गरिब नाही रहायचं दोन्हींचा अर्थ एकच आहे पण यांच्या बोलण्याच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. आपण जे बोलत असतो तसच हे ब्रम्हांड आपल्याला देत असत. ब्रम्हांडामध्ये व आपल्यात एक अनोखी वारंवारता असते. त्याला सकारात्मक किंवा नकारात्मक असे काही नसते काही कळत तुम्ही जस बोलता तसंच हे ब्रम्हांड तुम्हाला देत असत. या पुस्तकाची लेखीका रोंडा बर्न यांनी या सर्व आकर्षणाच्या नियमाचा अभ्यास करुन जगासमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आकर्षणाच्या नियमाचा उपयोग करुन आपण सर्व आपल्या मनातील इच्छा पूर्ण करु शकतो.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

# पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: अपर्णा महादेव देशमुख | वर्ग: MA. II (English)

पुस्तकाचे नांव: वाट तुडवताना | मो. नं.: 8975700403

लेखकाचे नांव: उत्तम कांबळे | किंमत: 200रुपये

प्रकाशकाचे नांव: अरविंद घन: श्याम पाटकर मनोविकास प्रकाशन. | एकूण पृष्ठे: 224 पृष्ठे

**आशय:**

"वाट तुडवताना" हे उत्तम कांबळे यांचे एक अत्यंत संवेदनशील आणि विचारप्रवर्तक आत्मचरित्र आहे. या पुस्तकात मुख्यत: मानवी अस्तित्वाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला आहे. या पुस्तकात त्यांच्या जीवनातील विविध संघर्ष, सामाजिक विषमता, वय, दु:ख याविषयी सविस्तर माहिती आहे. लेखकाने साध्या पण प्रभावी भाषेत जीवनाच्या कठीण प्रवासाचे वर्णन केले आहे. "वाट तुडवताना" हे पुस्तक वाचताना वाचकांच्या मनात अनेक विचारांचे जाळे उभे राहते. वाचकाला आपला संघर्ष कवडीमोल वाटू लागतो. जिथे जन्म व्यवस्था हीच जातीय आस्थापनेवर आधारलेली आहे, त्या ठिकाणी किती मोठा संघर्ष, स्वत: च्या ओळखीसाठी करावा लागतो हे पुस्तक वाचून लक्षात येते.

① संघर्ष आणि वेदना :- या पुस्तकात लेखकाने खूप मोठ्या प्रमाणात संघर्ष आणि वेदना सोसल्या, जरी दु:ख आणि कष्ट असले तरी, त्यात एक ठराविक आशेचा आणि प्रकाशाचा धागा आहे. हे या पुस्तकातून दिसून येते.

② सामाजिक विषमता आणि अन्याय :- या पुस्तकात लेखकाने समाजातील विविध विषमतांवर लिहिले आहे. या पुस्तकातून आपल्याला गरीब, दुर्बल आणि अन्यायग्रस्त व्यक्तींच्या समस्यांकडे एक संवेदनशील दृष्टिकोनातून पाहण्याची दृष्टी मिळते.

या पुस्तकातून लेखकाने गरीब, दलित आणि पिडित समाजाचे वाचन करणाऱ्यांना प्रबोधन करणारे विचार दिले आहेत. लेखकाचे लेखन एका प्रकारच्या अंतर्गत संघर्षाचे प्रदर्शन करते, जे वाचकाच्या मानसिकतेला बदलून त्याला अधिक संवेदनशील बनवते.

"वाट तुडवताना" वाचल्यानंतर वाचकाला जीवनातील अनेक कठीण प्रसंगांबद्दल विचार करण्याची आणि त्यावर उपाय शोधण्याची प्रेरणा मिळते. या पुस्तकाचे परिणाम प्रत्येक वाचकांच्या मनावर खोलवर होतात, आणि ते त्यांना सामाजिक सुधारणेसाठी व व्यक्तिगत विकासासाठी प्रोत्साहित करतात.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

# पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: अर्चना महादेव देशमुख — वर्ग: M.A-2 (मराठी)

पुस्तकाचे नांव: मुसाफिर — मो. नं.: 8767587209

लेखकाचे नांव: अच्युत गोडबोले — किंमत: 250 रुपये.

प्रकाशकाचे नांव: अरविंद घनः श्याम पाटकर मनोविकास प्रकाशन. — एकूण पृष्ठे: 508 पृष्ठे.

**आशय:**

'शहाणे करुन सोडावे सकल जन' या ध्यासाने कठोर मेहनतीने प्रकाशित केलेले विविध ज्ञानशाखांचे आणि माणसांचे बदलत गेलेले दृष्टिकोन मांडणाऱ्या पुस्तकांमुळे अच्युत गोडबोले गेल्या काही वर्षात सगळ्यांनाच ठाऊक झाले आहेत.

अव्वल दर्जाची बुद्धिमत्ता, अफाट ऊर्जा, कोणत्याही गोष्टीचा थेट मुळापर्यंत घुसून शोध घेण्याची वृत्ती ही अच्युत गोडबोले सरांची काही वैशिष्ट्ये आहेत. हा माणूस अफाट आडवं - तिडवं समरसून जगलेला आहे. धारावी, शहादा ते कॉर्पोरेट विश्वातील सर्वोच्च स्थानीचे आयुष्य असा त्यांच्या जगण्याचा पट आहे. सोलापूरच्या शाळेपासून पवईच्या आयआयटी पर्यंत, मोडक्यातोडक्या इंग्लजीपासून ते तिच्यावर मिळवलेल्या हुकमतीपर्यंत, आयआयटीतील धमालीपासून विलायत खाँ, भीमसेन, जसराज, किशोरी, अब्लरबाई, डोस्टोव्हस्की, स्टाईनबेक यांच्यासारख्या अनेक दिग्गजापर्यंत, तेंडुलकर दुबळी, बेकारी, गरिबी, जातिव्यवस्था, का. डांगे, नैरपांच्या सभा, चळवळ, तुरुंगवास, दारिद्र्यातील रोमान्स, झोपडपट्टीचे आकर्षण, वेश्यावस्तीची सफर, उदासीनता, अपमान आणि मग परत एकदा समुद्र चिरणारी झेप. आयबीएम, पटणी, सिंटेल, एल ॲंड टीच्या सर्वोच्च पदापर्यंत घेतलेली झेप; आणि ती झेप घेता घेता आयटी क्षेत्रात अमेरिकनांपासून ते चिनी व्यावसायिकांपर्यंत सगळ्यांचे सहज झेलेले आव्हान, मुलाच्या आजाराबद्दल एक बाप म्हणून वाटणारी चिंता, दुःख ज्या दुःखातून तुम्ही गेलात, जात असाल, नुसते दुःख करीत न बसता एक संस्था उभी केलीत. प्रत्येक चढ-उताराच्या वळणावर, क्षेत्रात, अंचावरात करुन सोडणारी कामगिरी करुन दाखवणारे आणि त्याचबरोबर आपले आयुष्य सर्वार्थाने जगता जगता इतर अनेकांची आयुष्य समृद्ध करुन टाकणारे. यांच्या या आत्मचरित्रातून अच्युत गोडबोले सरांनी अनेक गोष्टी किती वेळा शिकवल्या असतील याला मर्यादाच नाहीत.

आयुष्यातील चढ उतार हे कोणाला चुकले नाहीत पण त्यांच्याशी दोन हात करुन 'केल्याने होत आहे' आणि काय काय करता येणं शक्य आहे' याचा प्रत्यय या आत्मचरित्रातून होत आहे.

'मुसाफिर' हे खूप नेटकेपणाने लिहिलेले आत्मवृत्त आहे. वाचकांना हे पुस्तक निश्चितच आवडत आहे आणि तरुणांना प्रेरित करेल. तुम्ही पेलेली आव्हाने संकटे खरोखरच इतरांना मार्गदर्शक ठरणारी आहेत. हे पुस्तक आयुष्याच्या विविध अंगां-कडे लक्ष वेधणारे असे आहे. सगळेच वाचक यात स्वतःला शोधू शकतील. 'मुसाफिर' हे आत्मचरित्र आनंददायी आहेच, पण प्रेरणादायी आहे. असे मला वाटते

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: आदित्य शंकर मस्के — वर्ग: MA I (मानसशास्त्र)

पुस्तकाचे नांव: फकिरा — मो. नं.: 9146149236

लेखकाचे नांव: लो. अण्णाभाऊ साठे — किंमत: 175

प्रकाशकाचे नांव: सुरेश राजश्री — एकूण पृष्ठे: 176

**आशय:**

इ.सन 1959 रोजी प्रकाशित झालेली ही कादंबरी महाराष्ट्र राज्य शासनाने इ.सन 1961 साली 'उत्कृष्ट कादंबरी' या पुरस्काराने सन्मानित केली. एका दलित लेखकाचा हा सर्वोत्कृष्ट सन्मान असल्याचे दिसून आले. कादंबरी प्रथम हातात घेतल्यावर असा समज होतो की ही एक इतिहास जमा व काल्पनिक घटनेवर आधारली असावी. पण कादंबरीचे एक एक पान चाळत जाताना एक यथार्थ वास्तवाची जाणीव मला होत गेली. लेखकांनी समाजाचे वास्तव जसेच्या तसे यामध्ये आधोरेखित केले आहे. पेशवाई व इंग्रजीसत्ता असणाऱ्या काळात एका गावात समाज उतरंडीमध्ये ज्या जाती शुद्र म्हणून गणल्या जात होत्या त्यामध्ये मांग, महार, वडार, रामोशी यांचे वास्तव हाल अपेष्टा व समोर येणाऱ्या रोज नविन अडचणींना हा समाज कसा तोंड देवून रडत पडत जगणारा हा समाज नजरेत आला.

अण्णाभाऊंनी कादंबरीत गावगाड्याचे एक विलक्षण सत्त्व यांच्या शैलीत मांडली आहे. राधा, राणोजी, फकिरा, विष्णुपंत या पात्रांमध्ये जिवंतपणा आणून वाचकांच्या समोर उभा केली आहेत. समाजातील रुढी परंपरा या गावकी व भावकीच्या नजरेतून मांडल्याचे दिसून येते. कादंबरीत अशाच परंपरागत यात्रेचे

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: विपुल प्रदिप कांबळे  वर्ग: B.A - III

पुस्तकाचे नांव: कुरकुल  मो. नं.: 9867694494

लेखकाचे नांव: उत्तम शंकर सावंत  किंमत: 125/-

प्रकाशकाचे नांव: मोद प्रकाशन  एकूण पृष्ठे: 96

**आशय:**

गुद्दाळ, गुरा-वासरांनी भरलेले गोठे, गाई वासरांचा अद्भुत लळा, खिल्लारी बैलजोडीचं अनोखं आकर्षण यामुळे ही जनावरं कुटुंबाचाच एक भाग असायची. पहाटे-पहाटे ऐकू येणारे पक्षांचे मंजुळ स्वर आणि त्या आवाजा बरोबर विविध कामं करावी लागायची. जात्यावरच्या ओव्या मन गुंतवून ठेवायच्या. गुरं राखायला गेल्यानंतर विविध अनुभव यायचे. शेतात कामं करूनही शाळेबद्दलची ओढ, शेतातली सारी कामं उरकून शाळेत जायची धावपळ नित्याचीच. विविध प्रसंगांची लोकगीतं, मंदिरातील पारायण, भजनं, यात्रा-जत्रा अन घरातील पंढरीची पायी वारी भक्तीची भावोत्कटता दर्शवायच्या. तसेच सप्ताहात होणाऱ्या उत्साही किर्तनात अनेक नवलाच्या गोष्टी ऐकायला मिळायच्या. कुस्त्यांचे आखाडे, त्यात घुमणारे शड्डू उत्साह वाढवायचे. कुस्ती खेळणाऱ्या पैलवानांपेक्षा बाहेर उभा राहून आमचाच दंगा जास्त असायचा. राजकारणाचे फड वेगळीच रंगत आणायचे. एकमेकांच्या सुखदु:खात मिसळणारे लोक शब्दातीत आपुलकी जपत असायचे. कुटुंबातील भावनांचे नाजूक धागे जपत जगणारं एकंदरीत ग्रामजीवन आणि अशा विविधांगी वातावरणात अनेकविध अनुभव घेत आम्ही लहानाचे मोठे झालो.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्यांचे नांव: साक्षी दिपक धामकर वर्ग: B.A - III

पुस्तकाचे नांव: पत्रिका जुळवताना मो. नं.: 9022910153

लेखकाचे नांव: डॉ. नितीन शिंदे किंमत: 70

प्रकाशकाचे नांव: नाग - नालंदा प्रकाशन एकूण पृष्ठे: 64

आशय:

पत्रिका जुळवणे हा प्रकार सध्या सुशिक्षित आणि मध्यमवर्गात विवाह ठरवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका निभावत आहेत. मुला-मुलींच्या बायोडाटा तयार करणे करताना जन्मपत्रिकेला अनन्यसाधारण महत्त्व दिले जाते, असे लेखक म्हणतात.

'पत्रिका जुळविणे' हा अशा अघोरी षडयंत्र ही व्यवस्था अविरतपणे राबविणे डॉ. नितिन शिंदे यांनी 'पत्रिका - जुळवताना ----' या त्यांच्या पुस्तकातून ग्रह-ताऱ्यांस वास्तव, नक्षत्र, राशी आणि मानवी जीवन यांच्यातील परस्पर संबंध वस्तुनिष्ठ आणि वैज्ञानिक पध्दतीने मांडले आहे. लेखक असे म्हणतात ही भावी पिढ्या अश्या व्यवस्थेच्या बळी ठरू नयेत असे लेखक या पुस्तकातून आपल्याला सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

Bhankar

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्यांचे नांव: कु :- दिक्षा राजेंद्र कांबळे — वर्ग: B.A III

पुस्तकाचे नांव: आरपार झुंजार — मो. नं.: ८४२५९५१८९१

लेखकाचे नांव: एकनाथ पाटील — किंमत: १५०/-

प्रकाशकाचे नांव: ~~स~~ लोकवाङ्मयगृह — एकूण पृष्ठे: १०५

आशय:

चळवळीच्या रणभूमीवर भक्कमपणे पाय रोवून उभा असणारा लढवय्या योद्धा म्हणजे 'एन. डी. पाटील' अविचल ध्येयनिष्ठा, नैतिकता आणि जिंकण्याचा ठाम निर्धार या बळावर सर्वसामान्य माणसांच्या हक्काचे अनेक लढे त्यांनी प्राणपणाने लढविले, जिंकले. आयुष्यात अनेक चढ - उतार आणि ताणेबाणे अनुभवले. या संघर्षाचाच विलक्षण काव्यात्म अनुभव देणारी एकनाथ पाटील यांची 'आरपार झुंजार' ही दीर्घकविता आहे. अखंड संघर्षरत असणारा आणि तरीही अंतरी माणुसकीचा ओलावा जपत काळावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारा चळवळीतील नेता एका दीर्घकवितेचा विषय व्हावा, ही वाङ्मयाच्या क्षेत्रात अपवादाने घडणारी घटना आहे, कवीने कमालीच्या जिव्हाळ्याने एन. डी. पाटील यांचे जीवनदर्शन घडविले आहे. तितक्याच जिव्हाळ्याने त्यांची आंतरिक उलघाल समर्थपणे चित्रित केली आहे. या कवितेतून एन. डी. पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचे व्यापक दर्शन घडते. कळवळा, समंजसपणाचा स्पर्श आणि दूरदृष्टी या काव्यनायकाच्या प्रत्येक कृतिउक्तीत दिसते. कवीने कधी नायकाशी, तर कधी स्वतःशीच संवाद साधत त्यांचा हा संघर्षमय प्रवास विलक्षण गतिमानतेने आणि चित्रदर्शी पद्धतीने उभा केला आहे. सामाजिक चळवळीचा अवकाश संकुचित होत निघाल्याच्या आजच्या अस्वस्थ काळात संघर्षाचे जागते भान देणारी ही कविता म्हणूनच महत्त्वाची आहे.

सही - [signature]

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: कदम सानिका दत्तात्रय वर्ग: B.SC I

पुस्तकाचे नांव: बँकर टु द पुअर मो. नं.: 7620448023

लेखकाचे नांव: प्रो. महंमद युनुस किंमत: 350 रु

प्रकाशकाचे नांव: सुविद्या प्रकाशन. एकूण पृष्ठे: 396

आशय:

'बँकर टु द पुअर' हे नोबेल पारितोषिकविजेते युनुस यांचे आत्मचरित्र. त्यांनी सूक्ष्म पतपुरवठ्याद्वारे बांगला देशातील दारिद्र्यात खितपत पडलेल्या लक्षावधी कुटुंबांना स्वतःच्या पायावर कसे उभे केले याची ही हकिकत आहे. चितगाव विद्यापीठात अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख असलेल्या प्रा. युनुस यांना बांगला देशातील 1974 सालच्या भयानक दुष्काळामुळे, आपल्या देशातील दारिद्र्याची प्रकर्षाने जाणिव झाली, विद्यापीठातील चार भिंतींच्या आत अर्थशास्त्राचे आकर्षक सिद्धान्त विद्यार्थ्यांना शिकविण्याऐवजी त्यांनी जोब्रा खेड्यातील 42 गरीब कुटुंबांना 27 डॉलर्सचे कर्ज देऊन दारिद्र्यनिर्मूलनाच्या कार्याला सुरवात केली पारंपारिक बँका व प्रशासकीय यंत्रणांच्या विरोधाला तोंड देत. मोजक्या सहकाऱ्यांच्या मदतीने बांगला देशातल्या 38 हजार खेड्यांतील 20 लाखांवर कर्जदारांना 20 कोटी डॉलर्सच्यावर

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्यांचे नांव: कु. सलोनी बाळासो खोत — वर्ग: BCA-II

पुस्तकाचे नांव: माझी जन्मठेप — मो. नं.: 8767304339

लेखकाचे नांव: विनायक दामोदर सावरकर — किंमत: 100

प्रकाशकाचे नांव: रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर — एकूण पृष्ठे: 504

आशय:

भारतातील बऱ्याच देशभक्तांना काळ्या पाण्याची शिक्षा झाल्याची नावे आपल्याला मिळतात परंतु, ती शिक्षा कशा प्रकारे दिली जायची, किती भयाण प्रकारे दिली जायची याचे वर्णन असणारे पुस्तक म्हणजे 'माझी जन्मठेप.' असं म्हणतात की, ज्या विद्यार्थ्याला आत्महत्या करावीशी वाटत आहे, त्याने एकदा 'माझी जन्मठेप' हे पुस्तक जरूर वाचावे, ती व्यक्ती आयुष्यात परत कधीही 'आत्महत्या' हा विचारसुद्धा करणार नाही असे काय आहे या पाहूया...

माझी जन्मठेप हे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी अंदमानात काळ्यापाण्याची शिक्षा भोगत असताना आलेल्या अनुभवांवर लिहिलेले आत्मचरित्रपर पुस्तक आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योद्धे वीर सावरकर यांना दोन जन्मठेपेची म्हणजे पन्नास वर्षांची शिक्षा झाल्यावर त्यांची रवानगी अंदमानला केली गेली. तेथले त्यांचे जीवन म्हणजे मृत्यूशी झुंज होती पण त्या झुंजीत मृत्यूचा पराभव झाला आणि सावरकरांचा जय झाला. सावरकरांच्या वीर रसाने ओथंबलेल्या चरित्रामध्ये अनेक रोमहर्षक पर्वे आहेत. त्यापैकी अंदमान पर्व हे अत्यंत रौद्र आणि भयानक पर्व आहे. त्याची रोमांचकारी कथा 'माझी जन्मठेप' या आत्मकथेत सावरकरांनी सांगितली आहे. यांना 24 डिसेंबर 1910 रोजी काळ्यापाण्याची शिक्षा (25 वर्षे) पहिल्यांदा सुनावण्यात आली, तर 30 जानेवारी 1911 रोजी दुसरी काळ्यापाण्याची शिक्षा (25 वर्षे) देण्यात आली.

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: कु. स्नेहा सचिन शिंदे वर्ग: BCS-I

पुस्तकाचे नांव: मृत्युंजय (कादंबरी) मो. नं.: 9850136156

लेखकाचे नांव: शिवाजी सावंत किंमत: 450

प्रकाशकाचे नांव: मेहता पब्लिशिंग हाऊस एकूण पृष्ठे: 742

आशय:

महाभारतातील 'कर्ण' या व्यक्तीरेखेवर आधारित शिवाजी सावंत यांनी लिहिलेली कादंबरी. सप्टेंबर 24 1995 रोजी या पुस्तकाला 'भारतीय ज्ञानपीठ' या संस्थेतर्फे मूर्तिदेवी पुरस्कार जाहीर झाला.

महाभारतातील सामान्यत: खलनायक म्हणून परिचित असलेल्या महावीर कर्णाच्या असामान्य व्यक्तिमत्वाचा मागोवा ही कादंबरी घेते. बऱ्याच कथा सर्वांनाच परिचित आहेत, पण शिवाजी सावंत लिखित "मृत्युंजय" कादंबरी हाती घेतली आणि जणू कर्णाचे जीवन नव्याने माझ्या मनात उलगडले गेले. कर्णासारखा दानशूर या भूमीवर कधीच नव्हता. अशा अनेक परिचित अपरिचित प्रसंगांशी आपली अगदी जवळून ओळख करुन देते ही कादंबरी.. मराठी साहित्यास शिवाजी सावंत यांच्याकडून मिळालेली आणखी एक देणगी.

कुरुक्षेत्रावर सुरु असलेल्या कौरव - पांडवांच्या युद्धाचा तो सतरावा दिवस. वेळ जवळ जवळ सूर्यास्ताची. कौरव आणि पांडव या दोन्ही पक्षांतील योद्धे सारे स्तब्ध उभे. समोर जमीनीवर रक्तात न्हालेला महावीर कर्ण मृत्यूच्या शेवटच्या घटका मोजत. इथे कर्ण मृत्युच्या दारात आणि आसपास सभोवताली पडला होता मृत सैनिकांचा रक्तबंबाळ झालेल्या प्रेतांचा खच....

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्यांचे नांव: श्रावणी अजय जाधव  वर्ग: BSC-I

पुस्तकाचे नांव: श्रीमान योगी  मो. नं.: 8975408567

लेखकाचे नांव: रणजित देसाई  किंमत: 665

प्रकाशकाचे नांव: मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे  एकूण पृष्ठे: 1200

**आशय:**

शिवनेरी पायथ्याचे जुन्नर गाव पश्चिमेकडे झुकलेल्या सूर्याच्या तिरप्या किरणांत उजळ दिसत होते. जुन्नरपासून थोड्या अंतरावर असलेल्या आंबराईत शहाजीराजांचे घोडदळ थांबले होते. एका डेरेदार आम्रवृक्षाखाली शहाजीराजे धाकट्या संभाजीसह उभे होते. दुपार टळत येऊनही अद्याप वारा सुरू झाला नव्हता. झाडाचे पानही हलत नव्हते. रात्रीची थंडी उतरायला अजून सुरुवात झाली नव्हती. आंबराईतून दिसणाऱ्या रस्त्याकडे उभयतांचे सारखे लक्ष जात होते. कोणी दृष्टिपथात येत नव्हते. वाढत्या क्षणाबरोबर शहाजीराजे अधिक अधिक अस्वस्थ होत होते.

'आबासाहेब, मासाहेब आल्या,' शंभुराजे म्हणाले.

'कुठे?' मान वर करीत शहाजीराजे विचारते झाले.

शंभूबाळांनी बोट केलेल्या दिशेकडे शहाजीराजांनी पाहिले. तिरप्या सूर्यकिरणांत धुळीचे लोट उडवीत येणारे अश्वपथक दिसत होते. हळूहळू टापांचा आवाज स्पष्टपणे ऐकू येऊ लागला. आंबराई जवळ येताच येणाऱ्या पथकाची गती मंदावली. घोडी थांबली. तीन घोडी मंद गतीने पुढे येऊ लागली.

घोडदौडीने थकलेल्या जिजाबाईंच्या चेहऱ्यावर संभाजीला पाहून क्षीण हास्य उमटले. जिजाबाई दासीच्या आधाराने पायउतार झाल्या. श्रमाने सारा चेहरा लालबुंद झाला होता. नेत्र आरक्त दिसत होते. तीन मासांच्या गर्भार जिजाबाईंनी आपला घाम टिपला. पदर सावरून त्या शहाजीराजांच्या सामोऱ्या आल्या.

'अशी ठायी ठायी थांबत आम्ही दौड करीत राहिलो, तर तुमच्या बापाच्या हाती सापडण्यास फार वेळ लागायचा नाही.'

'तेच सांगणार होते मी!'

'मतलब?' शहाजीराजांनी विचारले.

'आपण पुढे जावं.'

'आणि तुम्ही?'

'पुढचा प्रवास झेपेल, असं वाटत नाही.'

'मग अशा अडचणीत आपल्याला टाकून...'

'जवळच आपले त्राही विश्वासराव आहेत. त्यांच्याकडे थांबता येईल मला. आपण सुखरूप, तर आम्ही सुखरूप. क्षणाच्या अवधीला सुद्धा फार मोल आहे...'

शहाजीराजे एकदम संतापाने उफाळले, 'हा आपल्या वडिलांचा प्रताप आहे त्याला आम्ही काय करणार? जाधवांचे आणि भोसल्यांचे वैर पिढ्यान् पिढ्या चालवायला आम्हीही समर्थ आहोत, म्हणावं.'

'मी काय बोलणार यात?' जिजाबाई बोलून गेल्या.

'तुम्ही म्हणता, तसं करू. तुमच्या बापाला रक्ताची लाज असेल,

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: सौंदर्या शुंडा मोकाशी     वर्ग: BSC - CS

पुस्तकाचे नांव: अग्निपंथ     मो. नं.: 8766587834

लेखकाचे नांव: ए. पी. जे. अब्दुल कलाम.     किंमत: 190

प्रकाशकाचे नांव: गिरिश अर्जुन खरावे.     एकूण पृष्ठे: 189

**आशय:**

मी वाचलेल्या व मला सर्वाधिक प्रिय असणाऱ्या पुस्तकाचे नाव अग्निपंथ आहे. हे पुस्तक भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांनी लिहिले आहे. अग्निपंथ ही एपीजे अब्दुल कलाम यांनी लिहिले आहे. अग्निपंथ ही एपीजे अब्दुल कलाम यांची आत्मकथा आहे. या पुस्तकात अब्दुलकलाम यांच्या बालपणापासुन तर राष्ट्रपति पदापर्यंतचा संपूर्ण प्रवास रचण्यात आला आहे. डॉ. अब्दुल कलाम भारताच्या यशस्वी शास्त्रज्ञांपैकी एक आहेत. त्यांनी इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन मध्ये महत्वाचे योगदान दिले.

भारताची सैन्य क्षमता वाढविण्यासाठी त्यांनी अणुचाचणी घेतली म्हणूनच त्यांना मिसाईल मॅन म्हणूनही संबोधले जाते 2022 सालापर्यंत ते अत्यंत लोकप्रिय झाले होते. म्हणूनच त्यांना भारताच्या राष्ट्रपती पदासाठी निवडण्यात आले. अग्निपंथ या पुस्तकात अब्दुल कलाम यांनी यांचे बालपणाचे जीवन ते राष्ट्रपती पदासाठी करण्यात आलेली निवड पर्यंतचा संपुर्ण जीवन परिचय रेखाटला आहे. या चरित्याची सुरूवात एका महान गुरूपासून होते जो नंतर कलामांचा प्रसिद्ध शास्त्रज्ञ होते.

1930 - 1950 या कालखंडातील परिस्थितीचे चित्रण करण्यात आले आहे. अब्दुल कलाम यांचा जन्म धार्मिक नगरी रामेश्वरम मधील एका मुस्लीम कुटुंबात झाला. भारताच्या देशातील विभाजनापूर्वी असलेली धार्मिक एकता आणि एकात्मता वर्णन अब्दुल कलाम यांनी पहिल्या दोन धड्यामध्ये केले आहे.

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: तनुजा संभाजी काटे — वर्ग: BCA - II

पुस्तकाचे नांव: महामाया निळावंती (कादंबरी) — मो. नं.: 9309023348

लेखकाचे नांव: सुमेध — किंमत: 350 ₹

प्रकाशकाचे नांव: न्यू इरा पब्लिकेशन — एकूण पृष्ठे: 270

आशय:

निसर्गातल्या प्रत्येक जीवाला त्याच्यातल्या चेतनेची जाणीव करून देणारी महामाया निळावंती. तीला आदिमाया पशु-पक्षांची भाषा समजते. प्रत्येक जीवावर ती माया करते. हा ग्रंथ जो कोणी वाचतो त्याला एकतरी वेड तरी लागते नाहीतर तो स्वत:चा जीव गमावतो. विशिष्ट विधी करून जर हा ग्रंथ वाचला तर मात्र वाचणाऱ्याला प्राणीमात्रांच्या भाषेची सिद्धी मिळते. यासारख्या अनेक चित्रविचित्र कथा, दंतकथा या ग्रंथाशी जोडलेल्या आहेत. हा तोच ग्रंथ ज्याबद्दल अनेक कथा दक्षिण भारतात प्रचलित आहेत.

ही तीच निळावंती आहे जी पशुपक्षांशी बोलते, जीच्या नावाने निळावंती ग्रंथ आहे. पण या पुस्तकातील ही कथा निळावंतीची सत्य कथा आहे असा दावा या कादंबरीचे लेखक सुमेध करतात. लेखक सुमेध यांनी खुपच सुंदर, रंजक आणि अभ्यासपुर्वक ही कादंबरी लिहली आहे.

ही निळावंतीची कथा नाही तर निळावंतीच या कथेचे एक पात्र आहे. ही कथा आहे पुत्रप्रेमात वेडा झालेल्या एका बापाची. या कथेचा काळ आहे 1992-93. बेंगलोर मधुन एक बाप आपल्या मुलाचा मृतदेह घेऊन गायब होतो आणि तो येतो सह्याद्रीच्या दाट जंगलात. कथेत बापाच नाव आहे विक्रम विभुते. विक्रम या कथेचे मुख्य पात्र आहे. त्याच्या अवतीभोवती ही कथा फिरते.

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: सानिका आनंदा नांगरे वर्ग: BCA-II

पुस्तकाचे नांव: बुधभूषण मो. नं.: 9970429112

लेखकाचे नांव: छत्रपती संभाजी शिवाजीराजे भोसले किंमत: 600

प्रकाशकाचे नांव: जिजा प्रकाशन पुणे. एकूण पृष्ठे: 335

आशय: श्रीबुधभूषण हा छत्रपती संभाजी महाराजांनी लिहिलेल्या संस्कृत मधील तीन खंडा मध्ये लिहिलेला ग्रंथ आहे. या ग्रंथात महाराजांनी प्रशासन कसे चालवावे, काय नियम असावेत याचे विवेचन केले आहे. या ग्रंथाचे मराठीत अनेक अनुवाद झाले आहेत. ग्रंथाचा अभ्यास करून काही जणांनी एम. फिल. / पीएच. डी. मिळवली आहे. या ग्रंथाची मूळ हस्तलिखित प्रत मुंबईच्या शासकीय ग्रंथालयात आहे.

श्रीबुधभूषण हा स्वतंत्र ग्रंथ नसून, यामध्ये असलेले अनेक श्लोक संग्रहित आहेत. अर्थातच हा ग्रंथ लिहिण्यापूर्वी संभाजी महाराजांनी महाभारत, कामन्दकीय नीतिसार, विष्णुधर्मोत्तर पुराण, मत्स्यपुराण आदी प्राचीन ग्रंथांचा सखोल अभ्यास केला आहे हे दिसून येते. वेगवेगळ्या पौराणिक ग्रंथातून संभाजी महाराजांनी राज्य प्रशासन / राजनीती या विषयांना धरून निवडलेले श्लोक आणि त्यांचे योग्य वर्गीकरण करून त्या त्या विषयानुसार शीर्षक देऊन या ग्रंथात समाविष्ट केले आहेत.

श्रीबुधभूषण ग्रंथामध्ये शेषनाग, गरुड, जीभ, भ्रमर, कुंभ, मीन (मासा), उंट, दुदुंभी, निंबवृक्ष, सोने इत्यादी विषयांवर श्लोक आहेत. तसेच सूर्यासंबंधीचे ८, चंद्रासंबंधीचे ८, वायुसंबंधीचे ३, मधुकर (भ्रमर) संबंधीचे ८, हंसाविषयीचे ५, हत्तीसंबंधीचे ५, विविध वृक्षासंबंधीचे १८ असे श्लोक आहेत. सुमारे 89 विषयांवर निरनिराळ्या पक्ष्यांची, वृक्षांची उदाहरणे देऊन व्यंग रूपाचा खुबीदार वापर बुधभूषण मधील श्लोकांत झाला आहे.

शिवकुळाचे श्रद्धास्थान श्रीशिवशंकर, श्रीपार्वती, श्रीभवानीदेवी, श्रीकृष्ण भगवान, गणव्यवस्थाप्रमुख गणपती, भगवान गौतम बुद्ध, बळीराजा

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्यांचे नांव: कु. प्रेरणा रमेश महाडिक. वर्ग: BCS (II)

पुस्तकाचे नांव: छावा मो. नं.: 9309041094

लेखकाचे नांव: शिवाजी सावंत. किंमत: ५४०.

प्रकाशकाचे नांव: मेहता पब्लिशिंग हाऊस एकूण पृष्ठे: 8९३

आशय: पुस्तक वाचल्यावर संभाजी महाराजांची ओळख अनेक रूपातून झाली. युवराज, एक शूर लढवय्या, कोणत्याही प्रसंगी माघार न घेता लढणारा वीर, धोरणी राजकारणी, प्रजाहितदक्ष राजा, तरल संवेदना जाणून त्या शब्दबद्ध करणारा कवी, कर्तव्यनिष्ठ पुत्र, प्रेमळ भाऊ नि आदर्श पती. पण या सर्वांतही त्यांची खरी ओळख मला पटली ती माणूस म्हणून. मराठा साम्राज्याचे राजे असूनही त्यांनी गरीब जनतेवर कधी अन्याय होऊ दिला नाही प्रसंग पडताच आप्तजनांना विरोध करून त्यांना शिक्षाही केल्या, पण निरपराधांच्या बळी पडू दिला नाही. प्रत्येक धर्माचा आदरभाव असायचा त्यांच्या मनी, कोणताही साबत केल्याला कधी त्यांनी सक्तीने धर्मबदल करायला लावला नाही. औरंगजेबाच्या कुटील - गरस्थानी महासत्तेसमोर त्यांचं हे माणूसपण निश्चितच निर्विवादपणे मोठं वाटलं. संभाजीराजे जेव्हा दिलेरखानाला जाऊन मिळाले तेव्हा खरतर चूकी त्यांच्यापेक्षा ही जास्त परिस्थितीची होती सोयराबाई आणि दरबारातील काही महत्त्वाचे मंत्रिगण यांनी संभाजीराजाविरुद्ध अशी स्थिती निर्माण केली. इतकंच काय तर शिवाजी महाराजांना विष देऊन स्वतः मारण्याचा कट केल्याचा आरोप हि त्यांच्यावर लावला. सततच्या या कट कारस्थानांमुळे नाईलाजाने शिवाजी महाराजांनी संभाजीमहाराजांना या सर्वांपासून दूर ठेवले, आपल्या दक्षिण भारतातील स्वारींसोबतही संभाजी राजांना त्यांना नेता आलं नाही आणि या सर्वांतूनच कळत-नकळत संभाजीराजांचं मन दुखावलं होतं. त्यांनी बंड पुकारलं खरं पण ते त्यांचा उतावळ

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्यांचे नांव: कु. तन्वी लक्ष्मण पाटील वर्ग: BCA - II

पुस्तकाचे नांव: अग्निपंख मो. नं.: 7350720325

लेखकाचे नांव: डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम किंमत: 216 रुपये

प्रकाशकाचे नांव: राजहंस प्रकाशन गृह एकूण पृष्ठे: 180

आशय: स्वातंत्र्योत्तर काळात भारतीयांना अशक्य स्वप्न बघायला शिकवणारे, प्र- जपूर्वक त्याचा पाठपुरावा करून त्यांना प्रत्यक्षात आणणारे, तसेच अवकाश, क्षेपणास्त्र आणि अणुशक्ती यात भारताला स्वावलंबी बनवून जगात देशाची नवीन ओळख निर्माण करणारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम. एक मध्यवर्गीय कुटुंबात जन्मले. "भारतरत्न", "मिसाईल मॅन" आणि भारताचे लोकप्रिय राष्ट्रपती राहिलेल्या कलामांची गोष्ट WINGS OF FIRE अर्थातच "अग्निपंख".

तामिळनाडूमधील रामेश्वरम या छोट्या धर्मक्षेत्री एका अशिक्षित नावाड्याच्या पोटी १९३१ मध्ये जन्मलेला हा मुलगा म्हणजेच देशातील 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान मिळवणारे आजचे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम. या आत्मचरित्रात त्यांनी एका बाजूने आ. या आयुष्यातील व्यक्तिगत आणि व्यावसायिक संघर्ष चितारलेला आहे.

अग्नि, आकाश, पृथ्वी, त्रिशूल, नाग या घरोघरी पोहोचलेल्या नावांची क्षेपणास्त्रांची जडणघडणही फार सुंदरपणे वाचकांना सांगितलेली आहे. हे पुस्तक केवळ डॉ. अब्दुल कलाम यांचे आत्मचरित्र नसून स्वतंत्र भारताच्या तंत्रज्ञानाविषयक लढाईचे एक स्पंदन आहे, जागतिक शस्त्रस्पर्धेच्या राजकारणाची आणि विज्ञानाची ती कहाणी आहे; तसेच स्वयंपूर्ण होण्यासाठी आपल्या देशाने केलेल्या संघर्षाचे ते मनोहारी खंडकाव्यही आहे.

WINGS OF FIRE या लोकप्रिय आत्मचरित्रात व्यक्तिगत आणि व्यावसायिक आयुष्यातील संघर्ष आणि मिळालेले यश त्यांनी प्रांजळपणे मांडले आहे. प्रत्यक्षात त्यांना दोन पंख असणारे विमान उडवायचे होते पण, नियतीने त्यांना अग्नि पंख असणाऱ्या क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक बनवले. ही पृथ्वी परमेश्वराची आहे, हे अफाट आकाश आणि अथांग समुद्रही त्याच्यात सामावले आहेत; डॉ. कलामांच्या आत्मचरित्राची सुरुवात अथर्ववेदातील या ऋचाने होते.

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्यांचे नांव: कुमारी : अस्मिता दशरथ चोगुले  वर्ग: SY B.S.C

पुस्तकाचे नांव: अग्निपंख  मो. नं.: 9309412680

लेखकाचे नांव: डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम  किंमत: 190

प्रकाशकाचे नांव: गिरीश अर्जुन खरात  एकूण पृष्ठे: 189

---

आशय:

अग्निपंख हे पुस्तक केवळ डॉ. अब्दुल कलाम यांचे आत्मचरित्र नसून स्वतंत्र भारताच्या तंत्रज्ञानविषयक लढाईचे एक स्पंदन आहे. या पुस्तकामध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी त्यांच्या माता-पिता सोबत लहानपणापासून कष्टमय जीवन कसे जगले याचा उल्लेख पुस्तकाच्या प्रथम पृष्ठावर दिसून येतो. "माझी आई" ही मुक्त कवितेमधून डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे आईवर असलेले प्रेम दर्शविते.

या पुस्तकामध्ये डॉ. अब्दुल कलामांनी जडणघडण, सृजन, आराधना, चिंतन, समारोप, इत्यादी त्यांच्या आत्मचरित्राची या ठळक मुद्द्यांवर मांडणी केली. "जडणघडण" या विषयाची सुरुवात "ही पृथ्वी देवाची आहे, हे अफाट, असीम आकाश त्याचेच आहे. दोन्ही अमर्याद समुद्र त्याच्याच हृदयात शांत होतात. आणि तरीही लहानशा तळ्यातसुद्धा तो असतो." या तीन ओळींनी केली आहे. या ओळी अथर्ववेद खंड : चार, ओवी, सोळा यामधून घेतल्या आहेत.

त्यानंतर डॉ. अब्दुल कलाम यांनी त्यांचे आत्मचरित्र लिहिण्यास सुरुवात केली आहे. डॉ. कलाम विज्ञाननिष्ठ शास्त्रज्ञ होते, तितकीच त्यांची ईश्वरावर नितांत श्रद्धा होती. धार्मिक संस्कारांचे बाळकडू त्यांना त्यांच्या जन्मगावी, रामेश्वरलाच मिळाले. त्यांच्यातील धार्मिकता अभ्यासातून, संशोधनातून चिंतनातून आलेली होती. बालपणीच्या अनेक प्रसंगातून त्यांनी हिंदू-मुस्लीम समाजातील सलोख्याचे अनेक प्रसंग अनुभवले आहेत.

प्राथमिक शिक्षणानंतर डॉ. कलाम पुढील शिक्षणासाठी रामनाथपुरमला दाखल झाले. तेथे त्यांना अय्यर दुराई या शिक्षकाने आयुष्याचा एक गुरुमंत्र दिला. तो असा की,

" आयुष्यात यशस्वी होण्यासाठी तीन गोष्टी नेहमी
लक्षात असाव्यात, तीव्र इच्छाशक्ती, विश्वास आणि
आशावादी होऊन प्रयत्नशील रहा.

शालकरी जन्मापासून ते उच्च शिक्षणापर्यंत त्यांच्या प्रत्येक शिक्षकांना त्यांच्यामध्ये एक जिज्ञासू-विद्यार्थी दिसला आणि कलामांना त्यांच्या

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: अनुष्का अंकुश माने — वर्ग: B.Sc I

पुस्तकाचे नांव: सुंदर पत्रे — मो. नं.: 8983826882

लेखकाचे नांव: साने गुरूजी — किंमत: 310 ₹

प्रकाशकाचे नांव: रिया पब्लिकेशन — एकूण पृष्ठे: 312.

आशय: सुंदर पत्र हे मराठी पुस्तक साने गुरूजींकडून लिखित आहे या पुस्तकाचा आशय म्हणजे सुधा ला पत्र लिहून त्यातून अण्णांनी आपल्या मनाचे सारे भाव स्पष्ट त्या पत्रातून उमटलेले आहेत... सुधाताई आणि अण्णांमधील प्रेम काळजी व त्यांचे नाते हे त्या पत्रातून प्रत्येकास समजते, देवाघरी जातानासुद्धा त्याचा फोटो त्यांनी आपल्या उजव्या खिशात ठेवला होता. गुरूजी नाना ठिकाणी हिंडत, नाना देश, नाना वेष, सृष्टीचे नाना प्रकार ते पाहत. त्यांची नजर जशी रत्नपारख्याची होती! साऱ्या देशभरात हिंडून आणि शेकडो ग्रंथ चाळून साक्षेपाने गोळा केलेल्या सुमधुर, सुरस, सुगंधी नि टपोर स्मृतींचे द्रोणच्या द्रोण भरून ते तुला दर शनिवारी पाठवीत. मग तू भाग्याची नाहीस का?

आणि तुला पाठवलेल्या या भेटीचा स्वाद अख्या महाराष्ट्रातल्या शेकडो, हजारो मुलांना गेले वर्षभर चाखायला मिळाला, हे त्यांचे भाग्य! तुला लिहलेली पत्रे महाराष्ट्रातील सर्व बालगोपाळांचा वारसा होणार आहे, हे तुझ्या अण्णांना ठाऊक होते. त्यांच्यापाशी आप-परभावच नव्हता. या पुस्तकाच्या माध्यमातून साने गुरूजींनी मराठी भाषेचा आशय भारतास करून देण्याचे प्रयत्न केले.

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नाव: पल्लवी तुकाराम खरात. वर्ग: BSc-I

पुस्तकाचे नाव: शेतकरी जेव्हा जागा होतो. मो. नं.: 9322911431

लेखकाचे नाव: अभिमन्यू सूर्यवंशी किंमत: १२५ रुपये

प्रकाशकाचे नाव: आनंद अवधानी । श्याम देशपांडे । सुहास कुलकर्णी एकूण पृष्ठे: ११२

आशय:

'शेतकरी जेव्हा जागा होतो' या पुस्तकाचे लेखक अभिमन्यू सूर्यवंशी हे आहेत. तसेच या पुस्तकाचे नायक पुंजाबाबा गोवर्धने आहेत. हे स्वातंत्र्यानंतर लगेचच झालेल्या भात उत्पादक शेतकऱ्यांच्या लढ्याचे सेनापती होते. मला हे पुस्तक खूप आवडले. या पुस्तकात पुंजाबाबांच्या जन्मापासून ते निधनापर्यंत त्यांनी जे-जे कार्य केले, त्याचा आढावा या पुस्तकातून लेखक अभिमन्यू सूर्यवंशी यांनी आपल्यापर्यंत पोहचवण्याचे काम केले आहे. पुंजाबाबांनी इगतपुरी तालुक्यातील भात लढ्यात शेतकऱ्यांच्या न्याय मागण्यांसाठी त्यांनी रान उठवलं. पुंजाबाबा यांनी शेतकऱ्यांच्या ~~न्यास~~ न्याय हक्कांसाठीचा भात लढा यशस्वी केल्यानंतर त्यांनी अनेक अडचणींना सामोरं जाऊन 'भातकुट्या' सावकारांच्या विरोधात न्यायालयीन लढाई करून त्यांच्या त्यांच्या कराल दाढेतून शेतकऱ्यांची यशस्वी सुटका केली. पुंजाबाबा यांचे कार्य अनेक शेतकऱ्यांना प्रेरणा दायक आहे.

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

## ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

# पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: कु. सिद्धी हणमंत पाटील    वर्ग: बी. ए. भाग. 2

पुस्तकाचे नांव: मृत्युंजय    मो. नं.: 9371626553

लेखकाचे नांव: शिवाजी सावंत    किंमत: 450 रु.

प्रकाशकाचे नांव: रत्नाकर अनंत कुलकर्णी    एकूण पृष्ठे: ६२८

**आशय:**

शिवाजी सावंत लिखित कर्णाची अमर गाथा मृत्युंजय 58 वर्षांच्या दीर्घकाळानंतर आजही मराठी व सर्वच पुस्तक प्रेमी वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवित आहे. मृत्युंजय ही कादंबरी महाभारतातील पात्र महापराक्रमी, दानशूर महारथी कर्णाला समर्पित आहे.

या कादंबरीचे एक पाहताक्षणीच नजरेस येणारे खास वैशिष्ट्य म्हणजे ही इतर कादंबऱ्यांप्रमाणे एकमुखी गोष्ट नाही आहे. तर महाभारतातील विविध पात्रांच्या मुखातुन पुस्तकाच्या प्रत्येक पानावर झरझर उलगणारा कर्णाचा जीवनपट आहे. कुंतीला मिळालेले असमान्य वरदान, त्यातुनच कर्णाचा झालेला असमान्य जन्म, जगाच्या भितीने कुंतीने घेतलेला कठोर निर्णय, गुरु द्रोण आणि पांडवांकडुन कर्णाचा झालेला अपमान, त्यातुनच दुर्योधनासोबत जन्मास आलेले मित्रप्रेम, द्रौपदी वस्त्रहरण, कुरुक्षेत्रातील युद्ध या सर्वच गोष्टी वरवर प्रत्येकास माहित आहेतच. पण या गोष्टी वरवर माहित आहे. पण या प्रत्येक गोष्टीत काही बारीक बारीक अशा कितीतरी गोष्टी दडलेल्या आहेत. ज्या पुस्तक हाती घेण्याआधी आपल्या विचारांतही नसतात किंवा वर्षानुवर्षे आपण या प्रश्नांची उत्तरे शोधत आलो आहोत पण जी अजूनही अनुत्तरीत आहेत. उदाहरणार्थ कुंतीला ही पुत्रप्राप्ती नक्की कशी झाली? सारथ्याच्या घरी कर्णाचे बालपण कसे असेल? शोण म्हणुन असलेला राधेचा मुलगा या कर्णासोबत कसा वागत होता? कर्णाची पत्नी वृषाली नक्की कशी होती...

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: दिक्षा दिलीप जाधव    वर्ग: B. com. II

पुस्तकाचे नांव: श्यामची आई    मो. नं.: 8080715200

लेखकाचे नांव: साने गुरुजी.    किंमत: 280

प्रकाशकाचे नांव: साकेत    एकूण पृष्ठे: ~~109~~ 300

**आशय:**

श्यामची आई हे ब्रिटीश राजवटीत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील कोकण भागातील हिंदू कुटुंबातील साने गुरुजींचे आत्मचरित्र आहे. साने गुरुजी यांच्या लहानपणाच्या घटना मांडलेल्या आहेत. श्यामची आई हे पुस्तक सुंदर सुरस असून त्यात गुरुजींच्या हृदयातील थोर जिव्हाळा ओतलेला आहे. आईबद्दल प्रेम, सन्मानाच्या भावना मांडलेल्या आहेत.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: परब सायली विजय — वर्ग: B.A.I

पुस्तकाचे नांव: श्यामची आई — मो. नं.: 9699579841

लेखकाचे नांव: साने गुरुजी — किंमत: 70

प्रकाशकाचे नांव: प्रल्हाद केशव अत्रे — एकूण पृष्ठे: 102

आशय: प्रत्येक वेळा मनुष्याचा मोठेपणा त्याच्या आईबापांवर अवलंबून असतो त्याचे पुढचे बरे वाईट जीवन त्याच्या आईबापांवर अवलंबून असते त्याच्या बऱ्यावाईटाचा पाया लहानपणीच भरला जात असतो पाळण्यात असतानाच आईच्या अंगाखांद्यावर खेळत असतानाच पुढील जीवनाच्या विकासाचे बी पेरले जात असते मोठेपणा याचा अर्थ जगातील काही व्यक्तींच्या ओठांवर आपले नाव काही काळ नाचणे असा मी करत नाही.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

## ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

# पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: प्रतिभा शोभा शंकर काळे | वर्ग: BA-I

पुस्तकाचे नांव: ययाती | मो. नं.: 9325244081

लेखकाचे नांव: वि. स. खांडेकर | किंमत:

प्रकाशकाचे नांव: मेहता प्रकाशन | एकूण पृष्ठे: 351

**आशय:**

जेव्हा ययाती अचानक म्हातारा झालेला दिसतो तेव्हा त्याच्या आतल इच्छा त्याला त्रास देतात. तो आपल्या मुलांना त्याचे तारुण्य देण्यास सांगतो. त्याचा मुलगा पुरू त्याच्या मदतीला येतो आणि विनंती पूर्ण करतो. पण पुरू आणि शर्मिष्ठा यांचे त्यागावरचे अतुलनीय प्रेम ययातीला त्याच्या चुका लक्षात घेण्यास मदत करतात.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: पाटील मनस्वी माणिक | वर्ग: B.SC - I

पुस्तकाचे नांव: बांधावरच्या बाभळी | मो. नं.: 9322866276

लेखकाचे नांव: ग. दि. माडगूळकर | किंमत: 180 ₹

प्रकाशकाचे नांव: साकेत प्रकाशन | एकूण पृष्ठे: 144 Pages

**आशय:**

गजानन दिगंबर माडगूळकर (गदिमा) हे आधुनिक काळातील मराठी भाषेतील अग्रगण्य साहित्यिक होते. ते गद्य व पद्य दोन्ही क्षेत्रात प्रसिद्ध आहेत. त्यांचे गीत रामायण फार लोकप्रिय आहे. सुप्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर ह्यांचे लेखनिक म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. गीतकार, कथासंवादकार आणि कथासंवादकार म्हणून पंधरा हिंदी चित्रपटांसाठी त्यांनी काम केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहलेली गीते 'चैत्रबन' ह्या नावाने संग्रहित आहेत. तसेच त्यांनी प्रसिद्ध झाल्या आहेत. युद्धाच्या सावल्या ह्या नावाने एक नाटक त्यांनी लिहले होते. त्यांच्या उल्लेखनीय पुस्तकांपैकी काही काही अशी : कविता – जोगिया चार संगीतिका काव्यकथा, गीत, रामायण, गीत गोपाल गीत सौभद्र, कथा संग्रह कृष्णाची करंगळी, तुपाची नंदादीप, चंदनी उदबत्ती, कादंबरी आकाशाची फळे, इत्यादी. त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही सन्मानीय पदवी लोकांना स्वयंमस्फूर्तीने दिली.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

# पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: संकेत संजय धुमाळ — वर्ग: BSC - III

पुस्तकाचे नांव: अग्निपंख — मो. नं.: 9022662351

लेखकाचे नांव: डॉ. ए. अरुण तिवारी — किंमत: 230

प्रकाशकाचे नांव: माधुरी शानबाग — एकूण पृष्ठे: 200

**आशयः** अग्निपंख - डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

एक मुलगा म्हणून कलाम
पुस्तकाचा पहिला भाग हा तरुणपणीचे कलाम यांच्या आयुष्याविषयी आहे. त्याचे प्रियजन, मित्र आणि शिक्षक यांच्याशी त्याचे विविध प्रकारचे संवाद आहेत. पुस्तकाची सामग्री विविध चित्रांनी भरलेली आहे जसे की शिक्षकांकडून शिकणे, रामेश्वरपासूनचा प्रवास आणि बरेच काही

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: साक्षी सर्जेराव पाटील — वर्ग: BSC-III

पुस्तकाचे नांव: 'उसवण' — मो. नं.: 7588550217

लेखकाचे नांव: देवीदास सौदागार — किंमत: 160

प्रकाशकाचे नांव: देशमुख आणि कंपनी — एकूण पृष्ठे: 1

**आशय:**

माणसाचं जगणं हे इतकं विलक्षण आहे की, त्याला कुठलं लेबल लावणं देखील चुकीच आहे. कारण इथं प्रत्येकाचा विषयच वेगळा आहे, वरवर सर्व माणसं एकसारखीच दिसत असली तरी प्रत्येकाचं जगणं वेगळं अन या जगण्याचा संघर्षही. लेखक देवीदास सौदागार यांच्या 'उसवण' या ग्रामीण पार्श्वभूमीच्या कादंबरीतला नायक विठोबाचं जगणंही असंच आहे, शिंप्यासारखं.... उब देणाऱ्या गोधडीला हिवाळं लावल्याप्रमाणं! यात वर्ग संघर्ष, जात संघर्ष, विचारांचा संघर्ष तसच आधुनिक-जुन्यातला संघर्ष, विचारांचा संघर्ष, तसंच नात्यांतील प्रेमाचा संघर्ष अशी अनेक रंगीबेरंगी ठिगळं आहेत.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

# पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: सानिका आशीराव पाटील. वर्ग: BSC III

पुस्तकाचे नांव: छावा मो. नं.: 9404221732

लेखकाचे नांव: शिवाजी सावंत किंमत: 645

प्रकाशकाचे नांव: मेहता पब्लिशिंग हाऊस एकूण पृष्ठे: 843

**आशय:**

शिवपुत्र संभाजी महाराजांचा जीवनप्रवास म्हणजे एक अग्निदिव्य. छत्रपतींच्या निधनानंतर औरंगजेब पाच लाखांचे सैन्य व चौदा कोटींचा खजिना घेऊन दख्खन जिंकायला निघाला. पण छत्रपती संभाजी महाराजांनी त्याला नऊ वर्षे निकराचा लढा देऊन जेरीस आणला दख्खन जिंकायला निघालेल्या या क्रूर औरंगजेबाला पुन्हा दिल्लीच्या तख्तावर विराजमान होता आलं नाही.

झुकला औरंग्या म्हणे कैसा हा छावा
ऐसा मर्द मराठा पुन्हा पुन्हा जन्माला यावा...

लेखक शिवाजी सावंत यांनी छावा सन 1972 साली लिहायला घेतलं. लिखाणाच्या पहिल्याच दिवशी जगदंबेचे कसा कौल दिला याबद्दल त्यांनी प्रस्तावनेत लिहलं आहे. किल्ले प्रतापगडावर 1980 साली यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते छावा प्रकाशित झालं आणि महाराष्ट्राच्या जनतेने या पुस्तकाला अक्षरशः डोक्यावर घेतलं

लेखकाने ज्या पद्धतीने पात्रांच्या मनाचा कौल घेण्याचा प्रयत्न केला आहे तो विशेष. प्रत्येक वाक्य प्रत्येक शब्द तुमच्या मनाला भिडत राहतो. आणि शंभूकाल तुमच्या डोळ्यासमोर उभा राहतो.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: प्रतिक मोहन पाटील — वर्ग: BSc-II

पुस्तकाचे नांव: नटसम्राट — मो. नं.: 9604568575

लेखकाचे नांव: वी. वी. शिरवाडकर — किंमत: 175.00

प्रकाशकाचे नांव: प्रकाशन पब्लिकेशन — एकूण पृष्ठे: 124

आशय:
'नटसम्राट' या ~~नाटकाने~~ नाटकाने प्रत्येक मराठी नाट्य रसिकाच्या मनात घर केले आहे. शेक्सपिअरच्या 'किंग लियर' ने शिरवाडकरांच्या लेखनाला चालना दिली असली तरी त्यानंतर त्यांच्या प्रतिभेने झेप घेऊन ह्या नाटकाला अत्यंत जीवघेणी आर्तता मिळवून दिली आहे. यातील गणपतराव बेलवलकर ह्या वृद्ध नटाची आणि त्यांची 'सरकार' कावेरी यांची व्यक्तिचित्रण अनेक कलावंतांना मोह पाडणारे आहे आणि गेली चाळीसहून अधिक वर्षे अनेक जड ते जिद्दीने रंगभूमीवर आणत आहेत. 'साहित्य अकादमी' पुरस्कार मिळालेले हे एकमेव नाटक. 'मराठीतील सर्वात वाचले गेलेले नाटक,' असे याचे वर्णन केल्यास ते अतिशयोक्त ठरू नये, अभ्यासीय. 'नटसम्राट' ची मोहिनी फक्त मराठी वाचकांनाच वाटलेली नाही त्यामुळेच ह्या नाटकाचे अनेक भाषांतून अनुवाद प्रसिद्ध झाले आहे.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: आदित्य आनंदा गुरव — वर्ग: BCS - I

पुस्तकाचे नांव: श्यामची आई — मो. नं.: 9545720702

लेखकाचे नांव: साने गुरुजी — किंमत: 100/-

प्रकाशकाचे नांव: रिया पब्लिकेशन — एकूण पृष्ठे: 255

**आशय:**

श्यामची आई हे पांडुरंग सदाशिव साने यांनी लिहिलेली मराठी आत्मकहाणी आहे. नाशिकच्या कारागृहात असताना फेब्रुवारी ८ इ.स १८33 रोजी त्यांनी या पुस्तकाच्या लिखाणास प्रारंभ केला आणि 13 फेब्रुवारी इ.स १८33 रोजी पहाटे त्या संपविल्या. आईच्या प्रेममय थोर शिकवणुकीचे सरळ साध्या व सुंदर संस्कृतीच्या एक करुण व गोड कथात्मक चित्र म्हणजे श्यामची आई असे म्हणता येईल आपल्या मुलांवर अपार माया करणारी त्यांनी सुसंस्कारी बनावे म्हणून झटणारी पण हे संस्कार उपदेशाच्या डोसाच्या रूपात मुलांना न पाजता स्वतःच्या वागण्यातून व दैनंदिन छोट्याछोट्या प्रसंगातून मुलांच्या मनावर ते संस्कार बिंबवणारी आणि मुलांना शिस्त लावताना प्रसंगी कठोर बनणारी ही आदर्श आई असल्या पिढीतील उगवत्या पिढीसाठीच नव्हे तर त्यांच्या आईबाबांसाठी प्रेरक ठरेल हे निश्चित.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: रोहित नाकील — वर्ग: BCS-I

पुस्तकाचे नांव: श्यामची आई — मो. नं.: 9175128776

लेखकाचे नांव: साने गुरुजी — किंमत: 100/-

प्रकाशकाचे नांव: रिया पब्लिकेशन — एकूण पृष्ठे: 225

**आशय:**

श्यामची आई हे पांडुरंग सदाशिव साने यांनी लिहिलेली मराठी आत्मकहाणी आहे. नाशिकच्या कारागृहात असताना फेब्रुवारी 9 इस 1933 रोजी पहाटे त्या संपविल्या. आईच्या प्रेममय थोर शिकवणुकीचे सरळ, साध्या व सुंदर संस्कृतीचे मूक करुण व गोड कथात्मक चित्र म्हणजे 'श्यामची आई' असे म्हणता येईल. आपल्या मुलांवर अपार माया करणारी, त्यांनी सुसंस्कारी बनावे म्हणून झटणारी; पण हे संस्कार उपदेशाच्या डोसाच्या रूपात मुलांना न पाजता स्वत त्या वागण्यातून व दैनंदिन छोट्या-छोट्या प्रसंगातून मुलांच्या मनावर ते संस्कार बिंबवणारी आणि मुलांना शिस्त लावताना प्रसंगी कठोर बनवणारी ही आदर्श आई, आजच्या पिढीतील उगवत्या पिढीसाठीच नव्हे तर त्यांच्या आईबाबांसाठी प्रत्येक ठरेल, हे निश्चित.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

## ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

| | | | |
|---|---|---|---|
| विद्यार्थ्याचे नांव: | श्रेयश त्रिंबक कुंभार | वर्ग: | B.Sc I |
| पुस्तकाचे नांव: | Discovery of india | मो. नं.: | 9699427294 |
| लेखकाचे नांव: | पंडीत नेहरू | किंमत: | 560 |
| प्रकाशकाचे नांव: | मेरिडियन बुक्स. | एकूण पृष्ठे: | 498 |

**आशय:**

द डिस्कव्हरी ऑफ इंडिया हे पुस्तक भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी 1942-45 मध्ये लिहलेले स्वातंत्र्या पुर्वी ब्रिटीश वसाहतीच्या काळात महाराष्ट्र, राज्यातील अहमदनगर किल्यावर कारावासात असताना लिहले होते. 1944 मध्ये लिहले गेले पण 1946 मध्ये प्रकाशीत झाले. या पुस्तकाचा प्रवास प्राचीन इतिहासा पासून सुरू होतो आणी ब्रिटीश राजवटीच्या शेवटच्या वर्षापर्यंत चालु राहतो. त्यांनी या वेळेचा विचार व उपयोग करुण भारताच्याबद्दल त्यांचे विचार आणी ज्ञान लिहण्यासाठी केला.

तुरुंगवासात त्यांनी पुस्तक लिहले या पुस्तकात नेहरूंनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या भारतीयांच्या नजरेतुन भारतीय इतिहास तत्वज्ञान आणी संस्कृतीचे विस्तृत दृश्य प्रदान केली आहे. नेहरूंनी त्यांच्या लेखनातुन सिंधू संस्कृती पासून सुरू होउन वेद, उपनिषद, महाकाव्ये, बौद्ध आणी जैन धर्म, इस्लाम आणी मुघल सामराज्य, तसेच ब्रिटीश राजवटीपर्यंतचा प्रवास उलगडला आहे. त्यांनी भारताच्या भौगोलीक, सांस्कृतीक आणी सामाजीक - राजकीय परिस्थीतीतील बदलांचे सखोल निरीक्षण मांडले आहे.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: राधिका नंदकुमार जाधव. वर्ग: B.Sc-II

पुस्तकाचे नांव: महाश्वेता मो. नं.: 9561151985

लेखकाचे नांव: सुधा मुर्ती किंमत: 80/-रु

प्रकाशकाचे नांव: Penguin Books India एकूण पृष्ठे: 179 Pages

**आशय:** पुस्तक म्हणजे असे जे वाचकाला धरून ठेवेल वाचनात आणि 'महाश्वेता' हे पुस्तक तेच करते.
अतिशय सुंदर लेखन व सोपी भाषा आहे.
पुस्तकात एका तरुणीची कथा आहे जी आयुष्याच्या चढ उतारांना कशी सामोरी जाते, आणि शेवटी काय निर्णय घेते.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

## ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

# पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: कु. स्नेहल संजय मांगलेकर    वर्ग: B.Sc.I

पुस्तकाचे नांव: ययाती    मो. नं.: 7410121166

लेखकाचे नांव: वि. स. खांडेकर.    किंमत: 230 रु

प्रकाशकाचे नांव: मेहता पब्लिकेशन    एकूण पृष्ठे: 351

**आशय:**

- ययाती ही कादंबरी हस्तिनापूरच्या राजा ययातीच्या जीवनावर आधारित आहे.
- ययातीच्या जीवनातील निराशा, क्रूरता आणि उत्कटता यांना या कादंबरीत दाखवण्यात आले आहे.
- ययाती हा प्राचीन भारतातील चक्रवर्ती सम्राट होता.
- तो पांडव आणि यदुवंशीयांचा पूर्वज होता.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: प्रतिक्षा धुमाळे — वर्ग: B.A.II

पुस्तकाचे नांव: कोसला — मो. नं.: 7020933963

लेखकाचे नांव: भालचंद्र नेमाडे — किंमत: 250

प्रकाशकाचे नांव: पॉप्युलर प्रकाशन — एकूण पृष्ठे: 334

**आशय:**

खानदेशातल्या एका खेड्यातून पुण्यात शिक्षणासाठी आलेला पांडुरंग सांगवीकर हा 1960 च्या पिढीच्या तरुणांचा प्रातिनिधी कादंबरीचा नायक आहे. लग्न, मित्रसंबंध, शिक्षण, राजकारण अध्यात्म अशा अनेक विषयांचा विचार तो पूर्वग्रह टाळून करतो. शिकत असताना समवयस्कांचा खोटेपणा, वसतिगृहातील मुलांचे टोळीवजा व्यवहार, मैत्री, पुढारी वगैरे यांचा अनुभव घेत तो समाजापासून दूर जातो. अशी कादंबरी आहे

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: सिद्धी संजय चौगुले    वर्ग: Bcom IT - II

पुस्तकाचे नांव: पानिपत    मो. नं.: ९३८९१११०५९

लेखकाचे नांव: कै. स. विश्वास पाटील    किंमत: ३७० ₹

प्रकाशकाचे नांव: विश्वास पाटील    एकूण पृष्ठे: ६१३

**आशय:**

~~कादंबरी~~

अटकेपार मराठ्यांच्या दिग्विजयी जरीपटका मोठ्या विश्वासाने रघुनाथरावांनी फडकवला; पण त्याच बरोबर संघर्षाची विषारी बीजे रोवली. त्यांचे रूपांतर सर्वनाशी महायुद्धाच्या महावृक्षात होणार हे जवळ जवळ निश्चितच होतं. मल्हारराव होळकरांच्या शब्दाचा मान राखायचा म्हणून राघोबाने नजीबुद्दौला जिवंत सोडला आणि तिथूनच खरा सर्वनाश मराठी दौलतीवर ओढवायला सुरुवात झाली.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: ऐश्वर्या हणमंत कोष्टी वर्ग: BSC - I

पुस्तकाचे नांव: श्यामची आई मो. नं.: 9529586282

लेखकाचे नांव: साने गुरुजी किंमत: 60

प्रकाशकाचे नांव: साकेत प्रकाशन एकूण पृष्ठे: 109

आशय: पुष्कळ वेळ मनुष्याचा मोठेपणा त्याच्या आईबापांवर अवलंबून असतो. त्याचे पुढचे बरे-वाईट जीवन त्याच्या आईबापांवर अवलंबून असते. त्याच्या बऱ्यावाईटाचा पाया लहानपणीच भरला जात असतो पाळण्यात असतानाच आईच्या अंगाखांद्यावर खेळत असतानाच पुढील जिवनाच्या विकासासाठी बी पेरले असते. मोठेपणा याचा अर्थ जगातील काही व्यक्तींच्या ओठांवर आपले नाव काही काळ नाचणे, असा मी करत नाही. हिमालयाच्या दऱ्याखोऱ्यांत असे प्रचंड व गगनचुंबी वृक्ष असतील. की ज्यांची नावे जगाला माहित नाहीत;

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: दिक्षा मारुती पवार | वर्ग: M.A-I

पुस्तकाचे नांव: अग्निपंख | मो. नं.: 7666382588

लेखकाचे नांव: ए.पी.जे अब्दुल कलाम | किंमत: 215 रु

प्रकाशकाचे नांव: राजहंस प्रकाशन / पुणे | एकूण पृष्ठे: 179

**आशय:**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीयांना अशक्य स्वप्न बघायला शिकवणारे, प्रयत्नपूर्वक त्याचा पाठपुरावा करुन त्यांना प्रत्यक्षात आणणारे, तसेच अवकाश, क्षेपणास्त्र आणि अणुशक्ती यात भारताला स्वावलंबी बनवून जगात देशाची नवीन ओळख निर्माण करणारे डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम

ने एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मले. "भारतरत्न "मिसाईल मॅन" आणि भारताचे लोकप्रिय राष्ट्रपती राहिलेल्या डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांची गोष्ट WINGS OF FIRE अर्थात "अग्निपंख.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: कु. पौर्णिमा सर्जेराव मोरे — वर्ग: M.A.I (Psychology)

पुस्तकाचे नांव: श्रीमान योगी — मो. नं.: 8600399414

लेखकाचे नांव: रणजित देसाई — किंमत: 665 रु

प्रकाशकाचे नांव: मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे — एकूण पृष्ठे: 1200

**आशय:**

श्रीमानयोगी हे पुस्तक स्वराज्याचे मालक छ. शिवाजी महाराज यांचा इतिहास सांगणारे आहे. मला हे पुस्तक वाचत असताना महाराजांचा जिवंत देखावा समोर उभा राहिला. मला या पुस्तकामुळे समोर आलेल्या परिस्थितीवर मात करण्याची प्रेरणा मिळाली. शिवाजी महाराजांचा इतिहास समजण्यासाठी या श्रीमानयोगी पुस्तकाचे फार महत्व आहे.

धन्यवाद..!

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: कु. शुक्राना बाजासाहेब जमादार वर्ग: बी.कॉम I

पुस्तकाचे नांव: आर्टिफिशियल इंटेलिजन्स मो. नं.: 7028870018

लेखकाचे नांव: अच्युत गोडबोले किंमत: 250रु

प्रकाशकाचे नांव: शरद अष्टेकर एकूण पृष्ठे: 363.

**आशय:**

आर्टिफिशियल इंटेलिजन्स हा तांत्रिक विषय आहे. पण अच्युत गोडबोले यांनी तो अगदी सोप्या भाषेत मांडला आहे. AI ची प्रगती, त्याचा आवाका, त्याचे उपयोग आव्हान, संधी ... या सगळ्यावर भाष्य करून लोकांना AI ची ओळख करून देणारं हे पुस्तक आहे 'कृत्रिम बुद्धिमत्ता' या तंत्रज्ञानामुळे मोठ्या प्रमाणात मानवाच्या उपजीविकेवर नकारात्मक किंवा सकारात्मक होऊ पाहणारा परिणाम व मानवाच्या जगण्या-विषयीच्या संकल्पनांतच होऊ पाहणारी उत्क्रांती या अशा गंभीर व अतिमहत्त्वाच्या बाबतीत सर्वंकष व सर्वसमावेशक चर्चा होणं अत्यावश्यक आहे. त्यांनी AI च्या इतिहासावरून टप्प्याटप्प्याने जात असताना, सद्य स्थितीचा ऊहापोह करत या पुस्तकात AI च्या भविष्याची अतिशय कल्पक मांडणी केली आहे. हे पुस्तक जितके माहितीपूर्ण आहे तितकंच ते अंतर्दृष्टी देणारं आहे. AI चा आपल्या पैकी फक्त काही लोकांवरच नाही तर सगळ्यांवरच परिणाम होणार आहे. त्यामुळे हे पुस्तक समाजातल्या फक्त काही ठराविक घटकांनीच नाही तर, सगळ्यांनीच वाचायला हवं.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: Sanakausar Rafik Inamdar वर्ग: M.A II

पुस्तकाचे नांव: Mrutyunjay मो. नं.: 7030482357

लेखकाचे नांव: Shivaji Sawant किंमत: 450

प्रकाशकाचे नांव: Mehta Publishing House एकूण पृष्ठे: 742

**आशय:**

मृत्युंजय ही कर्णाच्या जीवनावर आधारित महाकाव्यात्मक कादंबरी आहे. कर्णाच्या जन्मापासून त्याच्या मृत्युपर्यंतचा प्रवास लेखकाने सहा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून उलगडला आहे. पुस्तकात कर्णाच्या संघर्षमय जीवनाचे, स्वाभिमानाचे आणि निष्ठेचे मार्मिक दर्शन घडते.

कर्णाच्या समाजातील ~~दर~~ स्थान त्याच्या मित्रांशी असलेले संबंध, आणि त्याच्या नियतीशी चाललेला संघर्ष हे पुस्तकाचे प्रमुख विषय आहेत. कर्णाच्या दुर्योधनावरील निष्ठा आणि अर्जुनाशी असलेली शत्रुत्वाची भावना यांचे सखोल वर्णन करण्यात आले आहे.

लेखकाने साध्या परंतु प्रभावी भाषेत कर्णाचे व्यक्तिमत्व आणि त्याच्या दुर्दैवी पराभव चित्रित केला आहे. मृत्युंजय ही केवळ कर्णाची कथा नसून संघर्ष आणि आत्मसन्मान यांचे प्रतीक आहे. वाचकांना प्रेरणा देणारी ही कादंबरी जीवनाचा नवा दृष्टिकोन देते.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

## ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

विद्यार्थ्याचे नांव: वैष्णवी दशरथ जोशी    वर्ग: एम. ए. भाग. 1 (Psychology)

पुस्तकाचे नांव: श्यामची आई    मो. नं.: 9657212535

लेखकाचे नांव: साने गुरुजी    किंमत: 109

प्रकाशकाचे नांव: साकेत प्रकाशन, पुणे    एकूण पृष्ठे: 232

**आशय:**

श्यामची आई या पुस्तकात साने गुरुजींनी आपल्या आई बद्दल सांगितले आहे. आपले मूल कसे ही असले, तरी आई माया, प्रेम करते. आईचे प्रेम निरागस असते. या पुस्तकात त्यांनी प्रेम, भक्ति, कृतज्ञता यांची अपार भावना यात मांडला आहे. आई आपल्याला संस्कार, बोलणे, वागणे हे सर्व शिकविते. आई आपल्या सर्व गरजा, हट्ट पुरविते. या पुस्तकाच्या मला एक प्रसंग आठवला. साने गुरुजींना भूक लागलेली असते. त्यांना त्यांची आई पाण्यात पीठ घालून देते. त्यांच्याकडे दूध नव्हते. तरी त्यांनी पाण्यात पीठ घातलेले दूध पिले.

यात श्यामची आई हे ब्रिटिश राजवटीत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील कोकण भागातील हिंदू कुटुंबातील साने गुरुजींचे आत्मचरित्र आहे. साने गुरुजींना त्यांना प्रेमाने श्याम असले म्हटले आहे.

धन्यवाद ..!

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: गौरी दत्तात्रय वाघमारे  वर्ग: M.A. II (Psychology)

पुस्तकाचे नांव: अवचेतन मनाची शक्ती  मो. नं.: 8830412259

लेखकाचे नांव: डॉ. जोसेफ मर्फी  किंमत: 200

प्रकाशकाचे नांव: साकेत प्रकाशन  एकूण पृष्ठे: 272

**आशय:**

डॉ. जोसेफ मर्फी यांनी लिहिलेले अवचेतन मनाची शक्ती हे पुस्तक आपल्या अवचेतन मनाच्या अद्भुत शक्तीची व्याख्या करते. पुस्तकात असे नमुद केले आहे की "कधीही नकारात्मक विधान पुर्ण करु नका. ते लगेच उलट करा म्हणजेच सकारात्मक करा. आणि तुमच्या आयुष्यात चमत्कार घडतील. तुम्ही चांगला विचार केला तर चांगले होईल. जर तुम्ही वाईट विचार केले तर वाईटच होईल. आपण जो विचार करतो आणि ज्या विचारांवर ती पुर्ण विश्वास ठेवतो. त्या गोष्टी सत्यात/ वर्तमानात उतरवण्याचे कार्य हे अवचेतन मन करते. अवचेतन मनाद्वारे आपण आपल्याला हव्या असलेल्या सर्व गोष्टी मिळवु शकतो. हे पुस्तक प्रार्थनेची शक्ती आणि सकारात्मकता आपल्या जीवनात लागू करण्यास प्रोत्साहित करते. हे आपल्या विचारांच्या स्वरुपाला प्रतिसाद देते. नेहमी सकारात्मक विचार करणे खूप महत्वाचे आहे

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

**ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: पाटील मधुरा सर्जेराव | वर्ग: M.A.II (Psychology)

पुस्तकाचे नांव: मनात | मो. नं.: 7218641422

लेखकाचे नांव: अच्युत गोडबोले | किंमत: 403

प्रकाशकाचे नांव: मनोविकास प्रकाशन | एकूण पृष्ठे: 590

**आशय:**

अच्युत गोडबोले या लेखकाचे पुस्तक (मनात) हे आहे. त्यामध्ये मन समजून घेतो मेंदू कसे कार्य करते. तसेच स्मरणशक्ती, धारणा, भावना आणि बुद्धिमत्ता यासारख्या विषयांचा समावेश आहे. त्यामध्ये मानवी वर्तन समजण्यास मदत करतात. लेखक मनाच्या कार्याचे चित्रण करण्यासाठी साहित्य, संगीत आणि कलेतील संदर्भ देतात. यामध्ये आयुष्य कसे जगावे, त्यातील संघर्षांशी कसे लढावे, आणि यश-अपयश यांकडे कसे पाहावे याबाबत त्यांनी मांडलेले दृष्टिकोन होत.

"मनात" हे पुस्तक वाचकांना केवळ माहिती देत नाही, तर त्यांच्या आयुष्यातील विचारप्रक्रियेला नवा दृष्टिकोन ही देते.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

## ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

# पुस्तक परीक्षण स्पर्धा

---

**विद्यार्थ्याचे नांव:** अंकिता अर्जुन शिरलोडे. **वर्ग:** MA I

**पुस्तकाचे नांव:** माइंडफुलनेस **मो. नं.:** 9604607270

**लेखकाचे नांव:** डॉ. राजेंद्र बर्वे. **किंमत:** 200

**प्रकाशकाचे नांव:** रोहन प्रकाशन **एकूण पृष्ठे:** 133

**आशय:**

"पूर्णभान" म्हणजे आतल करुणामय आणि स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देणारी संकल्पना म्हणता येईल. 'माइंडफुलनेस' हे डॉ. राजेंद्र बर्वे यांनी लिहिले हे पुस्तक वाचून त्यातून माझ्या स्वत: बद्दलची स्वताला असलेली जाणीव तसेच पूर्णभान ही पूर्ण संकल्पना समजली. आजकाल तानतणावाची वाढती संख्या मनातील अनेक असंख्य प्रश्न त्यामुळे होणार मनावरील परिणाम एकाग्रतेवर येणारे अडथळे अस्थिरता, स्वत: बद्दल आत्मविश्वास यांना एक वेगळं वळण देणारे हे पुस्तक आहे. माणसाने प्रत्येक क्षण हा कसा आणि कोणत्या पद्धतीने जगला पाहीजे याचे चांगले उदाहरण म्हणजे "माइंडफुलनेस" हे पुस्तक आहे. माणसाने क्षण हा आनंदाने आणि समस्या मुक्तपणे जगण्याचा चांगला मंत्र देणारे पुस्तक म्हणजे माइंडफुलनेस होय. प्रत्येकाला, प्रत्येक व्यक्तीच्या मनाला गरज आहे ती आज पूर्णभानाने जगण्याची अर्थातच माइंडफुलनेस ची...

आपण जो वर्तमानात क्षण जगतो, तो कश्या पद्धतीने आपल्याला जगता आले पाहीजे ते स्वत:वरती अवलंबून असते. परिस्थितीशी न डगमगता सामना करता आला पाहीजे. स्वतःच्या समस्या त्यातील अडथळे यांना

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आयोजित

## "पुस्तक परीक्षण स्पर्धा"

विद्यार्थ्याचे नाव : सुहानी शिवाजी पाटील वर्ग : BCS-II
पुस्तकाचे नाव : महानायक मो. नं : 9699959422
लेखकाचे नाव : विश्वास पाटील किंमत : 575
प्रकाशकाचे नाव : राजहंस एकूण पृष्ठे : 700

आशय :

राजहंस प्रकाशनचे "विश्वास पाटील" यांनी लिहिलेले नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या संपूर्ण जीवन गाथेवर आधारित "महानायक" पुस्तक नुकतेच वाचून संपवले. पुस्तकाबद्दल आणि लेखकाबद्दल सांगायला शब्द अपुरे पडत आहेत. महत्त्वाचं म्हणजे ज्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यावर हे पुस्तक आधारित आहे त्यांचे व्यक्तिमत्त्व लिहिण्यासाठी मुळात कितीही शब्द लिहीले तरी अपुरे पडतील. नेताजींचे आयुष्य खूपच वेगळे होते. आपण कल्पनाही करू शकत नाही अशा गोष्टी त्यांनी शक्य करून दाखवल्या होत्या. केवळ आपली मातृभूमी स्वतंत्र करण्याच्या एकाच ध्यासापोटी !

त्यांच्यासारख्या राष्ट्रीय नेत्यावर लहानपणापासून तर मृत्यूपर्यंत इतक्या तपशीलावर पुस्तक लिहीणे हे खूप जिकरीचे काम आहे. इतिहासाचे संदर्भ चुकायला नको हे लेखकापुढे आव्हान असते. माझ्या माहितीनुसार, सात - आठ वर्षे संशोधन करून, सत्तर लोकांच्या मुलाखती घेऊन, तसेच अनेक जपानी, इंग्रजी व इतर भाषेतील पुस्तके यांचा संदर्भ घेऊन विश्वास पाटील यांनी हे भलेमोठे 700 पानांचे पुस्तक लिहीले आहे.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय भाषांतरासाठी सोयीस्कर व्हावी यासाठी लेखकाने संपादित केलेली लोक आवृत्ती मी वाचली. या पुस्तकाचा ११ भाषांत अनुवाद केला गेला आहे. या पुस्तकाचे एकूण १९ मोठे प्रकरण आहेत आणि विसावा भाग उपसंहार आहे.

पुस्तकाचा पहिला अर्धा भाग नेताजींचे लहानपण, त्यांचे कुटुंब, त्यांचा कॉंग्रेस मधील सक्रिय सहभाग, कॉंग्रेस मधील अंतर्गत राजकारण आणि तेव्हाची ब्रिटिश भारतीय राजकीय परिस्थिती याबद्दल सांगतो. लग्नासाठी सांगून आलेल्या सर्व ते नाकारतात. त्यांना लग्न करायचे नसते. अत्यंत प्रतिष्ठित आय.सी.एस परीक्षेत तिसरे येऊनही ते ब्रिटिशांची चाकरी करायची नाही म्हणून प्रशासकीय नोकरी नाकारतात.

पुस्तकाचा उरलेला अर्धा भाग भारताच्या स्वातंत्र्यासाठी सुभाषचंद्र हे पेशावर, अफगाणिस्थान, जर्मनी. इटली, जपान, सिंगापूर, बँकॉक, ब्रम्हदेश यासारख्या ठिकाणी कसे जातात ते सांगतो. दुसरे महायुद्ध १९३९ ला सुरू झाल्यानंतर त्याचा फायदा घेऊन ब्रिटिशांना जेरीस आणायचे ही त्यांची महत्त्वाकांक्षा होती. त्यासाठी ब्रिटिशांच्या शत्रू राष्ट्र गटाला भेटून त्यांच्याकरवी भारतीय युद्धकैदी एकत्र करून आझाद हिंद सेना स्थापन करायची आणि ब्रिटिशांवर इंफाळ आणि कोहिमा येथून आक्रमण करायचे आणि दिल्ली जिंकायची अशी त्यांची योजना होती.

केवळ एका माणसाकडून हे सगळे शक्य होऊ शकत नाही असे वाटते, परंतु सुभाषबाबु आपल्या दुर्दम्य आत्मविश्वास आणि इच्छाशक्तीच्या जोरावर शक्य करून दाखवतात. एवढेच नाही तर त्यांच्या मार्गात अनंत अडचणी उभ्या राहतात. पण त्यांची परवा न करता ते आपल्या प्रयत्नांत बरेच अंशी यशस्वीही होतात! जपान सरकार नेताजींना व्यक्ती म्हणून नव्हे तर एक राष्ट्र म्हणून मदत करतात.

जपानी सैन्यात बेबनाव आणि आझाद हिंद सेनेतील काही जण गद्दार निघतात, म्हणजे ब्रिटिशांना जाऊन मिळतात. त्यामुळे पण ध्येय पूर्तीत अडथळा निर्माण होतो. होत्याचे नव्हते होते. तरीही न हरता नेताजी आणि त्यांचे सहकारी प्रयत्न

चालूच ठेवतात.

युद्धाचे प्रसंग लेखकाने इतक्या तपशीलवर लिहिले आहेत की आपल्या डोळ्यासमोर युद्ध सुरु आहे असे वाटते. पण.... १९४५ साली एक दुर्दैवी आंतरराष्ट्रीय घटना घडते आणि सर्व फासे पालटतात. त्या घटनेमुळे नेताजींना एक निर्णय घ्यावा लागतो आणि त्यानंतर ....

लेखकाच्या संशोधनाला दाद द्यावीशी वाटते कारण नेताजींच्या जीवनातील अखेरच्या सर्वात वादग्रस्त भाग म्हणजे त्यांच्या विमान अपघात या बद्दलची आपल्या मनातील सर्व शंका दूर होतील अशा पद्धतीने लिहीला गेला आहे.

अर्थात या पुस्तकाचा दुसरा अर्धा भाग समजण्यासाठी "दुसऱ्या महायुद्धाबद्दल" थोडे तरी नॉलेज असणे आवश्यक आहे.

ब्रिटीश सरकार जेव्हा सुभाषचंद्र बोस यांना ऑस्ट्रेलियामध्ये तुरुंगात आणि नजर कैदेत ठेवते तेव्हा नेताजींना एक पुस्तक लिहायचे असते त्याच्यासाठी लेखनिक म्हणून एमिली ही स्थानिक तरुणी त्यांना मदत करते. त्या दोघांत प्रेमसंबंध निर्माण होतात. बऱ्याच कालावधीनंतर पुन्हा जेव्हा ती त्यांना भेटते, तेव्हा ते तिच्याशी लग्न करतात. त्यांना अनिता नावाची मुलगी होते. मुंबईतील सुधा सहस्त्रबुद्धे ही तरुणी सुभाषचंद्रांवर एकतर्फी प्रेम करत असते. बऱ्याच वर्षांनंतर युद्ध सुरु असताना त्या तरुणीबद्दल सुभाषचंद्र यांना एक बातमी कळते! काय असते ती बातमी? ते पुस्तक वाचल्यावर कळते.

जर्मनीत असताना नेताजी हिटलरला जेव्हा भेटतात तोही प्रसंग खूप छान लिहीला आहे. चर्चेदरम्यान हिटलरचे आत्मचरित्र "माईन कॅम्फ (माझा लढा)" चा सुद्धा नेताजी एका कारणासाठी उल्लेख करतात. ते कारण काय? येथे सांगत नाही ते तुम्ही वाचा.

याच पुस्तकाच्या उर्वरित भागावर श्याम बेनेगल यांनी "बोस द फॉर्गोटन हिरो" हा चित्रपट बनवला आहे आणि माझे तरी मत असे आहे की या पुस्तकावरूनच तो चित्रपट बनलेला दिसतो. चित्रपट बघताना प्रत्येक प्रसंगात ते जाणवते.

नेताजींची त्यांच्या आयुष्याला योग्य न्याय देणारी एकमेव कादंबरी आणि तीही मराठीत सर्वप्रथम आली याचा मला अभिमान वाटतो. अकरा भाषेत हे पुस्तक अनुवादित झाले आहे.

खुद्द डॉ. अनिता बोस आणि कर्नल लक्ष्मी सहगल यांनी या पुस्तकाची प्रशंसा केली आहे.

हे पुस्तक वाचल्यानंतर कळतं की खूप मोठा इतिहास आपल्याला आजपर्यंत माहित नव्हता. सुभाषचंद्र बोस आणि पंडित नेहरू हे खूप जिवलग मित्र होते, अगदी राजकीय मित्र सुद्धा! त्या दोघांचीही ब्रिटिश आणि स्वातंत्र्यप्राप्तीबद्दलचे विचार सुरवातीला खूप सारखे होते, हे या निमित्ताने मला प्रथमच कळले. परंतु कालांतराने त्यांचे मार्ग का वेगळे होतात हे पुस्तकात समजते.

प्रत्येक इतिहासप्रेमी व्यक्तीने हे पुस्तक वाचलेच पाहिजे. अन्यथा एक मोठा इतिहास जो आतापर्यंत पडद्याआड होता किंवा आपल्याला जास्त माहित नव्हता, तो आपल्याला कधीच माहित होणार नाही.

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

# पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: कु. हर्षदा ठकन चव्हाण वर्ग: B.A-II

पुस्तकाचे नांव: इकिगाई मो. नं.: 8180933972

लेखकाचे नांव: हेक्टर गार्सिया आणि फ्रान्सेस्क मिरॅलेस किंमत: 398

प्रकाशकाचे नांव: प्रल्हाद ढापरे एकूण पृष्ठे: 192

आशय: दीर्घायुषी, निरोगी आणि आनंदी जीवनाचे जपानी रहस्य

वृद्ध होत असताना तरुण राहण्याची जपानी कला

इकिगाई काय आहे? 'इकिगाई' जीवन जगण्याची एक अशी कला आहे जी मानवाला नेहमी आपल्या उद्देशाप्रति सावधपणे प्रेरित करते इकिगाईचा अर्थ मानवाला आहे. जीवनाला उद्देशपूर्ण बनवणे. इकिगाई सिद्धांताचे पालन करणाऱ्या लोकांची सकाळ कोणत्यातरी उद्देशासाठी असते. हेच कारण आहे की दुसऱ्या महायुद्धात उद्ध्वस्त झालेल्या जपानने आपल्या देशाला केवळ विकसितच केले नाही. तर संपूर्ण जगात एक समृद्ध आणि दीर्घायु असणारा देश देखील बनवले. हे कसे शक्य झाले? हे सर्व शक्य झाले. इकिगाई जीवन पद्धती स्वीकारल्याने. तुम्हालाही जर चांगले आणि उद्देशपूर्ण दीर्घ जीवन जगायचे असेल तर हे पुस्तक तुमच्या अत्यंत उपयोगाचे आहे

हे पुस्तक तुम्हाला केवळ सैद्धांतिक गोष्टीच सांगत नाही तर इकिगाई जीवन कसे जगायचे हे व्यावहारिक उदाहरणे देऊन पण समजावले आहे त्यावेळी तुमच्या लक्षात येईल की जपानची जीवनपद्धती कशी आहे? त्या ठिकाणची माणसं कसे त्यांच्या जीवनाच्या उद्देश प्राप्त करतात? कसा समाजात त्यांच्या वरिष्ठपणाचा सन्मान होतो? ते असे काय खातात - पितात की ज्यामुळे त्यांची नोंद जगात सर्वाधिक आयुष्य लाभलेल्या लोकात होते? एक यशस्वी जीवन जगणे आणि सदा नवे विक्रम करण्यासाठी हे पुस्तक तुम्हाला आवश्य

Scanned with OKEN Scanner

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर

ग्रंथालय विभाग, भाषा विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आयोजित

## पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्याचे नांव: PATIL MANJIRI SARJERAO    वर्ग: BSc-I

पुस्तकाचे नांव: MINDSET    मो. नं.: 7410586019

लेखकाचे नांव: CAROL S. DWECK    किंमत: 499 ₹

प्रकाशकाचे नांव: Constable & Robinson.    एकूण पृष्ठे: 288 pages.

**आशय:**

About the author- Carol Dweck is a professor at Stanford University & she has been researching the concept of the fixed mindset versus the growth mindset for over 30 years. This book tells us about it is your mindset that determines how you interact with others, how you deal with change, challenges & ~~failure~~ failure. And now all of the sudden the concept of mindset becomes a little more complicated and a lot more important.

Dweck begins the book with an overview of the mindsets and how her research on failure helped her discover the two mindsets. It is obvious from the begining of the book that Dweck feels that having a growth mindset is more advantageous than having a fixed mindset. She is also very honest that at one point in her life she was a person with a fixed mindset but through her research she has learned the value of the growth mindset & has spent a lot of time changing her mindset.

The first three chapters of the book do a great job of explaining the mindsets & how they impact our lives. Dweck follows these chapters with chapters that focus on sports, business, relationships & parents, teachers & coaches. The

नाव - वैष्णवी संभाजी नाईकडे.
पुस्तकाचे नाव - राधेय
लेखकाचे नाव - रणजित देसाई.
प्रकाशकाचे नाव - मेहता पब्लिशिंग हाऊस
किंमत - ₹230 पृष्ठ - 272
वर्ग - B.Com II (II)
मो. नं - 9356811616

रणजित देसाई हे नाव काय मराठी वाचकांना नवीन नाही. त्यांनी अशा अनेक कांदबऱ्या लिहल्या जसं की, त्यांच श्रीमानयोगी ही शिवकालीन कांदबरी स्वामी ही पेशवेकालीन आणि त्यातल्या - त्यात राधेय ही पौराणिक महाभारतातील कांदबरी. ह्या तिन्ही कालातील कांदबऱ्यांच लेखन त्यांनी अगदी सुबक व दमदार तसेच उत्सवदार पद्धतीने केलं आहे. ह्या तीनही कांदबऱ्या या वाचकांच मन खिळवून टेवणाऱ्या आणि मुखाद्या लक्षवेधी गोष्टीसारख्या म्हणजेच वाचकाने पुस्तक खाली ठेवूच नये अशा प्रकारच्या आहेत.

ही कथा आहे सूर्यपुत्राची, ज्येष्ठ कौंतेयाची, राधेयाची, अंगराज्याच्या राजाची, सुतपुत्र अधिरथाची त्याच्या त्यागाची, त्याने भोगलेल्या यातनाची त्या दानशूर, वीरशूर कर्णाची!

सूर्यपुत्र असताना ही सुतपुत्र म्हणून ज्याने आयुष्य जगलं, इंद्राला ही ज्याने याचक म्हणून उभं केलं, मनात अनेक धर्मयुद्ध घेवून किंवा न्यायु असताना आयुष्य ज्याने केलं, डोळ्यापुढे मृत्यु असतानाही ज्याने हसतं - हसतं मृत्यु ला कवटाळलं असा तो वीरपुत्र म्हणजेच कर्ण...

रणजित देसाई ह्यांनी हे पुस्तक कर्ण ह्या पात्राच्या संबंधात लिहलं असल्याने कर्णाच्या अशा नानाविध गोष्टींना उजाळा देण्याचं काम केलं

आहे. अर्थातच कर्णाच्या पात्राची उंची वाढवण्यासाठी कुठेतरी इतर पात्रांची उंची कमी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ह्या पुस्तकातील महाभारतातील प्रथांच्या, चालीरितींच्या किंवा अन्य घडलेल्या गोष्टींच्या आताच्या काळातील संस्कृतीशी-परंपराशी थोडफार का होईना संबंध दिसून येतो.

जसं की, द्रौपदी वस्त्रहरण हे आजच्या युगातही आपल्याला पहायला मिळतं आहे, महिलांवर होणारे अत्याचार, मुलींची छेड-छाड पण आजचा समाज ही त्यावेळच्या समाजासारखा फक्त बघतच राहिला आहे. लेखक एक वाक्य म्हणतात की, जर तुम्हाला कर्ण समजून घ्यायचा असेल तर पुस्तकाची पाने चाळण्याची काहीच गरज नाही एकदा स्वतःच्या मनाची पाने खोला कर्ण आपोआपच समजेल. पुस्तकाची सुरुवात ही चंपानगरीत कृष्णाची भेट, द्रौपदी वस्त्रहरण, द्युतवास, युद्ध, पांडवांचा वनवास, गंधर्व युद्ध अशा अनेक गोष्टीतून पुढे ही कथा चालू राहते.

शिवाय ह्या कादंबरीच्या मुखपृष्ठावर एका क्रूर व्यक्तीचं चित्र आढळून येतं त्यातून अनेक पैलू समोर येतात, जसं की क्रोध, संयमी, निस्तेज, धैर्यवान आणि मनात अनेक गोष्टी सलत असतानाही निर्भय-निडर पणे बघणारा त्याचा चेहरा हे पुस्तकाचं मुखपृष्ठ दर्शवतयं.

महाभारतात तुम्हाला कोणतं पात्र जास्त आवडतं असा प्रश्न कोणी विचारला तर प्रथम उत्तर येतं ते अर्जुन... पण त्या सर्वांमध्ये अलिप्त राहिलेला, जो कौंतेयाचा ज्येष्ठ पुत्र, जो कृष्णाचा सखा, जो वृषालीचा पती, जो वृषसेनचा पिता जो दुर्योधनाचा सोबती, आणि ह्या पाच पांडवांचा ज्येष्ठ भ्राता तो म्हणजे हा कर्ण...

ह्या सर्वांच्यात असूनही कायम मनाने एकटा राहिलेला तो ही कर्णच...

असत्य नेहमी हे सत्यापेक्षा कितीतरी पटीने वाईट असत, असत्याचा नेहमी पराजय होतो, हे माहित असतानाही मित्राला दिलेले वचन पाळण्यासाठी लढत राहिला तो ही कर्णच...

कर्ण हा नेहमी एकाच गोष्टीच्या शोधात होता. तो म्हणजे मी कोण आहे? हा प्रश्न कर्णाला वेळोवेळी छळायचा त्या शोधात त्याची ध्येय, त्याची प्रतिष्ठा, त्याचं अस्तित्व त्याच्या आकांक्षा ह्या एकमेकांत गुंतल्यासारख्या वाहल्या आणि जेव्हा हा सारा गुंता सुटला त्याच क्षणी जिवनाचे सारे आधार ही सुटले आणि तो क्षण त्याच्या जीवनसमाप्तीचा ठरला. मातेच्या दर्शनाने कर्ण धन्य झाला, पण त्याला का दूर केलं ह्या विचारातच रमला. आता त्याच्या समोर एकच आव्हानं उरले होते, ते म्हणजे मृत्यू..!

आणि त्यासाठी तो काहीही करायला तयार होता कारण त्यामुळे कृष्णा समाधानी पावणारा आता होता, कुंती माता चिंता मुक्त होणार होती, पांडव सुरक्षित राहणार होते. रणांगणावरचा मृत्यु पाहताना सखा दुर्योधनाला मित्र प्रेमाची प्रचिती येईल. हा सर्व अट्टाहस फक्त तो मृत्यू मिळण्यासाठीचं करत होता.

लेखक खुप छान म्हणतात की, मृत्यु गाठण्यापलीकडे कर्णाच्या हाती आता काहीही उरलं नाही. कर्ण कुणाचाच नाही. कर्ण कोणाचाच नव्हता. तो एकाकी आहे.

प्रत्येक माणसाच्या मनात हा असाच कर्ण दडलेला असतो. जो सर्वश्रेष्ठ असूनही कधीच कोणाचा झाला नसतो. जो फक्त स्वतःचा शोधचं घेत असतो. जो फक्त आलेल्या क्षणाला जगायचं म्हणून जगतं असतो. जो मनातल्या धर्मयुद्धाला संपवायचा प्रयत्न करत असतो. जो आधार कोणाचा तरी आधार शोधत असतो. त्यालाही एकमेव

मार्ग दिसत असतो तो म्हणजे मोक्ष
कादंबरी वाचल्यावर कर्ण हा महाभारता पुरता मर्यादीत न राहता आपल्या आजुबाजूला असल्याचा जाणवतो. आजचा कर्ण जातिव्यवस्थेने ग्रासलाय, आजचा कर्ण धर्मात बुडलाय बुडलाय. आजचा कर्ण नको त्या व्यसनात अडकलाय..
त्याला माहित असतानाही धोका, अडकलाय नको त्या गोष्टीत....
कर्ण ही व्यक्तीरेखा नसून ती मनोवृत्ती आहे.
म्हणून च....

सर्वांना अर्जुन समजला
कर्ण मात्र त्या पडद्यामागे मी कोण?
म्हणून झुंजत राहिला

आयुष्याचं गूढ शोधता - शोधता
ध्येयाशी, स्वप्नाशी लढत राहिला पण,
मी कोण? म्हणून आयुष्यभर तो
झुंजत राहिला..

आयुष्भर तो झुंजत राहिला !!

विद्यार्थ्याचे नाव :- सानिका दादासो हराळे     वर्ग :- B.A-I
पुस्तकाचे नाव :- अंत : अस्ति प्रारंभ :     मो. नं :- 9359126626
लेखकाचे नाव : श्री.वैभव कुस     किंमत :- 270
प्रकाशकाचे नाव :- राधा रायटिंग सर्व्हिसेस  एकूण पृष्ठे :- 149

आशय :-

शेवट हीच खरी सुरुवात असते या मुलभूत विचाराने वेगळी दिशा, एक वेगळा विचार देण्याच्या हेतूने या पुस्तकाचा प्रपंच मांडला आहे. आपल्यात दडलेली एक अभूतपूर्व शक्ती मिळवण्याचा मार्ग दाखविणारी आणि आयुष्यात येणारे नियतीचे हेलकावे आपल्या खांद्यावर पेलताना येणाऱ्या आव्हानांचा सामना कसा करायचा आणि आपला माईंडसेट हा सतत सकारात्मक कसा ठेवायचा याचे लिखाण या पुस्तकाच्या माध्यमातून केले आहे. कसं लढायचं कसं घडायचं आणि आलेल्या परिस्थितीचा सामना करून कसं पुढे निघायचं याचं इत्यंभूत लिखाण या पुस्तकात केलेले आहे. आणि नक्कीच याचा सकारात्मक परिणाम या पुस्तकाच्या माध्यमातून घडेल. आणि त्या खचलेल्या प्रत्येक व्यक्तीला आयुष्यात एक नवी उभारी मिळेल असा विश्वास आहे.

प्रत्येकाला आपल्या जीवनामध्ये अनंत अडचणींना सामना करावा लागतो. तो करत असताना जीवनातील चढउतारांना घाबरून नैराश्याच्या गर्तेत अडकलेले कित्येक जण टोकाचा निर्णय घेतात. आणि नैराश्यात अडकून कुटुंबातील त्या व्यक्तीने टोकाचे पाऊल उचलल्यामुळे त्याच्या कुटुंबाची एका व्यक्तीच्या टोकाच्या निर्णयामुळे पुढील दोन पिढ्यांना त्याची झळ सहन करावी लागते हे या पुस्तकात लिहिले आहे.

जिवनात खूप काही शिकायलाही मिळते आणि त्यातूनच जीवनाच्या शेवटामधूनच जीवनाचा प्रारंभ असतो हे शिकायला मिळते. आणि अंत: अस्ति प्रारंभ The End is the Begining या पुस्तकाची निर्मिती झाली आहे.